
मु. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. ३२०३

भाषांतर शास्त्र की कला?

प्रा.म.वि. फाटक. कु. रजनी ठकार



REFBK-0025238

वरदा बुक्स, पुणे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

10 MAY 1987

20 MAR 1988

16 OCT 1988

10 DEC 1989

23 OCT 1996

25 DEC 1991


30 OCT 1992

17 OCT 1992

30 NOV 1996

(क्र. मा. पहा)
५०००–११–८६

संदर्भ ग्रंथ
3203
२५२३८
२१३।८७



भाषांतर– शास्त्र की कला ?

प्रा. म. वि. फाटक
M. A., M. Ed.

कु. रजनी ठकार
M. A.

REFBK-0025238

वरदा बुक्स

वरदा सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ०१६.

प्रकाशक :
हनुमंत अनंत भावे
वरदा बुक्स
'वरदा', सेनापती बापट मार्ग
पुणे ४११ ०१६

© प्रा. म. वि. फाटक – रजनी ठकार

पहिली आवृत्ती :
७ फेब्रुवारी १९८७

चित्रकार : अनंत सालकर

मुद्रक :
प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ, पुणे३०

किंमत : ३० रुपये



मनोगत– चार शब्द

मुंबई विद्यापीठीय एका प्रबंध-लेखनाच्या निमित्ताने 'भाषांतर'– या विषयाकडे आमचे लक्ष वेधले गेले आणि मराठीत या विषयावर स्वतंत्र ग्रंथ झालेला नाही ही जाणीव झाली. यातूनच या क्षेत्रातील मुख्यत्वे पाश्चात्त्य ज्येष्ठ व श्रेष्ठ विचारवंतांच्या पुस्तकांचा थोडाफार अभ्यास घडला व हा विषय पुस्तकरूपाने मांडण्याची प्रेरणा निर्माण झाली व वर्ष-दोन वर्षे टीपा-टिपणे तयार करून सुमारे ऐंशी पृष्ठांचे लेखन पूर्ण झाले.

हे सर्व लेखन, मराठीतील ख्यातनाम समीक्षक प्रा. म. ना. अदवंत, प्रा. गो. म. कुलकर्णी, प्रा. मुरलीधर सायनेकर व प्रा. गि. स. भावे यांनी वाचून सूचना दिल्या, मार्गदर्शन केले आणि छापून प्रसिद्ध करण्याचा आग्रह धरला. प्रा. अदवंतांनी तर पुण्यात छपाई चालू असताना प्रुफे तपासून देण्याचे कबूल केले व स्नेहधर्म पाळला.

या लेखनाच्या तयारीसाठी, संदर्भग्रंथ पुरविण्यासाठी, ठाणे महाविद्यालय, मुंबई-विद्यापीठ ग्रंथसंग्रहालय, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, इत्यादींनी सहकार्य दिले. पुणे येथील वरदा बुक्स / सरिता प्रकाशन संस्थेचे श्री. ह. अ. भावे व सौ. मंदाकिनी भावे यांनी आपुलकीने स्मिता मुद्रणालयात छापून घेऊन प्रकाशनाचे धाडस केले. या सर्वांबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत.

आणि आरंभापासून अखेरपर्यंत सौ. मालती फाटक यांनी दिलेले उत्तेजन व सहकार्य अमौलिक आहे. त्यांचे आभार कोणत्या शब्दांत मानावेत ?

– म. वि. फाटक
– रजनी ठकार

अनुक्रमणिका

१) विषयप्रवेश– साहित्य समृद्धीचे साधन ५

२) भाषांतर– एक प्रक्रिया ८
शब्दचर्चा– संकल्पना– इंग्रजी व मराठी व्याख्या– विचारांचा विकास– कसोट्या– गुणवत्ता– अडचणी– प्रकार– परस्परविरोधी मते– काही सूचना

३) वैचारिक गद्याचे भाषांतर २७

४) कथावाङ्मयाचे भाषांतर ३१

५) कादंबरीचे भाषांतर ३८

६) विनोदाचे भाषांतर ४१

७) काव्याचे भाषांतर ४४

८) नाटकाचे भाषांतर ५९

९) उपसंहार ८०

परिशिष्ट–१– संस्कृतसूत्रे ८३

परिशिष्ट–२– संदर्भ-सूची ८४

१ : विषयप्रवेश

भाषांतर– एक साहित्यसमृद्धीचे महत्त्वाचे साधन

कोणत्याही देशातील भाषेमध्ये असणाऱ्या साहित्याला अधिक समृद्ध करण्यासाठी विचारवंत ज्या साधनाचा मुक्त हस्ते उपयोग करून घेतात ते साधन म्हणजे भाषांतर ! परभाषेमधील जे जे नवीन, सुंदर, आकर्षक व उपयुक्त वाटते ते ते साहित्य स्वभाषेमध्ये उतरून घेणे म्हणजे भाषांतर– मग त्या पद्धतीस भाषांतर म्हणा, रूपांतर म्हणा अथवा अनुवाद म्हणा.

प्राचीन काळापासून या साधनांचा उपयोग प्रत्येक देशातील विचारवंत, साहित्यिक, कलावंत करून घेत आहेत. प्राचीन काळी भारतात जे जे वैचारिक वा साहित्यिक लेखन संस्कृतात होते ते ते पुढे गेल्या दोन हजार वर्षांत प्राकृत-बोलभाषांत अनुवाद करून घेण्याचा प्रयत्न आपल्याकडे झालेला आहे. हीच गोष्ट पाश्चात्त्य देशातही प्राचीन काळापासून आजतागायत होत आहे. मग ते मूळ साहित्य बायबलसारखे धार्मिक असो, अथवा होमरकृत इलियड या महाकाव्यासारखे ललित असो, अथवा गणित वा इतिहास दालनातील असो–ते साहित्य युरोपातील फ्रेंच, जर्मन, इंग्लिश इत्यादी भाषांत आणण्याची धडपड त्या त्या भाषाकोविदांनी केलेली आढळून येते.

मराठी भाषेबाबतही हाच भाषांतर–रूपांतर– अनुवाद प्रकार प्रारंभापासून आढळून येतो. विष्णुदास शर्माचे पंचतंत्र असो वा बालकांचे मनोरंजन करून त्यांना मार्गदर्शन करणारे हितोपदेश असो; संस्कृतातील वैद्यकशास्त्र असो, ज्योतिषशास्त्र असो; अथवा 'गुह्यात् गुह्यतरं ज्ञानं' असणारे गीतेतील अध्यात्म असो–आमच्या विचारवंतांनी ते सर्व ज्ञान भाषांतर मार्गाने मराठीत उपलब्ध करून दिले आहे. मराठीत उपलब्ध असणाऱ्या भगवत्गीतेवरील 'टीका-ग्रंथ', रामायण, भारत,

भागवत या पौराणिक ग्रंथांवरून रचलेले स्वैर अनुवाद– शब्दशः वा भावार्थ प्रकट करणारी आख्यानक कविता ही सर्व उदाहरणे पुरेशी आहेत.

एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रावर ब्रिटिश राज्य आले. या देशाचे ज्ञान, विज्ञान, इतिहास, साहित्य फार तुटपुंजे आहे अशी कठोर टीका करून, मेकॉले या विचारवंताने भारतीय लोकांच्या उद्धारासाठी त्यांना 'पाश्चात्त्य विज्ञान व इंग्रजी भाषा' यांचे शिक्षण द्यावे हा आग्रह धरला. तो मान्य झाला. व राज्यकर्त्यांनी इंग्रजी शिक्षण देणाऱ्या शाळा काढल्या. शिक्षणाची त्रिस्तर योजना रूढ झाली. पुढे मुंबई विद्यापीठही १८५७ मध्ये स्थापन झाले.

राज्यकर्त्यांच्या प्रोत्साहनाने मुद्रणकला सुरू झाली. नियतकालिके, पाठ्यपुस्तके तयार झाली. या सर्व प्रक्रियेतून भाषांतराला– एक प्रभावी माध्यम म्हणून– विशेष चालना मिळाली. संस्कृत व इंग्रजी साहित्यातील गद्य वा पद्य स्वरूपातील चांगले लेखन भाषांतर-रूपांतरद्वारे मराठीत आणण्याची प्रेरणा येथील विद्वानांना मिळाली. 'डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटी' स्थापन झाली व या संस्थेतर्फे चांगल्या भाषांतरित वा रूपांतरित पुस्तकांना आर्थिक पुरस्कार मिळू लागला. त्यामुळे या अव्वल इंग्रजी अमलाला (१८७४ पर्यंतच्या कालखंडाला) 'भाषांतर युग' असेही नाव कोणी दिले, तर 'इंग्रजी गद्याचा मराठी अवतार' असेही नाव प्रा. दत्तो वामन पोतदारांनी दिले. काहीही असो, भाषांतर-रूपांतरद्वारे मराठी साहित्य विविध रंग-रूपात समृद्ध होऊ लागले. नाटक, काव्य, कथा, कादंबरी, चरित्र, निबंध इ. वाङ्मय-प्रकार मराठीत लोकप्रिय होऊ लागले. हे भाषांतरादी प्रयत्न अधिक सकस व निर्दोष व्हावेत म्हणून 'मराठी भाषेच्या शिवाजीने'– विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी निबंध-मालेत 'भाषांतर' या विषयावर प्रदीर्घ निबंध लिहून या नव्या माध्यमाच्या चर्चेला आरंभ केला. त्याही घटनेला आता शंभर वर्षे होऊन गेली ! भाषांतराचे महत्त्व जाणून इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी १८९४ मध्ये 'भाषांतर' नावाचे एक मासिक सुरू केले. पण अखेरीस १८९७ मध्ये ते बंद पडले. या मासिकाच्या संदर्भात ते म्हणतात की, "पश्चिमेकडील निरनिराळ्या ज्ञानशाखांतील अगाध ज्ञानांचे प्रवाह मराठी वाचकांपर्यंत आणून सोडावेत; त्याद्वारे त्यांची बौद्धिक कुवत वाढेल."

या विचाराला धरूनच त्यांनी तर्कभाषा, शांकरभाष्य, ऐने-अकबरी, झेनामन-कृत हीरो (Hero), पेनकृत सारासारविचार, अरिस्टॉटलकृत राजनीती (Politics), प्लुटार्ककृत लायकरगसचे चरित्र; आणि प्लेटोचे स्वराज्य (Republic) इत्यादी पुस्तके भाषांतर करून मराठीत आणली. आणि त्याद्वारे मराठी वाचकांना ज्ञान-संपन्न व विचारप्रवण करण्याचा त्यांनी प्रयत्न केला.


आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक व सामाजिक जीवनाच्या संपन्नतेसाठी प्रत्येक भाषे-

तील दर्जेदार साहित्याचे आदान-प्रदान हे महत्त्वाचे माध्यम आहे. आणि त्यासाठी भाषांतर वा अनुवाद हे एक प्रमुख साधन आहे. अशा तऱ्हेचे भाषांतरकार स्वभाषा, स्वसाहित्य व स्वसंस्कृती यांचा दुरभिमान सोडून अन्य भाषा, अन्य साहित्य, अन्य संस्कृती यांचा स्वकीय लोकांना परिचय करून देतात. त्याद्वारे श्रेष्ठ दर्जाच्या साहित्याचा आस्वाद घेण्यास स्वभाषिकांना प्रवृत्त करतात. प्रत्येक रसिक जगातील किती भाषा शिकेल व त्या त्या भाषांतील साहित्याचा आस्वाद घेऊ शकेल हाही एक बिकट प्रश्नच आहे. (विनोबा भावे यांच्यासारखा, चौदा भारतीय भाषा व चार परकीय भाषा आत्मसात करणारा, विद्वान अपवादात्मकच.) अशा परिस्थितीत सामान्य रसिक मराठी, हिंदी, संस्कृत व इंग्रजी साहित्यापलीकडे जात नाही. त्याला जगातील वैचारिक, वैज्ञानिक व सांस्कृतिक ज्ञानाच्या बाजारपेठांपाशी आणून सोडण्याचे कार्य भाषांतरकार करीत असतो.

अजूनही आपले मराठी साहित्य पुरेपूर संपन्न व समृद्ध व्हावयास हवे, ही खंत अनेकांना आहे. मराठीतील नामवंत समीक्षक व कवी कै. बा. सी. मर्ढेकर यांनी तर जाहीरपणे ही खंत व्यक्त करून म्हटले आहे की केवळ इंग्रजी भाषेतूनच भाषांतरद्वारे मराठी संपन्न करण्याचे प्रयत्न, यापुढील काळात अपुरे व एकांगी ठरतील. आपल्या देशाचा संबंध अनेक परदेशांशी येत आहे. त्या त्या परदेशात, ज्या भाषांतील साहित्य समृद्ध असेल, दर्जेदार असेल, आपल्या दृष्टीने आवश्यक असेल, त्या त्या परभाषेतूनही ते ते साहित्य, विविध भाषाकोविदांनी भाषांतराच्या माध्यमातून मराठीत आणावे व मायभाषेचे ऋण फेडावे. इंग्रजीप्रमाणेच फ्रेंच, लॅटिन, जर्मन, चिनी, जपानी, रशियन, स्पॅनिश, अरेबिक, पर्शियन इत्यादी परभाषा अभ्यासून त्या त्या भाषांतील श्रेष्ठ ग्रंथ भाषांतरादी मार्गाने मराठीत आणावेत. फार काय वर्तमानकालीन भारतीय भाषांतूनही हिंदी, बंगाली, सिंधी, गुजराती, आसामी, तामीळी, कन्नड, तेलगू, इत्यादींतूनही श्रेष्ठ साहित्य भाषांतराद्वारे मराठीत आणावेत ही एक काळाची गरज आहे. साहित्य-संस्कृतीमंडळ या दृष्टीने आज प्रयत्नशील आहे. National Book Trust ची स्थापनाही या उद्दिष्टाने झाली आहे.

भाषांतराद्वारे केवळ आपले साहित्यच समृद्ध होईल असे नाही. राष्ट्रीय एकतेचा प्रश्नही सुटेल. फार काय वैश्विक एकता व सामंजस्यालाही हातभार लागेल. आणि म्हणूनच या छोटेखानी पुस्तिकेचा हा प्रपंच !

*



२. भाषांतर : एक प्रक्रिया

भाषांतराची प्रक्रिया ही अति प्राचीन आहे. ज्या वेळी मूळ ग्रंथरचना तयार झाली व ती प्रख्यातीस आली त्या वेळेस त्या ग्रंथाच्या भाषांतराची प्रक्रिया तयार झाली. भाषांतर-कलेचा इतिहास व त्यातील वैविध्य हे आद्य ग्रंथाइतकेच प्राचीन आहे. भाषांतराची संकल्पना ही शतकानुशतके अनेक देशांत अस्तित्वात आहे. या भाषांतरप्रक्रियेला स्थलकालाच्या मर्यादा नाहीत.

अनुभवांचे आत्मनिवेदन अथवा आत्माविष्कार करणे या माणसाच्या मूलभूत प्रवृत्तींचा संबंध भाषांतराच्या मुळाशी असून दुसऱ्याचा अनुभव वा मनोगत जाणून घेण्याची गरजही भाषांतराच्या निर्मितीला कारणीभूत ठरते. माणसामाणसांत संपर्क साधण्याचे भाषा हे जसे एक माध्यम आहे, त्याप्रमाणेच भिन्न भाषांना व भिन्न भाषिकांना एकत्र जोडण्याचे भाषांतर हे एक साधन आहे. म्हणूनच 'Translation is a bridge to join two gulf streams' असे म्हटले जाते. म्हणजेच दोन भिन्न साहित्याची व संस्कृतीची देवाण-घेवाण करण्याचे भाषांतर हे एक सुलभ व प्रमुख असे माध्यम आहे.

भाषांतर ही संकल्पना पाश्चात्त्य देशांत लॅटिन भाषेतून इंग्रजीत व इतर युरोपियन भाषेत आली आणि भारतात ही संस्कृतमधून मराठीत आली. परंतु 'शास्त्र' या दृष्टीने या संकल्पनेचा विचार अव्वल इंग्रजी कालानंतरच भारतात होऊ लागला. त्यापूर्वी मराठी भाषेच्या जन्मानंतर बाराव्या-तेराव्या शतकात महानुभावादी कवींनी पौराणिक कथांची स्वैर रूपांतरे व भाषांतरे केली. फार काय पंचतंत्र, हितोपदेश, वैद्यक आणि ज्योतिषरत्नाकर ही गद्य पुस्तकेही भाषांतर-द्वारे मराठीत आली.

एका भाषेतील साहित्य दुसऱ्या भाषेत उतरविणे म्हणजे भाषांतर होय.

मुळात ' Translation ' ही संकल्पना लॅटिन वाङ्मयात आहे. Trans व Lation या दोन शब्दांतून ही संकल्पना तयार होते. Trans म्हणजे पलीकडे अथवा पार आणि Lation म्हणजे नेणे अथवा नेण्याची क्रिया करणे. म्हणजेच या संकल्पनेत स्थलांतर अभिप्रेत आहे. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेणे अथवा पार करणे म्हणजेच–' स्थलांतर ' करणे हा अर्थ यात अभिव्यक्त होतो. पुढे स्थलांतरा-कडून ही संकल्पना भाषेकडे वळली. एका भाषेतील आशय दुसऱ्या भाषेत आणणे ही कल्पना अर्थपरिवर्तनाने रूढ झाली. कालांतराने अर्थपरिवर्तनातून अर्थविस्तार झाला व Translation म्हणजे भाषांतर हा शब्द मराठीत अर्थविस्तारातून आला व मान्यता पावला. आणि Translation म्हणजे एका भाषेतील साहित्य दुसऱ्या भाषेत उतरविणे हा अर्थ सर्वत्र मान्य केला गेला.

भाषांतर प्रक्रियेचे स्वरूप हे साहित्यिकाने– लेखकाने वापरलेल्या पद्धतीवर अवलंबून असते. एका भाषेतील साहित्य दुसऱ्या भाषेत संक्रांत करीत असताना, नेत असताना, मुळाबरहुकूम पर्यायी शब्दांचा वापर केला गेला तर ' भाषांतर ' ही संज्ञा प्राप्त होते. परंतु स्थळ-काळ, संस्कृती भेदानुसार जर अमर्याद स्वातंत्र्य घेऊन मूळ कलाकृतीत बदल केले गेले तर ' रूपांतर ' ही संज्ञा प्राप्त होते. म्हणजेच भाषांतर व रूपांतर या दोन स्वतंत्र प्रक्रिया असून त्यात केवळ स्तरभेद (Difference of Degree) राहात नसून तेथे (Difference of Kind) स्वरूप-भेद अभिप्रेत आहे.

Translation या इंग्रजी शब्दाला पर्यायी म्हणून मराठी भाषेत भाषांतर, अनुवाद वा रूपांतर अशा दोन संज्ञा येत असल्या तरी ' एका भाषेतील साहित्य दुसऱ्या भाषेत उतरविणे ' ही मूळ संकल्पना कायम राहाते. या संदर्भात काही पाश्चात्त्य व काही मराठी लेखकांचे विचार लक्षात घेतल्यास ही संकल्पना अधिक स्पष्ट होईल.

काही व्याख्या– (संकल्पना)

सी. रेबीन यांच्या मते भाषांतर ही एक अशी प्रक्रिया आहे की, एखाद्या लिखित किंवा मौखिक वचनाला एका भाषेतून दुसऱ्या भाषेत नेत असताना मूळ भाषेतील अर्थ जसाच्या तसा उतरणे होय / ' A Translation is a process by which a spoken or written utterance takes place in one language which is intended and presumed to convey the same meaning as a previously existing utterance in another language. ' याच विचाराने **सी. रेबीन** यांनी आणखी दोन गोष्टी पुढे अंतर्भूत केलेल्या आहेत. एक म्हणजे वास्तव भागाचे कथन (Meaning or reference to some slice of reality)

व वास्तव भागाच्या कथनातील अभिव्यक्तीतून आढळणारे दोन भाषेतील भेद. (Difference between two languages in referring to that reality.)

–**सी. रेबीन** यांच्या या संकल्पनेपेक्षा **डॉ. जॉन्सन** यांची व्याख्या सरळ व व्यापक आढळते. त्यांच्या मते भाषांतर करणे म्हणजे एका भाषेतील अर्थ दुसऱ्या भाषेत नेत असताना मूळ अर्थाला धक्का न लावणे ' To translate is to change into another language, retaining the sense. '

– **ए. एच. स्मिथ** यांनी या विचाराला थोडी मुरड घातली. त्यांच्या मते भाषांतर करणे म्हणजे एका भाषेतील अर्थ दुसऱ्या भाषेत नेत असताना मूळ अर्थ ठेवण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करणे होय. कारण मूळ कलाकृतीची परिणामकारकता ह्या ' बदलाने ' थोड्याफार प्रमाणात नष्ट होतेच. त्यातल्या त्यात वस्तुनिष्ठ वा शास्त्रीय (objective or scientific) विषयक वाङ्मयात ही परिणामकारकता थोड्या प्रमाणात कमी होते तर आत्मनिष्ठ वा कलात्मक (Subjective or Artistic) अनुभवाच्या अभिव्यक्तीत ही परिणामकारकता मोठ्या प्रमाणात कमी होते. ' To translate is to change into another language retaining as much of the sense as one can. '

भाषांतरविषयक या पाश्चात्त्य संकल्पनांच्या विचाराचा परिचय अव्वल इंग्रजी कालानंतर इंग्रजी भाषेच्या अभ्यासाने तत्कालीन विचारवंतावर झाल्याने, साहजिकच मराठी भाषांतरविषयक संकल्पनाही पाश्चात्त्य विचारांशी समांतर आढळतात.

मराठी व्याख्या

विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या मते ' Translation ' हा शब्द इंग्रजीतून बनवलेल्या नवीन शब्दांपैकी आहे. संस्कृत भाषेतून बोलभाषेत साहित्य आणण्याची प्रक्रिया फार जुनी असून त्यासाठी संस्कृत भाषेत ' छाया ' वा ' प्रतिबिंब ' हा शब्दप्रयोग होता. हा शब्द कालांतराने ' प्राकृतात अर्थ आणणे ' या अर्थाने मराठी भाषेत वापरला जाऊ लागला. पुढे यालाच ' टीका ' अथवा ' व्याख्या ' असा शब्दप्रयोग रूढ झाला. यावरून असे स्पष्ट होते की, चिपळूणकर यांच्या मते Translation ची मूळ संकल्पना संस्कृत भाषेत होती, पण मराठी भाषेत पर्यायी शब्द म्हणून इंग्रजीतील Translation या शब्दाला ' भाषांतर ' हा नवीन शब्द तयार केला गेला. डॉ. जॉन्सन यांच्या विचारसरणीचा प्रभाव पडल्याने चिपळूणकरही ' भाषांतर करणे म्हणजे जो अर्थ एखाद्या विवक्षित भाषेत असेल तो दुसऱ्या भाषेत उतरविणे होय ' ही मतप्रणाली मांडतात, मूळ अर्थाला धक्का न लावता एका भाषेतील साहित्य दुसऱ्या भाषेत उतरविणे हाच अर्थ या विचारसरणीत अभिप्रेत

आहे.

भाषांतरकर्त्यास परकीय व स्वकीय भाषांवर प्रभुत्व हवे हा विचारही चिपळूणकर आवर्जून सांगतात. प्रत्येक भाषेतील शब्दसंपत्ती, शब्दसाधितांचे प्रकार, वाक्यरचनेची खुबी व शैली, शब्दांचे सौन्दर्य, सामर्थ्य, मृदुत्व वा काठिन्य इत्यादी गोष्टींशी तो चांगलाच परिचित हवा तर हे भाषांतर करण्याचे दुर्घट काम तो करू शकेल. याशिवाय सहृदयता, समान वृत्ती इत्यादी अंतर्गत गुण भाषांतरकर्त्यास हवेत हे सांगण्यास चिपळूणकर विसरत नाहीत.

गोपाळ गणेश आगरकर यांनी भाषांतर म्हणजे काय, हा विचार मांडलेला नाही. परंतु प्रामुख्याने इंग्रजी नाटकांचे मराठीत भाषांतर कसे करावे, व त्यातल्या त्यात शेक्सपीअरच्या नाटकांचे भाषांतर कसे असावे, याबाबत ते आपल्या 'षट्-सूत्री' द्वारा विचार मांडतात.

१) भाषांतर करणाऱ्याने होता होईल तो ते मुळास धरून करावे.

२) देशकालमानानुरोधास्तव किंवा मराठी रीतरिवाजास्तव सढळ हाताने फेरफार करून भाषांतर करू नये.

३) परस्परविरोधी असे इंग्रजी-मराठी विचार एकत्र करून गंगाजम्नी अगर गोळकी भाषांतर करण्यापेक्षा फक्त कथानक मात्र घेऊन नवीनच नाटक लिहावे.

४) गोळकी भाषांतराने असंबद्धता येते. पाश्चात्त्य रीतरिवाज आपल्या रंगभूमीवर आणल्याने ते लोकांस प्रिय होतील, हे निःसंशय.

५) नाटकांची वा भाषांतराची भाषा शक्यतो शुद्ध असावी. पात्रानुरोधाने चांगली वाईट भाषा घालणे योग्य नव्हे.

६) नाटक हे सृष्टीचे हुबेहूब चित्र आहे हे म्हणणे खोटे. नाटकांतील मनोवृत्तीचे वर्णन सत्याहून अधिक असते. अतिशयोक्ती हा रसाचा आत्मा असल्यामुळे व्यवहार आणि नाटक यांचा मेळ घालू नये.'

(विकारविलसित–प्रस्तावना १८८२)

आगरकरांप्रमाणेच तत्कालीन विचारवंत व साहित्यिक **हरि नारायण आपटे, शिवराम सीताराम वागळे, खंडेराव भिकाजी बेलसरे** यांनी भाषांतरविषयक स्वतंत्र व्याख्या वा विचार मांडलेले नाहीत. त्यांचीही विचारसरणी प्रामुख्याने 'मूळ अर्थाला धक्का न लावता एका भाषेतील साहित्य दुसऱ्या भाषेत उतरविणे' हीच आढळते. त्यांच्या मतावर तत्कालीन विचारसरणीचा पगडा जाणवतो. बेलसरे यांनी शेक्सपीअरच्या बऱ्याच नाटकांची भाषांतरे केलेली असल्याने ते हा विचार स्पष्ट करताना म्हणतात, 'भाषांतर म्हणजे एका भाषेतील वाक्याचा अर्थ दुसरीत नेला असता त्याचे भाषांतर झाले म्हणावयाचे.'

या मराठी विचारवंतांच्या भाषांतरविषयक संकल्पना विचारात घेता एक गोष्ट स्पष्ट होते की, भाषांतर ही संकल्पना संस्कृतमध्ये होती पण त्याचा 'शास्त्र'-दृष्ट्या विचार केला गेला नसल्याने 'भाषांतरविषयक' स्वतंत्र असा विचार मराठीत आला नाही. पाश्चात्त्य साहित्यिकांनीच ही संकल्पना जोपासली व वाढविली. त्या दृष्टीने पाश्चात्त्य साहित्यात भाषांतरविषयक विचाराचा झालेला विकास इतिहासाच्या माध्यमातून पाहणे आवश्यक आहे.

भाषांतर विचारांच्या विकासाचा इतिहास

१६ व्या शतकात बगदादसारख्या प्राचीन शहरात अरेबिक भाषेतील हस्त-लिखित ग्रंथ लॅटिन भाषेत अनुवादित करण्याची विद्यालये स्थापन झाली होती. त्यानंतरच्या काळातही ॲरिस्टॉटलच्या प्रख्यात ग्रंथांची भाषांतरे अन्य युरोपीय भाषेत करण्याची पद्धत भाषाकोविदांत रूढ झाली. इतका हा प्राचीन काळ सोडला तरी १७ व्या शतकापासून, म्हणजेच एलिझाबेथ राणीच्या कारकीर्दीपासून, इंग्रजी भाषेत भाषांतराचे एक पर्व सुरू झालेले आढळते. त्यामुळेच १७९२ च्या सुमारास **अलेक्झांडर टिटलर** (Alexander Fraser Tytler) याचा भाषांतराच्या मूलभूत तत्त्वाविषयीचा "Essay on the Principles of Translation' हा निबंध तयार झाला. भाषांतर कलेचे तंत्र व मंत्र विशद करणारा हा पहिलाच ग्रंथ होय. त्याने मांडलेली त्रिसूत्री अशी.

1) A translation should give a complete transcript of the ideas of the original work. मूळ ग्रंथातील कल्पनांचा सम्यक आविष्कार स्वभाषेत– भाषांतरात उतरला पाहिजे.

2) The style and the manner of writing should be of the same character as that of the original. मूळ ग्रंथातील भाषेची शैली व वळण त्याच्या वैशिष्ट्यांसह भाषांतरित ग्रंथात-कलाकृतीत आली पाहिजे.

3) A translation should have all the ease of original composition. मूळ ग्रंथातील विचाराची (आशय) व रचनेची (अभिव्यक्ती) सर्वांगीण सहजता भाषांतरित कलाकृतीत उतरली पाहिजे.

टिटलरच्या (Tytler) त्रिसूत्री तत्त्वज्ञानाच्या प्रकाशात एडवर्ड फिट्झेराल्ड (Edward Fitzerald) याने उमरखय्यामच्या 'रुबाया' १८५९ मध्ये इंग्रजीत भाषांतरित केल्या. या भाषांतराचे फिट्झेरॉल्डने तीन वेळा पुन्हा संस्करण केले.

१८६१ मध्ये **मॅथ्यु ॲरनॉल्ड** (Mathew Arnold) या प्रसिद्ध कवी व समीक्षकाने 'On translating Homer' या नावाचा साठ पानी निबंध लिहिला. यात त्याने भाषांतर कलेची काही गमके– (Norms) प्रतिपादन केली आहेत. त्यांच्या

मते ' A translation should affect us, in the same way as the original may be supposed to have affacted its first readers.' मूळ कलाकृतीचा जो परिणाम प्रारंभीच्या वाचकांवर झाला असेल तोच व तसाच परिणाम भाषांतरित कलाकृतीद्वारे वाचकांवर व्हावयास पाहिजे. मूळ ग्रंथातील सौंदर्याची परिणामकारकता भाषांतरित कलाकृतीतही प्रत्ययास आली पाहिजे.

प्रो. न्यूमन (Prof. F. W. Newman) याने मॅथ्यु ॲरनॉल्डच्या निबंधाला उत्तर देण्याच्या निमित्ताने एक स्वतंत्र लेख लिहिला. त्याच्या मते 'The translation is a translation and not an original Composition.' (भाषांतर हे मूळाबरहुकूमच असावे, ते स्वतंत्र रचनात्मक नसावे.)

' On Translation ' या पुस्तकात **रुबेन ब्रोअर** (Ruben Brower) याने आपले विचार मांडताना म्हटले आहे, 'परकीय ग्रंथात जे अपरिचित आहे ते आपल्या परिचित शब्दांत अशा कौशल्याने मांडावे की, प्रारंभी वाटणारी अपरिचित संकल्पना ही आपल्या नेहमीच्या परिचयाची वाटावी.'

नवकाव्याचा प्रणेता अमेरिकन कवी **एझरा पॉऊंड** यानेही 'मूळ कलाकृतीसारखाच परिणाम भाषांतरित कलाकृतीने साधावा ' असे म्हटले आहे.

भाषांतरविषयक विकासाचा हा टप्पा जसा इंग्रजी साहित्यात आढळतो तसा मराठी साहित्यात याचा विचार व ओघानेच विकास झालेला आढळत नाही. इंग्रजी भाषेच्या ज्ञानार्जनातून भाषांतराची कल्पना आपण मराठी साहित्य समृद्ध करण्यासाठी आत्मसात केली.

भाषांतरविषयक मतांचा विचार मांडत असताना प्रत्येक साहित्यिकाने– लेखकाने– आपापल्या स्वतंत्र कल्पना साधार स्पष्ट केल्या आहेत. त्यात प्रामुख्याने भाषांतराच्या संकल्पना, भाषांतराच्या कसोट्या, भाषांतरकर्त्याची गुणवत्ता, भाषांतरातील अडचणी व त्यांची परिहार्यता, भाषांतराचे प्रकार इत्यादी गोष्टींचा समावेश होतो. भाषांतरविषयक पाश्चात्त्य व मराठी विचारवंतांच्या ' संकल्पनां ' चा विचार येथे केल्यानंतर भाषांतराच्या कसोट्यांचा विचार येतो.

ड्रायडनने १) शब्दशः भाषांतर २) आशयनिष्ठ भाषांतर ३) अनुकृतिरूप भाषांतर असे तीन प्रकार सांगितले आहेत. विज्ञान-निष्ठ ग्रंथाचे भाषांतर शब्दशः व्हावे. त्यात मूळ शब्द व त्याला यथातथ्य अर्थ सांगणारा प्रतिशब्द जमला म्हणजे झाले. उदा. ' Atom ' यास ' अणू ' हा मराठी शब्द सापडला की शब्दशः काटेकोर भाषांतर ठरेल. या प्रकारात परिभाषा महत्त्वाची, शब्दांचे भावसौंदर्य– लालित्य गौण. व्यवहारातही आपण शब्दास प्रतिशब्द ठेवण्याचेच धोरण बाळगतो. आगगाडीत Smoking prohibited ही सूचना 'धूम्रपान निषिद्ध' अशा भाषांतरात आपण बघतो.

ललित वाङ्मयातील शब्दांचे अर्थ संदर्भानुसार बदलतात. त्यात व्यक्तिनिष्ठेचाही प्रभाव जाणवतो. कथा-कादंबरी-नाटक यांत हा प्रकार आढळतो. तिसऱ्या प्रकारात भाषांतरकर्त्याला भरपूर सवलत व स्वातंत्र्य असते. स्वैर रूपांतर म्हटले की बंधने कमीच ठरतात.

कसोट्या

भाषांतर करीत असताना भाषांतरकर्त्याने काही प्राथमिक तत्त्वे मनाशी ठरवून भाषांतर केले पाहिजे. आपले भाषांतर जास्तीत जास्त उत्कृष्ट तर होईलच पण मूळ अर्थाला धक्का न पोहोचता तो जसाच्या तसा भाषांतरित कलाकृतीत उतरेल याची दक्षता भाषांतरकर्त्याने घेणे आवश्यक आहे. त्यासाठी भाषांतराला काही कसोट्या ठरवून दिल्याचे आढळते. त्या कसोट्या अशा–

१) मूळ ग्रंथातील कल्पनांचा सम्यक आविष्कार स्वभाषेत–भाषांतरित कलाकृतीत– उतरणे आवश्यक आहे.

२) मूळ ग्रंथातील भाषेची शैली व वळण त्याच्या वैशिष्ट्यासह भाषांतरित कलाकृतीत आली पाहिजे.

३) मूळ ग्रंथातील आशय व अभिव्यक्ती यांची सर्वांगीण सहजता भाषांतरित कलाकृतीत उतरली पाहिजे.

४) मूळ कलाकृतीचा जो परिणाम प्रारंभीच्या वाचकांवर झाला असेल तोच परिणाम भाषांतरित कलाकृतीद्वारे तत्कालीन वाचकांवर व्हावयास पाहिजे.

५) मूळ ग्रंथातील सौंदर्याची परिणामकारकता भाषांतरित कलाकृतीतही तेवढ्याच प्रकर्षाने प्रत्ययास यावयास पाहिजे.

६) परकीय ग्रंथात जे अपरिचित आहे ते आपल्या परिचित शब्दात अशा कौशल्याने मांडावे की, प्रारंभी वाटणारी अपरिचित संकल्पना ही आपल्या नेहमीच्या परिचयाची वाटावी.

७) भाषांतरित कलाकृती ही 'भाषांतरच' वाटावे; ती नवी कलाकृती (New Creation) वाटू नये.

सारांशाने आपणास असे म्हणता येईल की, अभिजात वाङ्मयाचे भाषांतर करीत असताना प्रामुख्याने कथानकाची व निवेदनाची गतिमानता (Rapidity) कायम राखणे, मुळावर-हुकूम शब्दाचे भाषांतर करणे (plain directness) प्रथम शब्द व नंतर कल्पनांचा भाषांतरात विचार करणे (first in words and secondly in ideas), मूळ लेखकाच्या विचाराची उदात्तता (Nobleness of thoughts) कायम ठेवणे, ह्यांसारख्या गोष्टी पाळल्या जातील याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

भाषांतराच्या या कसोटया भाषांतरकर्त्याने तंतोतंत पाळल्या तर त्याचे भाषांतर उत्कृष्ट म्हणून गणले पाहिजे. या भाषांतराची गुणवत्ता अर्थात भाषांतरकर्त्याच्या गुणावरच अवलंबून असते.

भाषांतराच्या कसोटया लक्षात घेऊन भाषांतरकर्त्याने काही गोष्टी अभ्यासाने मिळवावयाच्या असतात तर काही गुण मुळातच असावे लागतात. भाषांतरकर्त्याची गुणवत्ता व त्याने आत्मसात करावयाच्या गोष्टी अशा–

१) मूळ ग्रंथाची (भाषा–परभाषा–इंग्रजी अथवा अन्य) व भाषांतर करावयाचे असलेली भाषा स्वभाषा (मराठी वा अन्य) अशा दोन्ही भाषांचे भरीव स्वरूपाचे ज्ञान आवश्यक आहे.

२) भाषांतरासाठी घेतलेल्या पाठचपुस्तकाचा–कलाकृतीचा–अभ्यास असणे आवश्यक असून त्याच्या अर्थाचे वा संदर्भाचेही आकलन असणे आवश्यक आहे.

३) परकीय– मूळ –कलाकृतीच्या भाषाशैलीच्या सौष्ठवाची व रसाळपणाची जाणीव ठेवून त्याच भाषाशैलीची स्मृती जागृत ठेवील अशी घाटदार व रसाळ भाषाशैली आत्मसात करावी. मूळ कलाकृतीची भाषा व भाषांतरित कलाकृतीची भाषा यांवर प्रभुत्व असणे आवश्यक आहे.

४) मूळ ग्रंथातील सांस्कृतिक आशय– जीवननिष्ठा, चालीरीती– भाषांतरकाराच्या भाषांतरित कलाकृतीत अशा प्रकर्षाने उतरावा अथवा व्यक्त व्हावा की, दोन संस्कृतींमधील साम्य आणि भेद वाचकांच्या सहजपणे व सुलभतेने लक्षात आणून देण्याची कुवत त्याच्या लेखनशैलीत असावी.

५) मूळ कलाकृतीला भाषांतर करण्यासारखे वाङमयीन मूल्य अथवा जीवनमूल्य असावे. भाषांतरकर्त्याने अशाच कलाकृतीची निवड करावी की, जी कलाकृती भाषांतरित होण्यासारखी, योग्यतेची असावी.

६) भाषांतरकर्ता मूळ कलाकृतीशी– पर्यायाने लेखकाशी– समवृत्ती असावा– मूळ कलाकृतीच्या वाङमयप्रकाराशी व मूळ लेखकाच्या विचाराशी, अशा दोन अर्थाने. कवीने काव्याचे भाषांतर करावे अथवा नाटककाराने नाटकाचे भाषांतर करावे, अशा पद्धतीने.

७) मूळ लेखक आणि भाषांतरकर्ता यांच्यात काही फरक असला तरी मूळ कलाकृतीमधील विचारधारा न बदलता भाषांतरात, मूळ लेखकाच्या शैलीच्या सर्व रंगढंगासह, ते मर्म उतरणे आवश्यक आहे. भाषांतरकर्त्याने आपले स्वतंत्र अस्तित्व विसरून लेखकाची मूळ कलाकृती मुळाबरहुकूम भाषांतरित करावी.

या कसोटया व ही गुणवत्ता आत्मसात करूनही भाषांतरात अनेक अडचणी निर्माण होतात.

अडचणी

उत्कृष्ट भाषांतराची अंतिम सीमा गाठून जरी भाषांतर करण्याचा प्रयत्न झाला तरी भाषांतराच्या सर्व कसोटचा प्रत्यक्षात अमलात आणणे निःसंशय कठीण काम आहे. यात प्रामुख्याने अडचणी येतात त्या दोन भाषांमधील प्रकृतिभेदामुळे, दोन संस्कृतीमधील भेदामुळे, मूळ कलावंताशी–कलाकृतीशी निष्ठा राखण्याच्या आत्यंतिक धडपडीमुळे वा स्वातंत्र्याच्या अतिरिक्त आवडीमुळे, तसेच वाङ्मय-प्रकाराच्या एखाद्या वैशिष्टचामुळेही. ह्या अडचणी प्रामुख्याने अशा–

१) एखादा ग्रंथ जर काव्यमय असेल तर त्याचे भाषांतर करणे अधिक बिकट ठरते. कारण काव्य हे लयबद्ध, वृत्तबद्ध, असते. काव्याचे रूपांतर गद्यरूपात केले तर मूळ ग्रंथातील आशय स्पष्ट मांडला जाईल पण भाषेची लयबद्धता, त्यातील चातुर्य, भाषेचे सौंदर्य व सामर्थ्य यांचा लोप होईल. वर्डस्वर्थ, शेले, इ. कवींच्या कवितांचे वा शेक्सपीअरच्या काव्यमय नाटकांचे (Free Verse) मुक्तछंदात्मक भाषांतर करणे कठीण जाते ते याकरिताच.

२) भाषांतर करताना मूळ कलाकृतीमधील शब्दाला प्रतिशब्द अनेक सापडतात; पण त्या प्रतिशब्दांपैकी अधिक अर्थपूर्ण व भावपूर्ण असा उचित शब्द–(Appropriate word) निवडणे आवश्यक असते. मूळ कलाकृतीच्या लेखकाची त्या शब्दामागची संकल्पना संदर्भानुसार व्यक्त करणारी शब्दरचना भाषांतरकर्त्याला सुचणे आवश्यक असते. काव्याचे भाषांतर करताना ही 'उचित शब्दाची निवड' फार अवघड होऊन बसते. उदा. शेक्सपीअरच्या हॅम्लेट नाटकातील words ! words ! ! words ! ! ! ही रचना. किंवा 'सती' याबद्दल अन्य शब्दात भाषांतर करणे कठीण होते.

३) विनोदाचे भाषांतर करणे कठीण जाते. कारण प्रसंगनिष्ठ विनोद व स्वभावनिष्ठ विनोद यांचे भाषांतर एकवेळ होऊ शकेल. पण शब्दनिष्ठ विनोद–विशेषत: कोटिक्रमावरील विनोद, श्लेषगर्भ विनोद अन्य भाषेत उतरविता येत नाहीत. हॅम्लेट नाटकात याची अनेक उदाहरणे सापडतात.

४) मूळ ग्रंथातील शब्दांचे माधुर्य, लयबद्धता, अर्थगर्भता, इंद्रियगत संवेदना–रूप, रस, रंग, गंध, स्पर्श–यांचा प्रत्यय भाषांतरित कलाकृतीतून शब्दांद्वारे वाचकांना जाणवून देणे कठीण असते. उदा. हॅम्लेटची स्वगते वा परभाषेतील कविता.

५) मूळ ग्रंथकर्ता व भाषांतरकर्ता हे समानधर्मी नसतील तर भाषांतर अव्वल दर्जाचे होण्यास अडचणी येतील. एडवर्ड फिट्झेरॉल्ड या अनुवादकाने–भाषांतरकर्त्याने–उमरखय्यामच्या रुबाया लिहिल्या त्या त्याच्या समानधर्मीयत्वामुळे आणि माधव ज्यूलियन यांनाही उमरखय्यामशी त्यांच्या कलंदर, तत्त्वपिपासू

वृत्तीमुळेच समधर्मी राहता आले.

६) परकीय भाषेतील अपरिचित संकल्पना स्वभाषेत उतरविणे कठीण जाते. मूळ ग्रंथातील अपरिचित संकल्पना ही, विसंगती व अपरिचितता न जाणवू देता स्वभाषेत उतरविणे कठीण जाते. उदा. 'Ball Dance' सारखे शब्द.

७) मूळ ग्रंथाची भाषा व भाषांतरकर्त्याची भाषा एकाच स्तरावर कमालीचे सामर्थ्य दर्शवीत असेल तर भाषांतर करणे कठीण जाते. दोन्ही भाषांचे भाषावैभव, शब्दसंग्रह विपुल असणे आवश्यक आहे. दोघेही भाषाप्रभू असणे आवश्यक आहे.

प्रत्येक कालखंडात बोलीभाषेतील शब्दांना वा संवादांना विशिष्ट अर्थ प्राप्त झालेला असतो. कालाच्या ओघात पुढे तो अर्थ लुप्त होतो. अशा वेळी मूळ कलाकृतीमधील तत्कालीन अर्थाचा संदर्भ लावणे आवश्यक असते. येथे भाषांतर करणे जोखमीचे काम असते. (शेक्सपीअरकालीन शब्दांचे तत्कालीन अर्थ व संदर्भ आपणास शोधणे कठीण जाते.)

८) भाषाविषयक अभ्यासाचे मानसशास्त्र (Linguistic psychology) अवगत नसेल तर भाषांतर करणे कठीण होते. मूळ कलाकृतीतील–ग्रंथातील भावना कोणत्या मनोवृत्तीतून प्रगट झाली आहे हे जाणून घेणे आवश्यक आहे. (भाषेची जात)

सांस्कृतिक परिवर्तन

९) भाषेभाषेत अनेक प्रकारची तफावत असते. कित्येक भाषेत शब्दसंग्रह त्रोटक असतो तर कित्येक भाषेत भरपूर. कित्येक भाषेत शब्दसिद्धीची सोय पुष्कळ असते तर कित्येक भाषेत ती फारच मर्यादित असते. कित्येक भाषेत अशा काही कल्पना असतात की, त्या दुसऱ्या भाषेत व्यक्त करताच येत नाहीत. मराठी भाषेतील 'इश्श' या शब्दाचे इतर भाषेत भाषांतर कठीणच नव्हे, तर अशक्य आहे. अशा कल्पना, भावना व्यक्त केल्याच तर त्या सारांशाने येतात. प्रत्येक भाषेची प्रकृती स्वतंत्र असल्यानेच ही अडचण उद्भवते.

१०) मूळ ग्रंथातील प्रश्नार्थक वाक्ये, उद्गारवाचक वाक्ये, भावनात्मक वाक्ये यांचे भाषांतर त्याच पद्धतीने होणे आवश्यक असते. पण तेच अवघड होऊन त्यातील रहस्य व मौज नष्ट होते.

११) प्रत्येक भाषेतील अलंकार, म्हणी, वाक्प्रचार हे स्वतंत्र असतात. भाषिकभेदातून व सांस्कृतिक भेदांतून हे भिन्नत्व आल्याने त्याला तुल्यबळ असा प्रतिशब्द भाषांतरात मिळणे कठीण जाते.

१२) मूळ कलाकृती ही एक स्वतंत्र निर्मिती असते. भाषांतर ही त्याची प्रतिकृती असते. म्हणूनच मूळ कलाकृतीचा आभास म्हणजे भाषांतर असल्याने ते

तंतोतंत असणे शक्यच नसते.

प्रकार

भाषांतर करण्यास येणाऱ्या अडचणींमुळेच भाषांतरात दोन संप्रदाय निर्माण झाले. शब्दानुवाद व भावानुवाद असे ते दोन संप्रदाय.

१) शब्दशः भाषांतर म्हणजे शब्दानुवाद (Verbal Translation). यात मूळ लेखकाशी प्रामाणिक राहाण्याचा अतिरिक्त हव्यास भाषांतरकर्त्यात असतो. त्यामुळेच यात कळत नकळत एक उणीव राहते. शब्दांचा गुलाम बनल्यामुळे अशा भाषांतरात रसहानी संभवते व मूळ लेखक चुकीच्या पद्धतीने भाषांतरित कलाकृतीत अभिव्यक्त होण्याची दाट शक्यता असते.

उदा.– गीतेचा आशय मराठीत आणण्यात वामन पंडितांची यथार्थदीपिका व विनोबांची गीताई अपुरी वाटते.

२) आशयानुरूप भाषांतर म्हणजेच भावानुवाद. (Spiritual Translation) - यात भाषांतरकार रसिकता दर्शवीत असल्याने व मूळ लेखकाशी समानधर्मी बनत असल्याने हे भाषांतर आशयाला अधिक प्राधान्य देते. असे करीत असताना स्वतंत्र काव्य अथवा भाष्य करण्याचा मोह भाषांतरकाराला पडण्याची शक्यता असते. भाषांतराऐवजी स्वतंत्र निर्मितीचा धोका पत्करावा लागतो. यात मूळ लेखकाचे वर्चस्व झुगारून दिलेले असते.

उदा.– गीतेवरील ज्ञानेश्वरांचे भाष्य 'भावार्थदीपिका' अथवा 'ज्ञानेश्वरी'.

हे भाषांतर हेतुतः केले आहे अथवा नकळत झाले आहे, याचा विचार येथे होत नाही. भाषांतराचा प्रकारच फक्त येथे लक्षात घेतला पाहिजे. शेक्सपीअरकृत नाटचमालाकार खंडेराव भिकाजी बेलसरे हे याच प्रकाराला 'रूपांतर' अशी संज्ञा देतात.

३) संहार– विक्षेप– लघुक्रिया– 'शब्दास शब्द' भाषांतराचे ठेवावयाचे व रूपांतराचे (आशयानुरूप) गुण साधून दोष मात्र होऊ न देण्याची तजवीज करावयाची. अशा वेळी मराठीत यथास्थित उतरण्यासारखा एखादा भाग नसेल तर तो भाग उतरविण्याची व्यर्थ जिकीर न करता त्यास किंचित फाटा देणे योग्य वाटल्यास द्यावयाचा. यात मुख्य गोष्ट म्हणजे ही की, एक मूळ ग्रंथाच्या घटनेत बिलकुल ढवळाढवळ करावयाची नाही. स्थळांची, मनुष्यादिकांची नावे, आतले कथानक, व्यक्तींचे परस्परसंबंध, त्यांचे स्वभाववर्णन, भाषणादी व्यवहारातील खुणा, मुळाबरहुकूम कायम ठेवून चालावयाचे. खंडेराव भिकाजी बेलसरे यांनी आपल्या कल्पनेचे स्पष्टीकरण असे मांडलेले आहे.

भाषांतराच्या या तीन संप्रदायांत दोनच मान्य केले गेले, अमलात आणले

गेले. बेलसरे यांनी मांडलेली 'संहार– विक्षेप– लघुक्रिया' ही संकल्पना त्यांच्या-पुरतीच मर्यादित राहिलेली आढळते.

भाषांतरांचे शब्दशः भाषांतर व आशयानुरूप भाषांतर हे संप्रदाय मूळ लेखकाशी निष्ठा असावी की भाषांतरकाराने स्वातंत्र्य घ्यावे यावरूनच प्रायः निर्माण झालेले आढळतात.

१७ व्या शतकातील **अर्ल रोस्कोमन** याच्या मते, मूळ लेखकाशी भाषांतर-कर्त्याने निष्ठा ठेवावी. 'Essay on Translated Verse' या त्याच्या निबंधात हा विचार मांडताना त्याने मूळ लेखकाशी भाषांतरकाराचे आशय व अभिव्यक्ती यामधील सख्य कसे असावे याबाबत एक सुभाषित मांडलेले आहे–

'Fall when he falls, and rise when he rises.'

William Cowper– विल्यम कूपर याचेही मत या संदर्भात 'लेखकाशी निष्ठा राखण्याबाबत' असल्याचे आढळते. त्याच्या मते, 'भाषांतर' या शब्दातच हा अर्थ अभिप्रेत आहे. भाषांतराचे मुख्य तत्त्वच मुळाबरहुकूम लिहिणे होय. "Fidelity indeed is the very essence of translation and the term itself implies it." हे मान्य करूनही पुढे तो म्हणतो, "मुळाला बाध न आणता भाषांतरकर्त्याने त्या आविष्कारात भाषांतरित कलाकृतीत– थोडेसे लालित्य आणले तर ती कलाकृती अधिक रोचक होईल.

Alexander Tytler– अलेक्झांडर टिटलरच्या मतेही मूळ लेखकाशी निष्ठा ठेवण्याची कल्पना आढळते. त्याच्या मते जर मूळ लेखकाला जे सांगावयाचे आहे त्यात काही संदिग्ध असेल किंवा त्याच्या एखाद्या अवतरणातून अनेक अर्थ अभिप्रेत होत असतील तर त्या ग्रंथाच्या भाषांतरकर्त्याने सारासार विचार करून त्यातल्या त्यात मूळ कलाकृतीला जो अर्थ जवळचा आहे असे भाषांतरकर्त्याला प्रामाणिकपणे जाणवत असेल तोच अर्थ भाषांतरात भाषांतरकर्त्याने मांडण्याचे स्वातंत्र्य घ्यावे. मात्र असे करीत असताना मुळातच जर विचाराची विसंगती असेल तर भाषांतरकाराने भाषांतर करताना ती विसंगती टाळावी. कारण सरतेशेवटी भाषांतर हे लेखनही एक परिपूर्ण कलाकृती ठरली पाहिजे.

तसेच बरेच वेळा शब्दाला अनेक प्रतिशब्द निघू शकतात, पण त्या सर्वांचाच वापर करून अनुवादकाने वैचारिक गोंधळ करू नये. तर त्यांपैकी उचित व समर्पक शब्द निवडावा. भाषांतरात तो शब्द अत्यंत ग्राह्य व सहज वाटावा म्हणून मूळ कलाकृतीत काट-छाट वा भर घालण्याचा अधिकार अथवा स्वातंत्र्य भाषांतर-कर्त्याला असावे. मात्र या काटछाटीत कोणत्याही परिस्थितीत विचाराचा मूळ धागा न सुटता, ती कलाकृती निर्जीव न बनता, एक सहजस्फूर्त असे भाषांतर वाटावे.

प्रो. न्यूमन (Prof. F. W. Newman) यांनी शब्दशः भाषांतरावर अधिक

जोर दिलेला आढळतो. म्हणजेच मूळ लेखकाशी निष्ठा ठेवण्याचीच कल्पना येथे अभिप्रेत आहे. भाषांतर हे भाषांतरकाराचे स्वतंत्र कवित्व न बनता ते शब्दशः भाषांतरच राहिले पाहिजे असा आग्रह ते धरतात.

विष्णुशास्त्री चिपळूणकरही भाषांतरकर्त्याचे स्वातंत्र्य मानत असले तरी मर्यादित अर्थाने. देशकालमानानुसार हे फेरफार अत्यंत आवश्यक असल्याने भाषांतरकर्त्याने चालीरीती, पोशाख, भाषा, जीवनसंकेत यांनुसार बदल करण्याचे स्वातंत्र्य घ्यावे परंतु त्यांच्या मतेही " भाषांतरकर्त्याचे काम मूळ ग्रंथात चांगला किंवा वाईट कोणत्याही तऱ्हेचा फेरफार करण्याचे नाही. जसे मुळात असेल त्यासारखे त्याने अन्य भाषेत उतरून दिले म्हणजे झाले." टिटलर (Tytler) प्रमाणेच चिपळूणकरही– " (१) संविधानकाशी अत्यंत निकटचा संबंध असलेल्या व मुख्य सूत्राशी टाळता न येणाऱ्या संघर्षाचे मर्म असलेल्या गोष्टी जशास तशा ठेवणे आवश्यक मानतात. (२) लेखकाची मुख्य खुबी, स्वभाववैचित्र्य व यथार्थवर्णनकौशल्य साधावे. (३) भाषांतर हे भाषांतरित कलाकृती न वाटता भाषेशी एकरूप झालेले असावे." या मतांचा पुरस्कार करतात. भाषांतरित कलाकृतीचे स्वतंत्र वाचन केले तर मूळ कलाकृतीची भाषा माहीत नसलेल्यांना ते भाषांतर हे भाषांतरित कलाकृतीला जवळचे वाटावे इतके ते मुळाबरहुकूम असावे असा आग्रह धरतात.

गोपाळ गणेश आगरकर यांनी 'भाषांतर करणाऱ्याने होता होईल तो ते मुळास धरून करावे' ही मतप्रणाली स्वीकारली ती सांस्कृतिक व भाषिक भेद यांच्या मर्यादा लक्षात घेऊनच.

हरि नारायण आपटे यांच्या मते भाषांतरे शब्दशः न करता वाक्यशः करावीत. ते भाषांतरकर्त्याचे स्वातंत्र्य मानतात. " भाषांतर करावयाचे असल्यास शब्दशः न करता वाक्यशः अर्थ काढून तो (मराठी) भाषेत लिहावा. त्यात रसभंग अथवा मूळ प्रकृतिवर्तनभंग होऊ देऊ नये. ज्यास आधार-रचना करावयाची असेल त्याने आधी हाती घेतलेल्या कलाकृतीमधील रीतीभाती व काल हा आपल्या इकडील कोणाच्या काळाशी जमतील व त्यांचे परिपूर्ण संमेलन कसे व कोठे घालता येईल इत्यादी गोष्टींचा चांगला विचार करून त्या त्या काळाची व स्थळाची आणि रीती-भातींची योजना करावी. नंतर एक एक भाषण अगर भाषणातील काही भाग वाचून पुस्तक एकीकडे ठेवावे व वाचलेल्या भाषणाचे नीट मनन करून आपल्या प्रस्तुतास जुळेल त्या रीतीने रसभंग न होऊ देता भाषांतर लिहावे." या मतावरून हरि नारायण आपटे हे शब्दशः भाषांतर मानीत नाहीत हे स्पष्ट होते. तरीही 'आशय कायम राखण्याचा' आग्रह ते धरतात.

शिवराम सिताराम वागळे हे शब्दशः भाषांतरावरच जोर देतात. भाषांतर-

काराने केलेला कोणताही बदल ते मान्य करीत नाहीत. मूळ लेखकाशी अतिरिक्त निष्ठा राखण्याच्या संप्रदायात वागळे मोडतात. मूळ कलाकृतीत भाषांतरकर्त्याला कोणत्याही बदलाचे स्वातंत्र्य नसावे ही त्यांची ठाम भूमिका आहे. त्यांच्या मते, "एका भाषेतून दुसऱ्या भाषेत भाषांतर करावयाचे आहे तर ते **साधेल** तेवढे शब्दशः केले पाहिजे. मुळातील शब्द सोडू नयेत. किंवा मुळात नसलेले शब्द घालू नयेत. एवढेच नव्हे, तर मुळातील विशेषनामे, मुळातील रीतीरिवाज, आचार-विचार इत्यादी जसेच्या तसे ठेविले पाहिजे. मुळातील नावे व रीतरिवाज कदाचित भाषांतरात चमत्कारिक वाटतील, परंतु त्याला भाषांतरकाराचा नाइलाज आहे व त्याबद्दल त्याला कोणी दोष देऊ नये." वागळे यांच्या वरवर वाटणाऱ्या अतिरेकी मताशी– मूळ लेखकाशी निष्ठा ठेवण्याबाबत– 'साधेल तेवढे शब्दशः केले पाहिजे' ही विचारसरणी येतेच. या दृष्टीने वागळे यांनी आगरकरांच्या हॅम्लेटच्या भाषांतरावर– विकारविलसित या नाटकावर– कठोर टीका केलेली आहे.

डॉ. प्रा. **महेश्वर अनंत करंदीकर** यांनाही भाषांतरकारास दिलेले स्वातंत्र्य मान्य नाही. त्यांच्या मते, 'भाषांतर याचा अर्थ इंग्रजीतील– कोणत्याही भाषेतील– शब्दन् शब्दाचे, कल्पनेचे मराठी भाषेने– भाषांतराची भाषा– केलेले कथन होय. असे असताना जर बदल मान्य केले तर ते भाषांतर ठरणार नाही.' भाषांतरकाराने घेतलेल्या या स्वातंत्र्यानुसार करंदीकर 'भाषांतर, रूपांतर व अनुवाद' असे तीन पक्ष पाडतात. व त्यांतील फरक स्पष्ट करतात.

त्यांच्या मते भाषांतर हा उत्कृष्ट पक्ष, रूपांतर हा गौण पक्ष आणि अनुवाद हा निकृष्ट पक्ष ! हा विचार मराठीत प्रथमच करंदीकरांनी मांडला. यातून भाषांतराच्या मर्यादा मार्मिकतेने व विचारार्ह पद्धतीने त्यांनी मांडलेल्या आहेत. व भाषांतरात कोणताही बदल त्यांना मान्य नसल्याचे स्पष्ट केले आहे.

मुळातील नावाप्रमाणेच चालीरीती, नातीगोती, स्थळ-काळ बदलणे या गोष्टी अयोग्य असून मुळातील भाषेला शब्दभेदांनी स्थानिक घटनांसाठी (महाराष्ट्रियन– गुजराथी) राबविणे त्यांना मान्य नाही. एखाद्या इंग्रजी वा अन्य शब्दाचे भाषांतर एका प्रतिशब्दाने स्पष्ट होत नसेल तर दोन शब्दांनी व क्वचितप्रसंगी तीन शब्दांनी भाषांतर करणे ही त्या शब्दाच्या भाषांतराची कमाल मर्यादा करंदीकर मानतात.

संकल्पनांतील मतभेद

विद्यमान विचारवंतांच्या भाषांतरविषयक मतांत कधीच एकवाक्यता आढळणार नाही. त्यांच्या प्रत्येकाच्या संकल्पना एकमेकांपासून भिन्न स्वरूपाच्या आढळतात. हे मतभेद सर्वच देशात आजतागायत आढळून येतात. भाषांतरविषयक

या कल्पना इतक्या परस्परविरोधी आहेत की, त्याला पर्याय नाही. " Principles of Translation " या लेखात Theodore Savory याने अशा परस्परविरोधी मतांच्या जोड्या दिल्या असून भाषांतराची कल्पना, प्रक्रिया किती अडचणीची व कठीण आहे हे सांगितले आहे. त्याने मांडलेल्या परस्परविरोधी मतांच्या जोड्या अशा–

१) A Translation must give the words of the original. भाषांतरात शब्दाला प्रतिशब्द असावा.

२) A Translation must give ideas of the original. भाषांतरात मूळ कलाकृतीच्या कल्पनांचा आविष्कार असावा.

३) A Translation should read like an original work. भाषांतर वाचत असताना मूळ कलाकृती वाचल्यासारखे वाटावे.

४) A Translation should read like a Translation. भाषांतर हे भाषांतरित कलाकृती आहे असे वाटावे.

५) A Translation should reflect the style of the original. भाषांतरात मूळ लेखकाची भाषाशैली प्रतिबिंबित व्हावी.

६) A Translation should possess the style of the translator. भाषांतरात भाषांतरकर्त्याच्या लेखनशैलीचा प्रत्यय यावा.

७) A Translation should read as a contemporary of the original. भाषांतरात मूळ ग्रंथातील कालखंडाचा प्रत्यय यावा.

८) A Translation should read as a contemporary of the translator. भाषांतरात भाषांतरकर्त्याच्या कालखंडाचे दर्शन व्हावे.

९) A Translation may add to or omit from the original. भाषांतरात मूळ कलाकृतीत नसलेला शब्द अधिक लिहावा अथवा मुळातील शब्द वगळावा.

१०) A Translation may never add or omit from the original. भाषांतरात मूळ कलाकृतीमधील शब्द वगळू नयेत अथवा मुळापेक्षा अधिक लिहू नयेत.

११) A Translation of verse should be in prose. काव्याचे भाषांतर गद्यात करावे.

१२) A Translation of verse should be in verse काव्याचे भाषांतर काव्यातच करावे.

भाषांतरविषयक या परस्परविरोधी मतांचा विचार केला तर असे दिसून येईल की, भाषांतराचे शास्त्र हे जागतिक मान्यता पावलेली शाश्वत मूल्ये नसून

ती कलात्मक मूल्ये आहेत. भाषांतर ही एक कला आहे. हे गृहीत धरूनच त्याची शास्त्रावर उभारणी केलेली आहे. आणि म्हणूनच मूळ लेखकाच्या भाषाशैलीचे सर्व रंगढंग भाषांतरात उतरवीत असताना 'मूळ आशय कायम राहील' याची दक्षता तेवढी भाषांतरकाराने घ्यावी ही मतप्रणाली सामान्यपणे मान्य झाली.

भाषांतरविषयक मतभेदांची ही चर्चा पाहिली की, इंग्रजीतील एक चटकदार वचन आठवते.

"Translation is always like a woman,– either faithful or beautiful !

* * *

ग्रंथांची भाषांतरे होत असली तरी भाषांतर-मीमांसा ही फारशी प्रगत झालेली नाही. आजकाल भाषांतरित दर्जेदार कथा-कादंबरीपेक्षा सामान्य दर्जाचे ललित साहित्य वाचणेच लोक पसंत करतात. हे पाहिले की भाषांतरविषयक शास्त्र-चिकित्सा लोकप्रिय होणे फार नजीकचे वाटत नाही. दोन अथवा अधिक भाषांचा स्वतंत्रपणे अभ्यास होईल, पण तौलनिक अभ्यास होण्याकडे कल नाही. भाषांतराचे "स्वैर अनुवाद करण्याप्रमाणेच वाङ्मयचौर्य करण्याकडेच लेखकांचे लक्ष आकृष्ट होते." असे मत प्रा. भालचंद्र नेमाडे यांच्यासारखे समीक्षक व्यक्त करतात हेही विसरता येत नाही. ('संशोधनाची क्षितिजे' पृष्ठ १४१)

भाषांतराबद्दल अनेक मूलभूत प्रश्न उत्पन्न होतात–

१) भाषांतर मुक्त असावे की मुळावरहुकूम ?

२) भाषांतराला व्युत्पत्ती हवी की प्रतिभा ?

३) भाषांतर हे शास्त्र की कला ?

४) भाषांतर मूळ भाषेतल्यासारखे की वेगळे असावे ?

५) भाषांतरातला काळ, शैली, संस्कृतिचित्रण मुळासारखे, की बदलत्या काळानुसार त्यात फेरफार हवेत ?

६) भाषांतर मातृभाषेत करावे की परभाषेतही ?

७) भाषांतराची प्रयोजने कोणती ?

या सर्व प्रश्नांचा ऊहापोह करताना भाषांतरविषयक संकल्पना स्पष्ट हवी. "भाषांतर ही एका संहितेचे एका भाषिक सांस्कृतिक आवरणांतून दुसऱ्या भाषिक सांस्कृतिक आवरणात स्थानांतरण करणारी द्विभाषिक प्रक्रिया आहे." हा प्रा. नेमाडे यांचा इशारा डोळ्यांआड करून चालणार नाही.

भाषांतरासाठी भाषाशास्त्र व मानसशास्त्र यांचाही अभ्यास हवा. मूळ भाषेच्या शब्दार्थव्यवस्थेस जुळणारी दुसऱ्या भाषेतील शब्दार्थव्यवस्था असेल तर

भाषांतर सुलभ ठरेल. अन्यथा भाषांतरात मूळ भाषेतील अर्थाची हानी होणे अपरिहार्य ठरते.

भाषांतर करीत असताना काही महत्त्वाच्या सूचना :

१) भाषांतरकर्त्याचे काम हे मूळ लेखकापेक्षाही अधिक कष्टाचे व महत्त्वाचे आहे. कारण स्वभाषेतील लेखक मूळ लेखन करीत असताना भरपूर स्वातंत्र्य घेऊ शकतो; मग ते स्वातंत्र्य शब्दनिवडीचे असो, कल्पनाविलासाचे असो, विषय कमी-जास्त करण्याचे असो; परंतु भाषांतरकर्त्याला मूळ लेखकाच्या कलाकृतीतील मर्यादांना सांभाळूनच लिहावे लागते. त्यात स्वतःच्या इच्छेनुसार फेरफार करण्याचा अधिकार वा स्वातंत्र्य त्यास नसते.

२) या बाबतीत भाषांतरकर्त्याने बारीकसारीक, वरपांगी क्षुद्र वा क्षुल्लक वाटणाऱ्या तपशिलाबाबतही जागरूक राहिले पाहिजे. मूळ लेखकाच्या एखाद्या विशिष्ट शब्दाला प्राप्त झालेला अन्वयार्थ व संदर्भ जसा त्याने लक्षात घेतला पाहिजे, तसा त्या शब्दांच्या मांडणीतील बारीकसारीक विरामचिन्हांचाही (pause) त्यांनी डोळस अभ्यास केला पाहिजे. कारण एखाद्या लहानशा स्वल्प-विरामानेही अर्थाचा अनर्थ होऊ शकतो किंवा शब्दाला योग्य असे अनेक पर्यायी शब्द असतात पण त्यांपैकी कोणता शब्द नेमका निवडावा त्याचा विचार भाषांतर-कर्त्याने करावयास हवा.

The Art of Translation या पुस्तकात थिओडोर सॅव्हेरी (Theodore Savory) म्हणतात की, प्रत्येक भाषांतरकर्त्याने मूळ कृतीचे भाषांतर करत असताना स्वतःच्या मनाला पुढील प्रश्न विचारले पाहिजेत–

१) What does the author say ? लेखकाला काय म्हणावयाचे आहे ?

२) What does he mean ? तो काय सांगतो ? लेखकाचा लेखनामागील हेतू काय ?

३) How does he say it ? (आणि) लेखक तो कसे सांगतो ?

हा विचार मांडत असताना लेखक स्पष्टपणे व शांतपणे सांगत आहे, की काही आवेशाने सांगत आहे, की काही प्रेरणेने वक्तृत्वपूर्ण शैलीत सांगत आहे, की त्याद्वारे त्याला त्याच्या वाचकांची मने ढवळून काढावयाची आहेत याचाही विचार अंतर्मुख व मूळ लेखकाशी एकरूप होऊन भाषांतरकर्त्याने केला पाहिजे. असे केले तर त्याचे भाषांतर वा अनुवाद मूळ लेखकाला न्याय देणारा होईल.

(या संदर्भात स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांनी इटालियन देशभक्त जोसेफ मॅझीनी याचे चरित्र अनुवादित वा स्वैर रूपांतरित करीत असताना घेतलेली खबरदारी ही लक्षणीय आहे.)

भाषांतर कोणासाठी ?

कोणत्याही भाषेतील वाङ्मयसमृद्धीसाठी भाषांतराची प्रक्रिया हे एक उपयुक्त साधन आहे. सांस्कृतिक व भाषिक भिन्नता लक्षात घेऊन ज्याप्रमाणे भाषांतराची प्रक्रिया अमलात येते, त्याचप्रमाणे भाषांतर करीत असताना काही विशिष्ट हेतू नजरेसमोर ठेवून भाषांतर केले जाते. काही भाषांतरे कुतुहलापोटी केली जातात, काही विद्यार्थ्यांकरिता केली जातात, काही सामान्य वाचकांपर्यंत एखादी कलाकृती पोहोचविण्याकरिता केली जातात.

१) ज्या वाचकांनी मूळ ग्रंथ वाचला नसेल पण त्या ग्रंथाविषयीचे उल्लेख त्यांनी ऐकले असतील आणि त्या मूळ ग्रंथाच्या भाषेचे ज्ञान त्यांना अवगत नसेल, पण त्यापोटी कुतुहल आहे अशा वाचकांसाठी भाषांतरे केली जातात.

२) मूळ परकीय भाषेचा अभ्यास करणारे जे विद्यार्थी असतात त्यांना त्या परकीय भाषेतील ग्रंथ समजण्यास उपयुक्त व्हावे म्हणून स्वभाषेत भाषांतरे केली जातात. त्यामुळे अभ्यासाने परिचित भाषेकडून अपरिचित ग्रंथरचना समजावून घेणे सुलभ जाते.

३) काही वाचकांना परकीय भाषा चांगली येते, पण तो ग्रंथ स्वभाषेत यावा असे त्यांना वाटत असते. भाषांतरित ग्रंथ व मूळ ग्रंथ यांचा तौलनिक अभ्यास करणे यातून सुलभ जावे म्हणून ही भाषांतरे केली जातात.

या तीन हेतूने प्रामुख्याने भाषांतरे केली जात असली तरी वाङ्मयाची व ओघानेच भाषेची समृद्धी हाच हेतू त्यामागे असतो. भाषांतराची प्रक्रिया म्हणजेच भाषांतर ही वाङ्मयसमृद्धीची एक गरजच मानली पाहिजे.

भाषांतरविषयक विचारांचा सारांशरूपाने मथितार्थ काढावयाचा म्हटल्यास असेच म्हणणे रास्त ठरेल की, भाषांतराची प्रक्रिया ही निःसंशय एक कठीण कला आहे. संस्कृतिभेद व भाषाभेद यांचा प्रामुख्याने यात अडथळा येतो. तरीही थोडचा फार प्रमाणात भाषांतरकर्त्याने स्वातंत्र्य घेऊन ही कला जोपासली जाणेही आवश्यक आहे. भाषांतर ही जशी वाङ्मयीन गरज आहे तशीच ती एक सामाजिक गरजही आहे. भिन्न संस्कृतीच्या परिचयातून भाषेची व साहित्याची होणारी समृद्धी हा दुहेरी हेतू भाषांतराद्वारे साध्य होतो.

पाश्चात्त्य साहित्यकृतींचे भाषांतर लॅटिनोत्पन्न भाषेत केले अथवा पौर्वात्य साहित्यकृतींचे भाषांतर संस्कृतोत्पन्न भाषेत केले तर भाषांतर अवघड वाटणार नाही. कारण संस्कृती एक असून भाषा फक्त भिन्न राहतात. पण पाश्चात्त्य साहित्य-कृती किंवा पौर्वात्य साहित्यकृती या परस्परविरोधी भाषांत जेव्हा भाषांतरित होतात त्या वेळेस संस्कृती व भाषा दोन्ही भिन्न येतात. त्या वेळेसच प्रामुख्याने

भाषांतर करणे अडचणीचे होते. अशा वेळेस 'मूळ कलाकृतीमधील आशय कायम ठेवून व आवश्यक तेवढे बदल– यात संस्कृतिभेदच अभिप्रेत आहे– करून भाषांतर करणे' योग्य ठरते. भिन्न संस्कृतिदर्शनाबरोबरच मूळ कलाकृतीमधील विचार व वाङ्मयीन मूल्ये वाचकांपर्यंत पोहचवून भाषांतरित कलाकृतीचा आनंद लुटणे शक्य व्हावे हा हेतू भाषांतरकर्त्याने ठेवावा, म्हणजे वाङमयीन गरजेबरोबर सामाजिक गरजही भाषांतराने पूर्ण झाली असे होईल.

*

३ : वैचारिक गद्याचे भाषांतर

कोणत्याही **गद्य उताऱ्यांचे भाषांतर** हे इतर व्यक्तिनिष्ठ वा भावनिष्ठ वाङ्मय-प्रकाराच्या भाषांतरापेक्षा सुलभ जाते. या दृष्टीने इंग्रजीतील एक उतारा व त्याचे मराठीकरण तपासणे मनोरंजक ठरेल.

A few words upon the subject-matter of the poem itself before I conclude this rather long report. It is, as I have said, a hymn addressed to the Deity, and belongs to the devotional class of poetry. The devotional breathings are, however, of a sort which can be understood and relished in this country alone. There is no awe about the Deity, nothing of terror surrounding his glory, no humiliation of spirit on the devotee's part, no dazzling of sight at the awful vision. The relations between the worshipper and the worshipped are exceptionally free; every now and then there is a side-thrust and a push at the Deity which can be understood, if not relished, in a country where both the prevailing philosophy and theology place man almost on an equality with God, and advocate either his present unity with or his future absorption in God.

(Justice Madhavrao Ranade)

" हा रिपोर्ट बराच लांब झाला; आता प्रस्तुत काव्याच्या ('केकावली'च्या) विषयावर चार शब्द लिहून लेखणी आटपतो." वर सांगण्यात आलेच आहे की, हे काव्य ईश्वराचे स्तोत्र आहे, व याची गणना भक्तिपर ग्रंथात होणारी आहे. या स्तोत्रात जो ईश्वरविषयक भक्तीच्या उद्‌गारांचा प्रकार आढळतो तो एतद्देशवासी

लोकांखेरीज इतर कोणास समजायचा नाही व रुचायचाही नाही. ईश्वराविषयी भक्ताच्या मनात ज्या वृत्ती स्वभावतः उत्पन्न व्हाव्यात– म्हणजे त्याचे ऐश्वर्य पाहून भयचकित होणे, आपली क्षुद्रता मनात येऊन अत्यंत नम्र होणे, त्याच्या अगाध महिम्याकडे लक्ष जाऊन आश्चर्याने थक्क होऊन जाणे, आपल्या पापमग्नतेमुळे धाक वाटणे, त्या या काव्यात बिलकुल दृष्टीस पडत नाहीत. उलट भज्य आणि भजक यांजमधील संबंध यांत अत्यंत निकटतेचा आढळतो. जागोजाग ईश्वराशी अतिप्रसंग केलेला व त्याच्यावर कोटी लढविलेली, हा प्रकार प्रस्तुत काव्यात आहे. यास्तव या देशातील तत्त्वज्ञानाचे व ईश्वरज्ञानाचे स्वरूप जे जाणत असतील– म्हणजे मनुष्य व देव हे समसमान असून ते एकरूपच होत किंवा पुढे तरी त्यांचा अभेद होणारा आहे, हे ज्यास माहीत असेल– त्यासच प्रस्तुत काव्यातील भाषणप्रकार अगोदर कळेल; मग तो आवडणे न आवडणे ही तर स्वतंत्र गोष्ट आहे !"

(चिपळूणकर–निबंधमाला)

–मोरोपंतांची कविता.

इंग्रजीतील Report बद्दल रिपोर्ट का ? अहवाल किंवा वृत्तांत का नको ? तथापि एकूण हे भाषांतर मोठे मार्मिक, मुळाबरहुकूम व रसाळ उतरले आहे.

Will Durant यांच्या 'The Story of Philosophy' या पुस्तकाच्या प्रस्तावनेतील उतारा.

Introduction

On the uses of Philosophy.

There is pleasure in philosophy, and a lure even in the mirages of metaphysics, which every student feels until the coarse necessities of physical existence drag him from the heights of thought into the mart of economic strife and gain. Most of us have known some golden days in the June of life when philosophy was in fact what Plato calls it "that dear delight"; When the love of modestly elusive Truth seemed more glorious, incomparably, than the lust for the ways of the flesh and the dross of the world. And there is always some wistful ramnant in us of that early wooing of wisdom. "Life has meaning", we feel with Browning 'to find its meaning is my meat and drink". So much of our lives is meaningless, a self cancelling vacillation and futility; we strive with the chaos about us and within; but we would

believe all the while that there is something vital and significant in us, could we but decipher our own souls.

मराठी भाषांतर– (प्रा. मुरलीधर सायनेकर)

तत्त्वज्ञानात एक प्रकारचा आनंद असतो; अतिन्द्रियज्ञानाच्या मृगजळातदेखील एक प्रकारचे आकर्षण असते आणि वैचारिक उंचीपासून शारीरिक अस्तित्वाच्या ओबडधोबड गरजांनी आर्थिक झगडा व प्राप्ती यांच्या बाजारात फरफटला जाईपर्यंत तत्त्वज्ञानाच्या प्रत्येक विद्यार्थ्याने त्या आकर्षणाचा अनुभव घेतलेला असतो. आयुष्याच्या वसंतात आपल्यापैकी बहुतेकांनी काही सोनेरी दिवसांचा अनुभव घेतलेला असतो. त्या काळात तत्त्वज्ञान म्हणजे खरोखरच प्लेटोने म्हटल्याप्रमाणे एक आवडता आनंद असतो आणि त्या वेळी काहीशा भ्रामक सत्याचे प्रेम शारीरिक सुखांच्या व इतर हलक्या लौकिक गोष्टींच्या लालसेपेक्षा कितीतरी पटीने अधिक दिव्य वाटते. आणि शहाणपणाच्या त्या नवथर प्रियाराधनातील एक साभिलाष अवशेष आपल्यात पुढे कायम उरतो. ब्राउनिंगप्रमाणेच आपल्यालाही असं वाटतं की, " जीवनाला अर्थ आहे आणि तो अर्थ शोधणं हेच माझ्या जीवनाचं सारसर्वस्व आहे." आपल्या जीवनातील बराच मोठा भाग अर्थशून्य असतो. केवळ स्वतःलाच रद्दबातल करणारी चलबिचल व निरर्थकता; आपल्या बाहेरील व अंतर्गत गोंधळाशी आपण झगडा करीत असतो. पण तरीदेखील आपला असा सतत विश्वास असतो की, आपल्या आत चैतन्यपूर्ण व अर्थपूर्ण असे काहीतरी आहे. फक्त आपण आपल्या आत्म्याला ओळखले मात्र पाहिजे."

मराठीत भाषांतर करताना, परकीय भाषा व मराठी भाषा यांची प्रकृती, वाक्यरचना, वाक्प्रचार इ. बाबतीत लक्ष देणे जरूर आहे. संस्कृत भाषेत कर्ता, कर्म, क्रियापद यांची जागा वाक्यात कोठेही असू शकते. इंग्रजीत कर्ता, क्रियापद व नंतर कर्म ही वाक्यरचना असते. पण मराठी भाषेत साधारणतः कर्ता, कर्म, क्रियापद ही वाक्यरचना असते.

एक वैचारिक– थोडा फार आकलनास कठीण– उतारा असूनही मूळच्या तात्त्विक व गंभीर मनोवृत्तीशी एकरूप होऊन, ह्या उताऱ्याचे प्रस्तुत भाषांतर मनोज्ञ झाले आहे. ' June of Life ' चे शब्दशः भाषांतर करण्यापेक्षा ' आयुष्याच्या वसंतात ' ही शब्दसंहिता मुळातील लालित्यास न्याय देणारी आहे.

रवींद्रनाथ टागोर यांचा पुढील उतारा बघा.

" Man must realise the wholeness of his existence, his place in the infinite; he must know that hard as he may strive, he can

never create his honey within the cells of his hive, for the perennial supply of his life food is outside their walls."

" मनुष्याला आपल्या अस्तित्वाच्या अखंडतेचा साक्षात्कार झाला पाहिजे. अनंत विश्वातील आपले स्थान जाणवले पाहिजे. त्याला समजले पाहिजे की, आपण कितीही प्रयास केले तरी आपल्या मधुकोशाच्या टीचभर कोनाड्यात आपल्याला मध निर्माण करता येत नाही; कारण आपल्याला अखंड जीवनरस मिळतो तो त्याच्या भितींच्या बाहेर ! "

(प्रा. वसंत बापट)

–एका विचारवंताच्या शैलीदार गद्याला न्याय देणारे सुंदर भाषांतर म्हणून या उताऱ्यांकडे बघितले पाहिजे. विज्ञानाचेही भाषांतर साध्या, सरळ, शब्दांत वस्तुनिष्ठ पद्धतीने करावे लागते. उदा.

We know that the work is done when a body moves through some distance under the action of an external force. The body exerting the force, does this work. Any body capable of doing some work is said to possess energy. The working is done at the expense of the energy of the body. Energy is classified in different catagories like gravitation energy, electrical energy etc.

'जेव्हा बाह्यबलामुळे एखादा पदार्थ काही अंतर जातो. (किंवा पदार्थाचे विस्थापन होते) तेव्हा कार्य झाले असे आपण समजतो. पदार्थ बाह्यबलामुळेच कार्य करतो. पदार्थाच्या (वस्तूच्या) कार्य करण्याच्या क्षमतेलाच 'ऊर्जा' असे म्हणतात. ऊर्जेमुळे पदार्थाकडून कार्य घडून येते. गुरुत्वीय ऊर्जा, विद्युत ऊर्जा असे ऊर्जेचे वेगवेगळे प्रकार आहेत.'

* * *

मराठी भाषा व साहित्य समृद्ध करण्याच्या दृष्टीने अनेक ललितेतर परभाषेतील ग्रंथ भाषांतर वा रूपांतरद्वारे मराठीत आणणे आवश्यक आहे. साहित्यशास्त्रावरील ॲरिस्टॉटलचे 'poetics' चे भाषांतर 'ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र' या नावाने प्रा. गो. वि. करंदीकरांनी केलेले आहे. वेलॉक व वॉरेन (Rene Wellek & Austin Warren) यांचे 'Theory of Literature' या ग्रंथाचे प्रा. स. गं. मालशे यांनी भाषांतर केले आहे. प्रा. रा. शं. वाळिंबे यांनी अनेक साहित्यशास्त्रज्ञांच्या विचारांचा परिचय मराठी अभ्यासकांना करून दिला आहे.

इतिहास, तत्त्वज्ञान, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, चरित्र, इत्यादी क्षेत्रातील पाश्चात्त्यांचे ग्रंथ भाषांतराच्या माध्यमातून मराठीत आणण्याचे प्रयत्न स्तुत्य ठरतील. मात्र हे भाषांतर वस्तुनिष्ठ व वैचारिक असले तरी ते क्लिष्ट होणार नाही, उलट ते सुलभ, प्रवाही व रसाळ राहील ही दक्षता घेतली जाणे इष्ट होय.

*

४ : कथा-वाङ्मयाचे भाषांतर

"आधुनिक काळात जागतिक दर्जाचा एकही कथाकार मराठीत झालेला नाही. शंकर पाटील दुय्यम दर्जाचे, तर विजय तेंडुलकर, जयवंत दळवी उथळ, सामान्य दर्जाचे लेखक." नवशक्तीच्या ता. २८ ऑक्टोबर १९८५ अंकातील मुलाखतीच्या संदर्भातील राम कोलारकरांचा उपरोक्त अभिप्राय वाचला आणि मनाला खेद झाला. पाश्चात्त्य कथाकारांपैकी रशियन कथाकार टॉलस्टॉय व ॲन्टन चेकाव्ह, फ्रेंच कथाकार गाय द मोपासा, अमेरिकन कथाकार ओ हेन्री व पर्ल बक, आणि इंग्लिश कथाकारांपैकी एल. ए. जी. स्ट्रॉंग, पी. जी. वुडहाऊस, सॉमरसेट मॉम व एच. इ. बेटस् आणि जर्मन कथाकार हाइनरिष इत्यादी नावे व त्यांच्या विख्यात कथा अभ्यासकांसमोर उभ्या राहतात. मराठी लघुकथा हा साहित्यप्रकार जर समर्थ, समृद्ध व दर्जेदार व्हावयाचा असेल तर प्रथम भाषांतर-रूपांतर या मार्गाचा अवलंब करणे अपरिहार्य ठरेल. या दृष्टीने विष्णुशास्त्री चिपळूणकर, इतिहासाचार्य राजवाडे आणि बा. सी. मर्ढेकर यांच्या भाषांतरविषयक मतांचा ऊहापोह मागे झालेलाच आहे. आज केवळ इंग्रजीतूनच ही भाषांतरे-रूपांतरे मराठीत आलेली आहेत. पण इंग्रजी साहित्याच्या तोडीचे फ्रेंच, जर्मन, रशियन, चिनी, जपानी, उर्दू, पर्शियन इत्यादी परभाषेतील कथासाहित्य मराठीत आणणे इष्ट आहे. मराठी कथा सुंदर, दर्जेदार व समृद्ध करण्याचा हा एक महत्त्वाचा राजमार्ग आहे.

ललित वाङ्मयाच्या अनेक प्रकारांपैकी, हजारो वर्षांची परंपरा असलेला, थोडक्या अवकाशात मानवी जीवनाचे देखणे व प्रभावी रूप प्रकट करणारा लोकप्रिय प्रकार म्हणजे लघुकथा होय. मग या वाङ्मयप्रकारास कथा, गोष्ट, स्फुटकथा, कहाणी, नवकथा अशी कोणतीही नावे असोत., सर्वसामान्य मनुष्याला दुसऱ्याचे कौटुंबिक अनुभव वा अद्‌भुतरम्य अनुभव ऐकण्याचा छंद असतो. ही एक उपजत प्रवृत्तीच म्हटली पाहिजे. या सांगणाऱ्याच्या व ऐकणाऱ्याच्या उत्सुकतेपोटीच सर्व

देशांत व सर्व भाषांत कथावाङ्मयाचा जन्म झालेला आहे. 'भारत' ग्रंथाचा 'महाभारत' ग्रंथ होण्यामागचे रहस्य यांतच आहे. आपल्याकडे भारत, भागवत, रामायण इत्यादी पुराण-ग्रंथांचे स्वरूप मुख्यत्वे कथात्मकच आहे. उपनिषदांतही एखादा विचार सांगताना कथेचा आधार घेतला जातो. (महानुभावांच्या दृष्टांत-पाठांत व लीळाचरितात कथाकथनच आहे.) कौटुंबिक स्तरावर लोकव्यवहार व उपदेश स्पष्ट करण्यासाठी लोककथा, कहाण्या, फार काय बुद्धाच्या जातककथा यांची निर्मिती झालेली आहे. युरोपखंडातही कथावाङ्मयाच्या निर्मितीस हेच कारण आहे. स्वभाषेतील कथांचे जसे वेड लोकांना असते, तसेच परभाषेतील कथांचेही आकर्षण लोकांना असते. व म्हणूनच भाषांतर– रूपांतर– अनुवाद इत्यादी माध्यमांना प्राचीन काळापासून महत्त्व प्राप्त झाले आहे. वस्तुतः सर्व अंगोपांगांसह विस्तारलेले मानवी जीवन हाच एकमेव विषय ललित वाङ्मयाचा असतो.

"Human life, with all its manifestations, is the only subject of Literature" हे विधान काय किंवा एफ. एल. लुकाजचे विधान "Curiosity, the first intellectual emotion of the child, the last of the old man– that is the ultimate base of an epic, a novel, a story and a tragedy alike." याचे मर्म वेगळे सांगायला नको. ललित वाङ्मयीन मानव्य-विषयक जिज्ञासेमुळे सर्वसामान्य वाचकांना आनंद होतो. इसापनीती, हातीमताईच्या कथा, अरेबियन नाईटस् यांची ओढ बालकांप्रमाणेच प्रौढांनाही लागली असल्यास नवल नाही.

इंग्रजी राजवटीत पाश्चात्त्य पद्धतीचे शिक्षण व इंग्रजी भाषा व साहित्य यांचा अभ्यास महाराष्ट्रात सुरू झाला. एकोणिसाव्या शतकात भाषांतर–रूपांतराच्या प्रक्रियेस इंग्रज शासनाकडून उत्तेजन मिळाले. डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटीकडून चांगल्या भाषांतरित साहित्यकृतींना पारितोषिके मिळू लागली. महाभारतातील अनेक कथा, अनेक लेखकांनी मराठीत आणल्या. मुक्तेश्वर ते मोरोपंत या परंपरेतील आख्यानक कवींनी भारत, भागवत, रामायण या ग्रंथांतील अनेक लहानमोठी प्रकरणे मराठीत अनुवादिली होतीच. नवीन काळात मुद्रणकलेच्या वापरामुळे, 'चिपळूणकर आणि मंडळी'नी शंभर वर्षांपूर्वी महाभारताचा प्रचंड अनुवाद मराठीत केला. इंग्रजी राजवटीत सदाशिव काशिनाथ छत्रे यांनी मूळ फ्रेंच भाषेतून इंग्रजीत आणलेल्या 'Children's Friend's' वरून 'बालमित्र' हा उपदेशप्रधान कथासंग्रह प्रसिद्ध केला. थोरल्या चिपळूणकरांनी इंग्रजीत प्रसिद्ध असलेल्या 'अरेबियन नाईटस्' वरून 'अरबी भाषेतील सरस आणि सुरस गोष्टी' मराठीत आणल्या.

एकोणविसाव्या शतकाच्या अखेरीस हरिभाऊ आपटे यांनी 'करमणूक' मधून

ज्याप्रमाणे स्वतंत्र कथा लिहिल्या, त्याचप्रमाणे काही रूपांतरित कथाही लिहिल्या. 'चांगली अद्दल घडली', 'डिप्सेप्शिया' इत्यादी गोष्टी या प्रकारातील होत. हरिभाऊ आपटे यांच्या स्फुट गोष्टींवरून स्फूर्ती घेऊन विठ्ठल सीताराम गुर्जर यांनी प्रभातकुमार मुखर्जींच्या बंगाली कथांचे मराठी अनुवाद रचले. मामा वरेरकरांनी शरश्चंद्राच्या कथा आणि रवींद्रनाथ टागोरांच्या कथा मराठीत आणल्या. या दृष्टीने 'एकविंशती' हा रवींद्राचा कथासंग्रह उल्लेखनीय आहे. 'मृण्मयी', 'पोस्टमास्तर' इत्यादी कथांनी मानवी स्वभावाचे एक वेगळे विश्व व बंगालच्या निसर्गरम्य वातावरणाचे एक रम्य चित्र मराठी वाचकांपुढे उभे केले आहे. बंगाली कथांच्या भाषांतराप्रमाणेच गुर्जरांनी गुजराती व हिंदी कथांची भाषांतरे मराठीत प्रसिद्ध केली आहेत. अशोक शहाणे यांनी बंगाली साहित्यातील काही निवडक कथांची भाषांतरे केली आहेत. सुप्रसिद्ध नवकथाकार अरविंद गोखले यांनी पाकिस्तान व बांगला देश मध्ये काही काळ मुक्काम करून तेथील उर्दू व बंगाली भाषांतील काही कथा निवडून त्यांची मराठीत भाषांतरे केलेली आहेत. मालतीबाई दांडेकरांनी 'देशोदेशीच्या लोककथा' मराठीत आणून एक प्रकारे मानवी मनांचा सांस्कृतिक संगमच घडवून आणला आहे.

पहिल्या महायुद्धानंतर जगातील निरनिराळे देश जवळ येऊ लागले– परभाषांचे अभ्यास आपल्याकडे होऊ लागले व मराठी कथाविश्वात भाषांतर–रूपांतरद्वारे मोलाची भर पडू लागली. व. ह. गोळे यांनी पी. जी. वुडहाऊसच्या कथांचे भाषांतर केले व तो संग्रह 'साहित्य संस्कृती मंडळ' म्हणून रसिकांपर्यंत पोचला. जी. ए. कुलकर्णी या आजच्या आघाडीवरील कथाकाराने चिनी कथांची भाषांतरे करण्याकडे लक्ष पुरविले आहे. प्रा. ना. सी. फडके यांनी 'लघुकथा– मंत्र आणि तंत्र' या पुस्तकात ओ हेन्रीची 'The gift of the Magi" या कथेचे सुंदर भाषांतर 'नाताळची भेट' या शीर्षकाखाली केले आहे. पाश्चात्त्य स्थळ, परकीय व्यक्तींची नावे व गावे, नाताळचा सण, परकीय संस्कृती व वातावरण असूनही या कथेच्या आस्वादात काहीही उणीव भासत नाही.

ओ हेन्री यांची 'pendulum' ही कथा 'लंबक' या शीर्षकाखाली प्रसिद्ध झालेली आहे. रशियन कथालेखक टॉलस्टॉय यांच्या कथांपैकी 'How much Land does a man need' ही कथा मनुष्यस्वभावाच्या अतिलोभाचे वास्तवरूप दाखवून भारतीय साहित्यात लोकप्रिय ठरली आहे. (दूरदर्शनवरही ती प्रभावी वाटते). लघुकथेच्या क्षेत्रातील अनभिषिक्त सम्राट असणारा ॲन्टन चेकाव्ह याची कथा 'The Cook's Wedding', 'शरमेची गोष्ट' इच. इ. बेट्स या इंग्लिश कथाकाराच्या कथेतील 'लिलियन' या तरुण स्त्रीचे द्विधा मन 'तिच्या हृदयाची हाक' या भाषांतरित कथेत मिळते. प्रा. ना. सी. फडके यांनी तर त्यांना थोर

वाटणाऱ्या अनेक परभाषेतील कथांची भाषांतरे 'नमुनेदार गोष्टी' या संग्रहातून प्रसिद्ध केलेल्या आहेत. गाय द मोपासां या थोर फ्रेंच कथाकाराची 'The Necklace' ही कथा 'कंठा' या नावाने आली (तर हीच कथा हरिभाऊ आपटे यांनी रूपांतर करून 'पुरी हौस फिटली' या नावाने पूर्वी प्रसिद्ध केलेली होती.) मोपासाची दुसरी कथा एका स्त्रीद्वेष्ट्या धर्मोपदेशकाच्या हृदयपालटाची हकीकत 'चंद्रिका' या शीर्षकाखाली आहे. एल. ए. जी. स्ट्रॉंगच्या कथेतील बेजबाबदार लेखक रेंटन, याचा खून एक प्रौढ स्त्री केट का करते हे 'लेखणी जरा जपून चालव' या मथळ्याखाली फडके रसाळपणे रंगवीत आहेत. अमेरिकन लेखिका पर्ल बक हिच्या चिनी लोकजीवनावरील कथेचे भाषांतर 'भित' या नावाने फडके यांनी केलेले असून 'चिनी अशिक्षितपणाची ही प्राचीन भित' नव्या सुधारणावादाला कसा विरोध करीत आहे हे त्यात स्पष्ट होते. गॉर्की, वॉशिंग्टन आयव्हिंग, पो, इत्यादी लेखकांच्या कथांची भाषांतरे मराठी कथाविश्वाला समृद्ध करीत आहेत. आजकाल मराठीतील दिवाळी व वासंतिक खास अंक या दृष्टीने मोलाची कामगिरी करीत आहेत. कथेचे बदलते स्वरूप, कथेतील वातावरण, कथेंतील भाषाशैली व मुख्यत्वे संवादप्रचुरता, रचनेतील उत्कंठावर्धक आरंभ व परिणामकारक अखेरी, इत्यादी बावतची प्रयोगशीलता भाषांतर–रूपांतराच्या माध्यमातून आपणाला आजकाल जाणवू लागली आहे.

पाश्चात्त्य कथांप्रमाणेच भारतातील भाषाभगिनीतील कथांची रूपांतरे मोठ्या डोळसपणे व चतुराईने मराठीत आणण्याचे प्रयत्न स्वागतार्ह आहेत. अरविंद गोखले यांच्या 'कथाकार' या कथासंग्रहात अमृता प्रीतम यांची पंजाबी बोलीतील कथा 'आरसा'; 'लालपुष्प' यांची सिंधी भाषेतील कथा 'भिजलेली भित'; इस्मत चुगताई यांची उर्दू भाषेतील 'गंडासा'; बक्षी यांची गुजरातीमधील 'तिसरा अंक', यशवंत चित्ताल यांची कन्नड भाषेतील 'डाव', पालगुम्मि पद्मराजूंची तेलगू भाषेतील 'चक्रीवादळ', आर चुडामणी यांची तामीळ भाषेतील 'कलंक' इत्यादी कथा उल्लेखनीय ठरतील.

आज तर या आघाडीवर राम कोलारकर यांनी एक आगळेवेगळे कथाविश्व निर्माण करण्याचा संकल्प सोडला असून, जगातील अनेक भाषांमधून चाळीस हजार कथा अभ्यासून, त्यांतील एकशे अठ्याऐंशी कथांची निवड केलेली आहे. या श्रेष्ठ कथांच्या पार्श्वभूमीवर मराठी कथा व कथाकारांविषयी त्यांची मते आवडत नसली तरी नक्कीच चिंतनीय ठरतील.

मौलिकता, सखोलता, तंत्रकौशल्य आणि प्रायोगिकत्व या चार निकषांवर पाहता मराठी लघुकथा कनिष्ठ दर्जाची ठरते, हे प्रतिपादून राम कोलारकर पुढे म्हणतात, "आमचे कथाकार पुण्याची पर्वती, मुंबईची मलबार-हिल आणि नाग-

पूरची सीतावर्डी इतपतच उंच आहेत. आम्हाला आल्प्सशी टक्कर देणारे, हिमालयाची उंची गाठणारे कथाकार हवे आहेत."

मराठी लघुकथेचे आद्य जनक कॅ. गो. गं. लिमये, दिवाकर कृष्ण, प्रा. ना. सी. फडके, खांडेकर, कमलाबाई टिळक, विभावरी शिरूरकर, कुसुमावती देशपांडे, बी. रघुनाथ, वा गावरान गोष्टी लिहिणारे चिं. य. मराठे, भावे, गाडगीळ, गोखले, शंकर पाटील, व्यंकटेश माडगूळकर हे सर्व ताकदीचे लेखक होते, पण त्यानंतरच्या काळातही विद्याधर पुंडलिक, बाबुराव बागूल, गौरी देशपांडे, विजया राजाध्यक्ष, सुधा नरवणे, अंबिका सरकार, मतकरी, (कै.) पालवणकर, चारुता सागर, केशव मिश्राम, चंद्रकांत वर्तक, अरुण साधू, आशा बगे, शरच्चंद्र चिरमुले, ह. मो. मराठे, लक्ष्मण लोंढे इत्यादी विविध स्तरातून आलेल्या लघुकथाकारांची नावे आजच्या वाचकांना आशादायक ठरतील– पण जागतिक स्पर्धेत टिकतील काय हा खरा प्रश्न आहे !

* * *

लघुकथांचे भाषांतर करावे की रूपांतर करावे हाही एक जटिल प्रश्न आहे. (या संदर्भात या पूर्वी एका प्रकरणात विपुल चर्चा झालेली आहेच.) भाषाभेद, व्यक्ती व स्थळभेद, संस्कृतिभेद– इत्यादी मुद्यांवर हरिभाऊंनी रूपांतराचा मार्ग स्वीकारला व त्याद्वारे सामान्य वाचकांना रूपांतर अधिक आस्वाद्य वाटेल असा कौल दिला. या उलट प्रा. ना. सी. फडके यांनी शुद्ध भाषांतराचा मार्ग स्वीकारला व सर्व स्तरांवर भेद असला तरी जर कथाकार व भाषांतरकार ताकदीचा असेल, भाषांवर प्रभुत्व ठेवणारा असेल तर परकीय कथाही आस्वाद्य ठरते असा अभिप्राय व्यक्त केला.

फ्रेंच कथाकार गाय द मोपासां यांच्या 'Necklace' या कथेचे (पुरी हौस फिटली) स्वैर रूपांतर हरिभाऊंनी केले व त्याद्वारे मुळात नसलेल्या बोधवादाचाही आश्रय घेतला. उलट प्रा. फडके यांनी मुळाशी इमान राखून– 'कंठा' ही कथा रूपांतरद्वारे कशी प्रभावी व आस्वाद्य ठरते हे साधार स्पष्ट केले, ते बघण्यासारखे वाटेल !

" The Diamond Necklace " –Guy De Maupassant

Then her husband cried out, " How stupid we are ! Go, and find your friend Mrs. Forestier and ask her to lend you her jewels– you are well-enough acquinted with her to do this."

She uttered a cry of joy, " It is true ! " She said, " I had not thought of that. "

The next day, she took herself to her friend's house and

related her story of distress. Mrs. Forestier went to her closet with the glass-door, took out a large Jewel-case, brought it, opened it and said, " Choose, my dear."

She saw at first some bracelets, then a color of pearls. then a venecetian cross of gold and jewels, and of admirable workmanship. She tried the jewels before the glass, hesitated, but could neither decide to take them nor to leave them. Then she asked, " Have you nothing more ?"

" Why, yes. Look for yourself—

I do not know what will please you."

Suddenly, she discovered, in a black satin box a superbe necklace of diamond, and her heart beat fast, with an immoderate desire. Her hands trembleded as she took them up. She placed them about her throat, against her breast and remained in ecstasy before them. Then she asked, in a hesitating voice, full of anxiety. " Could you lend me this ! only this ?"

" Why, yes, certainly."

She fell upon the neck of her friend, embraced her with passion, and went away with her treasure."

कंठा

तिचा नवरा एकदम काहीतरी आठवल्यासारखे म्हणाला, " किती वेडी ग तू ? तुझी मैत्रीण ती मादाम फॉरेस्तिए देईल की तुला हवे तितके दागिने. तुझी व तिची इतकी ओळख खचित आहे. "

तिने आनंदाने टाळी वाजवली आणि म्हटलं, " खरंच रे खरंच ! ही युक्ती मला इतका वेळ कशी सुचली नाही ?"

दुसऱ्या दिवशी ती मादाम फॉरेस्तिएकडे गेली व तिने आपली अडचण तिला सांगितली. मादाम फॉरेस्तिएने आपल्या ड्रेसिंग टेबलातनं दागिन्यांची भली मोठी पेटी काढली आणि ती उघडून मॅथिल्डपुढे धरून ती म्हणाली, " यातलं तुला काय हवं ते घे. "

मॅथिल्डने मोत्यांच्या बांगड्या, हार, जडावाचं ताईत, असे अनेक अलंकार नुसते हातात धरून पाहिले नाहीत तर आरशापुढे उभे राहून अंगावर घालूनदेखील पाहिले. पण कोणता दागिना घ्यावा याबद्दल तिच्या मनाचा निर्णय होईना. ती

आपल्या श्रीमंत मैत्रिणीला सारखं विचारीत राहिली, "दुसरं काही नाही का ?"

पण एका काळचा मखमलीच्या पेटीतला हिऱ्याचा सुंदर कंठा तिच्या दृष्टीस पडला तेव्हा मात्र तिचं अंतःकरण आधाशीपणानं धसकलं. तो उचलताना तिचे हात थरथर कापत होते. तिनं तो आपल्या गळ्याभोवती घातला आणि मग आरशातलं स्वतःचं प्रतिबिंब पाहता पाहता ती देहभान विसरली. तिने आपल्या मैत्रिणीला भीतभीत विचारलं, "हा कंठा मला उसना देशील काय ? दुसरा कोणताही दागिना नको मला. फक्त एवढा कंठा दे."

तिची मैत्रीण म्हणाली, "घे की–"

मॅथिल्डनं हर्षभरानं आपल्या मैत्रिणीला घट्ट मिठी मारली. तो सुंदर रत्नहार घेऊन ती घरी परत आली.

* * *

आता मोपाँसाच्या सदरहू कथेचे शब्दशः भाषांतर प्रा. ना. सी. फडके यांनी किती रसाळपणे व चातुर्याने केलेले आहे ते पहा. आता याच कथेचा अनुवाद पूर्वी हरिभाऊ आपटे यांनी 'पुरी हौस फिटली' या कथेत केलेला होता. हरिभाऊंनी यात बोधवादाची भर घालून, मूळ कथेतील सूचकता व परिणाम नष्ट केलेला आहे. वातावरण व शेवट यांतही बदल केलेला आढळेल, पण हे इष्ट नव्हे.



५ : कादंबरीचे भाषांतर

कादंबरी हा वाङमयप्रकार अव्वल इंग्रजी काळात, इंग्रजी वाङमयाच्या अभ्यासातून उदयास आला. इंग्रजी वाङमयातील थॅकरे, गोल्डस्मिथ, डॉ. जॉनसन, जेन ऑस्टीन, डिकन्स इत्यादी कादंबरीकारांचा परिचय गेल्या शतकातील इंग्रजी भाषाशिक्षितांना झाला.

'यात्रिकक्रमण' हे Bunyan च्या 'pilgrim's progress'चे हरी केशवजी पाठारे यांनी मराठीत भाषांतर केले. कोणताही वाङमयप्रकार मराठी भाषेत आणताना भाषांतराचा वा रूपांतराच्या पांगुळगाडग्याचा आधार घ्यावा लागतोच. डॉ. जॉनसन यांच्या 'रासेलस' या कादंबरीचे भाषांतर प्रथमतः कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी सुरू केले. त्यांच्या निधनानंतर विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी ते पूर्ण केले. मानवी जीवनातील सुखाचा शोध घेण्याचा प्रयत्न हा विषय सर्वकाळ महत्त्वाचाच असणार, पण त्यासाठी 'रासेलस' कादंबरीतील स्थल, काळ आणि व्यक्ती भारतीय संस्कृतीला अपरिचित आहेत. त्यामुळे 'रासेलस' चे भाषांतरच आढळते.

गेल्या शतकात गोल्डस्मिथ या कादंबरीकाराच्या 'विकार ऑफ वेकफिल्ड' या कादंबरीने अनेकांना मोहित केले. त्यापैकी एक म्हणजे टिकेकर होत. टिकेकरांनी 'धनुर्धारी' या टोपण नावाने 'विकार ऑफ वेकफिल्ड'चे भाषांतर न करता कथानक व काही व्यक्ती यांची निवड केली. भारतीय संस्कृतीची व लोकजीवनाची जोड दिली, व त्यावरून 'वाईकर भटजी' ही अत्यंत लोकप्रिय कादंबरी रचली. या संदर्भात असे म्हणता येईल की, "पूर्वीच्या भिक्षुकी गृहस्थितीचे वाचकांच्या हृदयाची कालवाकालव करून सोडणारे शब्दचित्र म्हणजे 'वाईकर भटजी'!" ही कादंबरी १८९८ साली प्रसिद्ध झाली असली तरी तत्पूर्वी ती विविधज्ञानविस्तारात क्रमशः छापून आली होती व तेव्हाच तिने वाचकांची मने जिंकून घेतली होती. मूळ

इंग्रजीच्या धर्तीवर ही कादंबरी रचली गेली व हे स्वैर रूपांतर तयार झाले. या कादंबरीने दोन पिढ्यांना तरी निश्चित वेड लावले होते; कारण मनुष्यस्वभावाच्या बारकाव्यांसह, सुबोध व रसाळ भाषेत वर्णन करण्याची लेखकाची हातोटी. मराठी जीवनाशी एकरूप झाल्यामुळे 'परदेशी भीक बरी', 'ग्रामत्यागासारखे दुःख नाही', 'ही दुनिया केवळ झूटी आहे', 'जुने डोळे आणि नवे चाळे' असे वाक्प्रचार आढळतात.

मूळ व भाषांतरित कादंबऱ्यांत साम्य स्थळे जरूर आहेत, पण पुढे मात्र त्यातील कथानकातील वाढ अगदीच वेगळी होते. विविधज्ञानविस्ताराच्या–एप्रिल १९२६ च्या–अंकात या कादंबरीचे परीक्षण करताना ना. रा. केळकर यांनी म्हटले आहे की, 'ज्याप्रमाणे मुंबईहून निघालेल्या जी. आय. पी. व बी. बी. सी. आय. रेल्वे काही मैलपर्यंत एकमेकींचे साहचर्य उपभोगतात व मग निराळ्या दिशेने प्रवास करतात त्याप्रमाणे या कादंबऱ्यांचे झाले आहे.'

गो. नी. दातार यांनी 'रेनॉल्डस्' च्या काही कादंबऱ्यांवरून मराठीत रूपांतरवजा कादंबऱ्या रचल्या. त्यात 'इंद्रभुवन गुंफा', 'कालिका मूर्ती' इत्यादींचा समावेश आहे.

'पॉल आणि व्हर्जिनिआ' ही भाषांतरीत छोटी कादंबरी याच कालखंडातील. वा. गो. आपटे यांनी 'Mrs. Henrywood' च्या 'Mrs. Halliburton's Troubles' चा 'दुःखाअंती सुख' हा केलेला अनुवाद उल्लेखनीय आहे.

विसाव्या शतकात 'जेन ऑस्टीनच्या' 'प्राइड अँड प्रेज्युडीस' वरून कृ. के. गोखले यांनी 'आजपासून पन्नास वर्षांनी' ही कादंबरी रचली. डिकन्सच्या 'डेव्हिड कॉपरफिल्ड' आणि 'ए टेल ऑफ टू सिटीज' या कादंबऱ्यांची भाषांतरे झाली. मेरी कॉरेलीच्या 'टेंपोरल पॉवर'चे भाषांतर याच काळातले. पहिल्या महायुद्धावरील 'एरिक रेमार्क' याच्या 'ऑल क्वाएट ऑन द वेस्टर्न फ्रंट' या नोबेल पारितोषिक विजेत्या कादंबरीचे स. बा. हुदलीकर यांनी 'पश्चिम आघाडीवरील सामसूम' हे भाषांतर केले.

'वॉर अँड पीस' या टॉलस्टॉयच्या कादंबरीचा अनुवाद झालेला आहे.

स्पॅनिश महायुद्धावरील 'नोपासारान' (त्यांना पुढे जाऊ देऊ नका) याही भाषांतरित कादंबरीचा उल्लेख केला पाहिजे.

मार्जोरी रॉलिंग्जच्या कादंबरीचा अनुवाद श्रीराम पटवर्धन यांनी 'पाडस'! या नावाने केला आहे. तर पु. ल. देशपांडे यांनी अर्नेस्ट हेमिंग्वे यांच्या 'The old man and the sea' चे रूपांतर 'एका कोळियाने' म्हणून केलेले आहे.

या भारतीयेतर कादंबऱ्यांप्रमाणेच भारतातील अन्य भाषेतील प्रसिद्ध कादंबऱ्यांची भाषांतरे मराठीत होऊ लागली आहेत. त्यात प्रामुख्याने बंगाली लेखक

रवींद्रनाथ टागोर, बंकीमचंद, शरश्चंद्र, हिंदीतील मुन्शी प्रेमचंद, कन्नड लेखक कारंथ, अनंतस्वामी वगैरे लेखक आहेत.

परकीय–युरोपीयन भाषेतील कादंबरी असेल तर स्थळ, काळ व संस्कृती यातील भेद, भाषांतर करताना थोडाफार जाणवतो. तथापि तोही होणे आवश्यक आहे. कारण त्यामुळे मराठी वाचकांच्या जीवनानुभूतीच्या कक्षा रुंदावतात, एका नव्या परकीय लोकजीवनाची मराठी वाचकांना कल्पना येते, माहितीत भर पडते, हाही लाभ कमी महत्त्वाचा नाही. श्रेष्ठ लेखकांच्या भाषाशैलीचा परिचय घडतो. त्यामुळे आपली भाषाशैली समृद्ध होण्यास मदत होते.

भारतीय लोकजीवनाशी निगडित असणाऱ्या, भारतीय–उत्तरेकडील वा दक्षिणेकडील– लेखकांच्या कादंबऱ्यांचे भाषांतर समान संस्कृतीमुळे एकदम आपल्या हृदयास जाऊन भिडते. कादंबरी हा गद्य वाङ्मय प्रकार असल्यामुळे त्याचे भाषांतर वा रूपांतर करणे कठीण जात नाही. आज तर भाषा व संस्कृती मंडळामुळे 'नोबेल पारितोषिक विजेते' व 'ज्ञानपीठ पारितोषिक विजेते' यांच्या कलाकृती मराठीत येत आहेत. त्यामुळे मराठी कादंबरीवाङ्मय आशय आणि अभिव्यक्ती याद्वारे समृद्ध होत आहे.

-*-

६ : विनोदाचे भाषांतर

हास्य ही एक मानवी जातक प्रवृत्ती आहे. त्यामुळे जेथे जेथे काही अतिशयोक्ती वा विसंगती आढळेल तेथे तेथे हास्यरस उत्पन्न होतो. या विनोदाच्या उत्पत्तीचे कारण १) शब्दनिष्ठ विनोद, २) स्वभावनिष्ठ विनोद ३) प्रसंगनिष्ठ विनोद हे आहे.

मराठीमध्ये सामान्यत: विनोदी लेखन हे कमीच आहे. त्याचे कारण कदाचित भारतीय तत्त्वज्ञानाचा लोकांवर पडलेला गंभीर प्रभाव किंवा एकंदर लोकांना कमी असलेले विनोदाचे इंद्रिय हे असावे. रामदास हे संतकवी म्हणतात– 'टवाळा आवडे विनोद' यामुळेही विनोदबुद्धीची वा विनोदी साहित्याची उपेक्षा झाली असावी.

संस्कृत साहित्यातही काव्य-नाटकादी दालने संपन्न असली तरी विनोदाचे दालन बहुअंशी रिकामेच आढळते. संस्कृत नाटकातील क्वचित आढळणारा शब्दनिष्ठ विनोद, विदूषकाच्याद्वारे साधलेला स्वभावनिष्ठ विनोद (त्याचा खादाडपणा मूर्खपणा, आचरटपणा वगैरे) आणि क्वचितच आढळणारा–एखाद्या पताकास्थानातून निर्माण होणारा–प्रसंगनिष्ठ विनोद–इतकाच तो मर्यादित आहे. त्याचा प्रत्यय मराठी वाचकांना संस्कृत नाटकांच्या भाषांतरातून येतो.

संस्कृत कवींनी मात्र काही चमकदार विनोदाची निर्मिती एकदोन काव्यचरणाच्याद्वारे व शाब्दिक श्लेषांच्याद्वारे केलेली आहे. पण त्या कोटिक्रमाचे शब्दश: भाषांतर करणे फार कठीण जाते. भाषांतर करीत असताना त्याच शब्दाला जर तितकाच अनुरूप प्रतिशब्द सापडला नाही, तर त्या शब्दातला विनोद एखाद्या उघड्या ठेवलेल्या कापरासारखा उडून जाईल. उदा.

'सा कन्या विधवा जाता, गृहे रोदिति तत् पति: !' या चरणातील 'विधवा' शब्दाचा योग्य विग्रह करूनच अर्थ ध्यावा लागतो.

विधवा – विगतः धवः यस्याः सा.
जिचा नवरा मेला आहे ती.
असा अर्थ घेतल्यास अर्थहानी होईल. म्हणून
विधवा – विशेषेण धवाः यस्याः सा
जिला अनेक नवरे बाहेर आहेत ती
असा अर्थ घेतला की, चरणाच्या उत्तरार्धाची मौज वाटते.

कं बलवंतम् न बाधते शीतम् ? याचे उत्तर कंबलवंतम् न बाधते शीतम् ! यातच मिळते व गंमत वाटते. यालाच भाषाशास्त्रात ' सीमासंधी ' म्हणतात.

इंग्रजीतही अशाच तऱ्हेचे उदाहरण सांगता येईल.

' Thou art Peter, and upon this rock I will build my church.' Unhappily the pun on which the Christian Church was founded is lost in translation into English, though it Survives in Latin.

अशा प्रसंगी The translation offered must be a translation of other words which resemble or suggest the words that are actually printed.

स्वभावनिष्ठ विनोदात मानवी जीवनात विविध स्वभाव-वैगुण्याची माणसे असतात. अति विसराळू, अति भित्रा, अति संशयी, आचरट, खादाड ही माणसे निरनिराळ्या नाटकातून रंगविलेली आहेत व त्या नाटकांच्या भाषांतर-रूपांतरादी प्रक्रियेतून अन्य भाषेतूनही आणता येतात. उदा.–

१) मोलियर याच्या La miser या नाटकातील प्रमुख व्यक्ती ही अत्यंत कंजुष दाखविलेली आहे. आचार्य अत्रे यांनी या व्यक्तीला ' पंपुशेट ' या नावाने ' कवडीचुंबक ' या नाटकात रंगविले आहे.

२) ' गोनेरिल ' या मोलियरच्या नाटकावरून रॉबर्ट मर्फी याने All in the wrong या नावाने इंग्रजी रूपांतर केले. देवल यांनी ' संशयकल्लोळ ' नाटकात ' फाल्गुनराव ' हे चिकट व संशयी पात्र आणले आहे.

प्रसंगनिष्ठ विनोद हा अभावितपणे निर्माण होणाऱ्या घटनांवर अवलंबून असतो. इंग्रजी नाटकांतील Importance of being Earnest किंवा She Stoops To Conquer किंवा School of scandles किंवा शेक्सपीअरचे Twelth Night हे नाटक आपणास सांगता येईल.

इंग्रजी गद्य वाङ्मयातील विनोदी लेखकांच्या डिकन्सच्या Pick-wick papers, swift च्या ' गलिव्हर्स ट्रॅव्हल्स ' या पुस्तकांच्या आधाराने मराठीत विनोद अवतरला आहे.

Three men in a Boat या जेरोम के जेरोमच्या विनोदी पुस्तकाचे द. मा.

मिरासदार यांनी मराठीत भाषांतर केले आहे.

डिकन्सच्या Pickwick papers च्या काही भागांचा अनुवाद वा. गो. काळे यांनी 'संशोधन समाज समाचार' या नावाने 'मनोरंजन 'मधून केला. पण मुळातील विनोद मराठीत आणता न आल्याने तो अर्ध्यावरच सोडून दिला.

७ : काव्याचे भाषांतर

भाषांतर हे साहित्याच्या समृद्धीचे एक प्रभावी साधन आहे हे आपण पाहिलेच. परंतु निरनिराळ्या वाङ्मय प्रकारांचे भाषांतर वाटते तितके सोपे नसते. प्रस्तुत ठिकाणी परभाषेतून काव्याचे स्वभाषेत भाषांतर करणे कितपत जमणारे आहे याचा आपण विचार करू या.

काव्यलेखन करणारा मूळ कवी हा प्रतिभासंपन्न तर असतोच. पण उत्कट भावनाशक्ती, तरल कल्पनाविलास आणि शब्दांवरील प्रभुत्व याही गुणांनी तो समृद्ध असतो. अशा भाषेतून त्या कवीच्या उत्कृष्ट कवितेचा स्वभाषेत उतारा करण्यास त्याच्याच तुल्यबळ प्रतिभेचा व इतर गुणांच्या ताकदीचा कवी असावा लागतो. अन्यथा स्वभाषेतील कवीचे असले भाषांतर हे केवळ रुक्ष पद्यमय तर्जुमा ठरेल. त्यातील मूळ काव्यात्मकतेच्या आस्वादास रसिक पारखे होतील.

या संदर्भात हंबोल्ड (Humboldt) याने स्वच्छ इशारा दिला आहे की, अशा तऱ्हेचे काव्याचे भाषांतर करणे ही एक अशक्य कोटीतील समस्या आहे. ('It is an attempt to solve an insoluble problem')

मूळ काव्य ज्या वृत्तात रचले असेल त्याच वृत्तात त्याचा अनुवाद करणे कठीण जाईल हे खरे, पण त्या वृत्ताऐवजी निदान तसलेच एक नादमधुर वृत्त स्वभाषेला साजेसे निवडण्यात अनुवाद करणाऱ्या कवीने गुणग्राहकता दाखविली पाहिजे.

कार्लाइल, ले हंट आणि आर्च बिशप व्हेटले, या मार्मिकांनी तर म्हटले आहे की, "Poetry is incomplete without the aesthetic effects of metre" यामुळेच काव्यरचनेत नादमाधुर्याला आणि सौंदर्याला वृद्धिंगत करणारे काव्यविषय, त्यातील भावनांना पोषक ठरणारे वृत्त (मग ते अक्षर वृत्त असो वा मात्रावृत्त)

अनुवादकर्त्या कवीस सहजगत्या साध्य झाले पाहिजे. या दृष्टीने इंग्रजी कवितेवरून मराठीत कविता अनुवादित करण्याचा प्रयत्न फारच जिकीरीचा ठरतो. याचा अनुभव शेक्सपीअरच्या हॅम्लेटमधील काव्यमय स्वगते मराठीत उतरताना आगरकर, बर्वे व कानिटकर यांना आल्याचे जाणवते.

इंग्रजीतील पालग्रेव्हने 'Golden Treasury' यात संग्रहित केलेल्या काही कवितांचे भाषांतर गेल्या शतकात 'कुसुमांजली' या काव्यसंग्रहात विष्णू मोरेश्वर महाजनी यांनी केलेले आहे. त्यातील एक-दोन उदाहरणांकडे आपले लक्ष वेधून घ्यावे म्हणून वर्डस्वर्थच्या 'Solitary Reaper' चे 'भिल्लकन्या' हे रूपांतर किंवा लाँग फेलो यांच्या 'Psalm of life' च्या 'जीवनस्रोत्र' या कवितेतील काही ओळींचे भाषांतर वि. मो. महाजनी व हरिभाऊ आपटे यांनी कसे केले आहे हे अभ्यासण्यासारखे आहे. हे दोघे मराठीतील अनुवादकर्ते 'लाँग फेलो' (Longfellow) च्या मनोवृत्तीशी जुळणारे आहेत; तसेच ते प्रतिभासंपन्नही आहेत. परंतु इंग्रजी काव्यरचनेची वृत्त पद्धत ही वेगळी आहे, हे जाणून या कवींनी वेगळी वृत्ते घेतली आहेत.

काही अनुवादकार एखाद्या भावगीताचा अनुवाद करताना तो गद्यात आशय रूपाने मांडण्याचा प्रयत्न करतात. कारण त्यांना ते सुलभ जाते. परंतु असे करणे हे कितपत योग्य आहे ? काव्यरचनेत जी एक भावनात्मक गतिमानता असते, कल्पनाविलासाचे नाजूक सौंदर्य असते, अर्थगर्भ पण नादमधुर शब्दांची जडणघडण असते, किंबहुना मोजक्या शब्दात जे एक नादमधुर काव्यशिल्प उभे असते ते या गद्य भाषांतरात नष्ट होऊन जाते. खऱ्या अर्थी पाहिले तर मूळ काव्यरचनेच्या कर्त्याच्या मनाशी एकरूप झालेला तितकाच दर्जेदार कवी अनुवादासाठी सिद्ध व्हावयास पाहिजे. एखादे स्वतंत्र काव्य रचणे वेगळे आणि परभाषेतील श्रेष्ठ कवीच्या काव्यमय कलाकृतीचे भाषांतर करणे वेगळे आहे. लॉर्ड वुडहाऊस्ली (Lord woodhouselee) म्हणतात, " A prose translation of a lyric is the most absurd of all such ventures and that none but a poet should translate a poem."

लॉर्ड वुडहाऊस्लीशी मतभेद व्यक्त करून हेलरी बेलॉक (Hilaire Belloc) याने म्हटले आहे की, ठराविक शब्दांची मर्यादा आशयाच्या अभिव्यक्तीला अडथळा आणते हे लक्षात घेऊन काव्याचे भाषांतर गद्यातच करणे हे सोईस्कर ठरते. त्याद्वारे गद्याच्या माध्यमातून भाषांतरकर्ता जसा मूळच्या रचनेला जवळ जातो तसाच तो वाक्प्रचार, शब्दसंहिता व अर्थगर्भता याच्याशीही विनचूकपणा दाखवितो. परंतु त्यांचे हे मत सोईस्कर वाटले तरी मान्यता पावणारे नाही. प्रस्तुत ठिकाणी एक उल्लेख करावासा वाटतो तो उमरखय्याम या फिरदोसी कवीच्या चार चार ओळींच्या

एक एक रुबायांचे भाषांतर करणाऱ्या, कलंदर वृत्तीच्या, भाषाप्रभुत्व असणाऱ्या एडवर्ड-फिट्झेरोल्ड (Edward Fitzerald) आणि मराठीतील फारशी भाषातज्ज्ञ प्रा. डॉ. माधवराव पटवर्धन ऊर्फ माधव ज्यूलियन यांचा !

१९ वे शतक हे भाषांतराचे युग होय. संस्कृत काव्याचे सुबोध मराठी भाषांतर करून काही कवींनी आपल्या संस्कृतीचे दर्शन घडविले. हरिविलासाचे स. मो. भिडेकृत भाषांतर, गो. ग. टिपणीसकृत कालिदासाच्या ऋतुसंहाराचे भाषांतर, किरातार्जुनाचे गो. ग. रानडेकृत भाषांतर यांचा येथे उल्लेख करता येईल.

१८५७ मध्ये मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली व अनेक सुशिक्षित व काव्यप्रेमी पदवीधरांनी इंग्रजी काव्य–नाटकांच्या भाषांतर– रूपांतराकडे लक्ष दिले. बजाबा रामचंद्र प्रधान यांनी इ. स. १८६७ मध्ये ' लेडी ऑफ दी लेक,' व ' धि. प्रिन्सेस ' या प्रदीर्घ काव्यांवरून ' दैवसेनी ' व ' इंदिरा ' ही रूपांतरे केली. या रूपांतराद्वारे ' एका कुपीतील अत्तर दुसऱ्या कुपीत ' ओतण्याचा, रसिक जनांना भाववणारा प्रयत्न झाला. एनॉक ऑर्डनचे कवी गिरीशकृत ' अनिकेत ' रूपांतर पाहावे. वि. मो. महाजनी हे भावकवितांच्या भाषांतर-विभागातील एक थोर व विद्वान कवी होते. पण त्यांच्याशिवाय एकनाथ गणेश भांडारे, वि. ग. नेने इत्यादींनी बऱ्याच सुंदर इंग्रजी कविता भाषांतरित वा रूपान्तरित केल्या. या इंग्रजी भावगीतांतून प्रामुख्याने प्रेमभावना, तिचे उत्कट, तर कधी संयमित रूप मराठी रसिकांच्यापुढे मांडले. स्थळ-काळ–संस्कृती–भाषा–व्यक्तिमत्त्व हे भेद असले तरी मनुष्यमात्राच्या मूलभूत प्रेम, वात्सल्य, दया इत्यादी सर्वस्पर्शी भावनांचा निर्भेळ आविष्कार, तरल कल्पनाविलासांसह मराठी काव्याला समृद्ध करू शकेल– आणि हेही नसे थोडके !

या उलट संस्कृत-मराठी यांचा अन्योन्य जन्यजननी संबंध आणि सांस्कृतिक समान भाववंध लक्षात घेता हे अनुवादाचे काम सहज जमलेले आढळते. याचा प्रत्यय शाकुंतल नाटकाच्या वा मेघदूताच्या अनुवादांत आढळून येतो. काही अनुवादकांनी कालिदासाच्या मेघदूतातील मंदाक्रांता वृत्तास साजेसे मराठी मंदाक्रांता वृत्त वापरले आहे तर भर्तृहरीच्या ' पृथ्वी ' वृत्ताबद्दल ' पृथ्वी ' वृत्त सहजतेने वापरण्याचा यशस्वी प्रयत्न झालेला आहे. तसाच जगन्नाथ पंडितांच्या ' भामिनी विलासा'च्या भाषांतरातही आढळतो.

काव्याच्या रचनेत लयबद्धता म्हणजे संगीतमयता फार महत्त्वाची असते. The Discovery of Poetry या ग्रंथात एस. एच. बर्टन म्हणतो, " Rhythm is a Fundamental phenomenon of life, and it is poetry's dependence upon it, that helps to make poetry so powerful an influence in the lives of man " कार्लाइलनेही या संदर्भात " Poetry is a musical thought " म्हटलेले आहे. आणि त्यामुळे मूळ कविता इंग्रजी असो वा संस्कृत वा

अन्य भाषेत असो, भाषांतरकर्त्याला स्वभाषेत काव्य उतरविताना 'संगीत व लय-बद्धता' डावलणे कठीण असते.

भाषांतरविषयक विविधज्ञानविस्तारकर्त्यांचे म्हणणे असे की, मराठी काव्ये ही रामायण-भारतादी संस्कृत ग्रंथांची अथवा त्यांतील प्रकरणांची 'केवळ भाषांतरे' आहेत असे कोणीही म्हणणार नाही व कोणी असा उल्लेख केला आहे असे आमच्या पाहण्यात नाही. बहुतेक मराठी काव्यास संस्कृत ग्रंथाचा आधार असल्यामुळे त्यास स्वतंत्र योग्यता जितकी असावी तितकी नाही, असे मात्र पुष्कळांचे मत आहे. म्हणजे महाराष्ट्रकाव्ये ही बहुधा संस्कृत ग्रंथातील कथानकांवरून रचलेली आहेत व त्या त्या विषयांवर संस्कृत काव्यरचना झाली असल्यामुळे व ती संस्कृत काव्ये समजण्यापुरते महाराष्ट्र कवींना संस्कृतभाषाज्ञान असल्यामुळे त्यांच्या महाराष्ट्र काव्यांतही पूर्वसंस्कृत काव्यांतील गुणदोष काही अंशाने आले आहेत. एका भाषेतील अर्थाचे प्रतिबिंब दुसऱ्या भाषेत यथास्थित पडले असता मूळ ग्रंथांतील विषयाची प्रतिमा जर दृष्टिगोचर झाली तरच ते भाषांतर ! कुमारसंभव, मेघदूत, भामिनी-विलास याप्रमाणे वामन, मोरोपंत, मुक्तेश्वर इत्यादिकांनी भारत, भागवत, रामायण या संस्कृत ग्रंथांची भाषांतरे केली असा आक्षेप कोणाचाच नाही.

पद्यात्मक भाषांतर करणे किती दुर्घट आहे यासंबंधी Drydan म्हणतो :–

"A man should be a nice critic in his mother-tongue before he attempts to translate in a foreign language. Neither is it sufficient that he be able to judge of words and style, but he must be a master of them too : he must perfectly understand his author's tongue, and absolutely command his own : So that to be a thorough translater, he must be a thorough poet. Neither is it enough to give his author's sense in good English, in poetica! expressions, and in musical numbers; for, though all these are exceedingly difficult to perform, yet there remains a harder task; and it is a secret of which few translators have sufficiently thought. I have already hinted a word or two concerning it ; that is, the maintaining character of an author, which distinguishes him from all others, and makes him appear that individual poet whom you would interpret."

THE SOLITARY REAPER– WORDSWORTH

Behold her, Single in the field
Yon solitary highland lass
Reaping and singing by herself
Stop here, or gently pass !
Alone she cuts and binds the grain,
And sings a melancholy strain
O Listen ! for the vale profound
Is overflowing with the sound.
No nightingale did ever chant
More welcome notes to weary bands
of travellers in some shady haunt,
Among Arabian sands ;
A voice so thrilling ne'er was heard
In spring-time from the Cuckoo-bird,
Breaking the silence of the seas
Among the farthest Hebrides.
Will no one tell me what she sings ?
Perhaps the plaintive numbers flow
For old, unhappy, far off things,
And battles long ago ;
Or is it some more humble lay,
Familiar matter of today ?
Some natural sorrow, loss or pain
That has been, and may be again !
As the theme, the maiden sang
Whatever if her song could have no ending ;
I saw her singing at her work,
And o'er the sickle bending ;
I listened motionless and still ;
And as I mounted up the hill
The music in my heart, I bore
Long after it was heard no more.

या काव्याचा विष्णू मोरेश्वर महाजनी यांनी केलेला अनुवाद पहा–

भिल्लकन्या

क्षेत्रीं पाहे एक कन्या उभी ते
धान्ये कापी, गायनाही करी ते ।
भिल्लीणीची एकली कन्यका हे
जाई वेगें दूर वा स्वस्थ राहे ॥१॥
धान्या कापी, बांधिते तेहि हातें,
चित्ताकर्षी काय तें गान गातें ।[१]
गानें सारी मोहिली सृष्टि साची
केंवीं वर्णूं माधुरी गायनाची ॥२॥
[२] नाहीं वृक्ष जिथें, प्रताप रविचा भासें जिथें भास्वर,
ऐसा शून्य मरूप्रदेश फिरूनी जो पांथ हो मंथर, ।
पाहोनी सहसा पथीं उपवनां धांवोनिया पातला,
त्याला गोड किती रसाल पिक जो काढी स्वना कोमला ॥३॥
आहे पिकाचा स्वन गोड तो जरी,
कंठास त्याच्या मधु देइ माधुरी–।
वाटे न तो गोड इच्या रवापरी
वर्णूं किती ? ही शिणलीच वैखरी ॥४॥
सांगे कोण मला, असे कवण तो भावार्थ तीचा मनीं ?
गेल्याचा करि शोक कीं ? झुरतसे गेलें मनीं आणुनी ?
भोगावें सुखदुःख हें प्रतिदिनीं लागे नराकारणें–
हा नित्य क्रम वर्णिला सुकविनें गाणें असें कीं म्हणे ? ॥५॥
तद्भावार्थ मला जरी न कळला, गाणें तिचें तें अहा ।
सांगूं गोड किती ? श्रुती परिसतां होती न तृप्ता पहा
स्वोद्योगीं रत, कापणीं करित ती गाइ सुखें कन्यका,
ऐकोनी रिझले, स्मरोनि रिझती आतां न ते कर्ण कां ? ॥६॥

(कुसुमांजली– प्रकाशन १८८५)

टीप : १) Melancholy बद्दल भाषांतर सूचक झाले नाही.
२) येथें मूळापेक्षां वेगळे वर्णन

स्थूलपणे हे शब्दशः भाषांतर नसले तरी वि. मो. महाजनींनी कविमन व काव्यविषय समजून घेतला व भावार्थ रमणीय शब्दांतून प्रकट केला आहे.

लाँगफेलो (Longfellow) या अमेरिकन कवीच्या जीवनस्तोत्र (A psalm of life) या कवितेच्या पुढील ओळी पहा–

" Lives of great men, all remind us
How we can make our life sublime "

या कवितेच्या भाषांतरात वि. मो. महाजनी म्हणतात–

" थोर पुरुष जे होउनि गेले त्यांची चरित्रे बोधविती–
सर्वांनाही करितां येईल. अल्पायासे थोर मती "

– या मराठीकरणात Life Sublime ची ' थोर मती ' या शब्दांत अर्थाची ओढाताण जाणवते.

" थोर महात्मे होउनि गेले चरित्र त्यांचे पहा जरा–"
आपण त्यांच्या समान व्हावे हाचि सापडे बोध खरा।

या हरिभाऊ आपटे यांच्या वरील ओळी बघा.

* * *

उमरखय्याम हा मूळ फिर्दोसी कवी. याने रूबाया रचल्या. त्याचे सुरस भाषांतर इंग्रजीत एडवर्ड फिट्झेरल्डने केलेले आहे.

" Here with a loaf of Bread, beneath the bough,
A Flask of wine, A Book of Verse– and thou,
Besides me, singing in the wilderness—
And wilderness is Paradise anow "

(Rubaiyat of OMAR KHAYYAM)
—Translated by Edward Fitzgerald

" या इथें तरुतळीं एक वही कवितेची,
भाकरी एक, अन् सुरई एक सुरेची,
आणखी एक तू जवळ गात या विजनीं–
अन् हे न रान मग, नंदनवन हो हेची ! "

(माधव जूलियन)

आशय संपूर्णपणे आलेला– पण भाषांतरात थोडा लवचिकपणा व थोडे स्वातंत्र्य आढळते. Wilderness ची अर्थछटा ' रान ' या शब्दात येत नाही.

जुगलबंदी

(डॉ. सुभाष मुंजे M.S.
दिलीप विष्णू कोलते M. A.)

उनका चेहरा जैसा
शबे चिराग
उनका हुस्न जैसी
शबनम की शराब ! (२१)


सांजदीपा ऐसे
त्याच्या चेहऱ्याचे पाणी
लावण्यही ऐसे
जैसी दंवाची वारुणी !

* * *

जिंदगी मे मेरी एक ऐसा तूफाँ आया
कि सारे महकते सितारों के ख्वाब टूट गये
और फिर इस तूफाँ को भी लुत्फ आया
जब मेरी कश्ती के भी लंगर टूट गये। (३७)

–माझ्या वेडच्या जीवनात
आला असा झंझावात
रात-चांदण्या स्वप्नांचा
काजळून उल्कापात
आता माझिया नावेचे
सारे तुटले आधार
आणि तूफानही करी
उफाळाचा स्वैराचार

* * *



मेघदूत–कालिदास

कश्चित्कान्ताविरहगुरुणा स्वाधिकारात्प्रमत्तः
शापेनास्तंगमितमहिमा वर्षभोग्येण भर्तुः।
यक्षश्चक्रे जनकतनयास्नानपुण्योदकेषु
स्निग्धच्छायातरुषु वसतिं रामगिर्याश्रमेषु ॥१॥

टीप– १) प्रस्तुत काव्य मंदाक्रांता वृत्तात रचलेले आहे. काव्याचा विषय विरहाचा, करुणजन्य आहे व त्यासाठी संथ चालीचे मंदाक्रांता वृत्तच योग्य ठरेल. २) या पहिल्या श्लोकातील कान्ता, विरह, शाप, स्थान, पुण्य, आश्रम, छाया इत्यादी शब्द मराठीत रूढ आहेत.३) संस्कृतमधील समास–संधी–रचना मराठीच्या प्रकृतीस मानवणारी नाही.

–या गोष्टी लक्षात ठेवूनच भाषांतराकडे पाहिले पाहिजे. मेघदूत– काव्य हे रसिक कविमनाला नेहमीच एक आव्हान ठरले आहे. त्यामुळे कृष्णशास्त्री चिपळूणकर, रा. प. सबनीस, ना. ग. गोरे, श्रीखंडे, ग. नी कात्रे, बा. भ. बोरकर, चिं. द्वा. देशमुख, कुसुमाग्रज, वसंत पटवर्धन, राजा बढे इत्यादींनी मेघदूताचे मराठी भाषांतर करण्याचे प्रयत्न केलेले आहेत.

सुरस व सफाईदार भाषांतराचे काही प्रयत्न पुढे दिले आहेत.

बा. ल. अंतरकरांनी मेघदूताचे 'मेघदूतच्छाया' मूळ मंदाक्रान्ता वृत्ताबरहुकूम भाषांतर केले. या 'भाषांतर' शब्दाबद्दल गेल्या शतकापर्यंत रूढ झालेला 'छाया' हा शब्द त्यांनी वापरला आहे.

कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी मेघदूताचे केलेले भाषांतरही बघण्यासारखे आहे

" कोणा एका यक्षें केलें अलक्ष आपुल्या कामीं.
तेणे कोपुनि शापी त्यातें धनद तयाचा स्वामी ॥१॥
म्हणे जयेशीं लंपट होउनि मत्त असा झालास
त्या दयितेचा घडो विरह तुज पूर्ण द्वादश मास ॥२॥
मग तो येउनि रामगिरीवर आश्रम बांधुन राहे
सीतास्नानें पवित्रनिर्झरवारी जेथें वाहे ॥३॥
तो कामी त्या गिरिवरि काढी कष्टे कांही मास
विरहें झुरता झडुनि जयाचें गेले सर्वही मांस ॥४॥

(पद्यरत्नावली)

कोणा यक्षाकडूनि घडुनी काही कर्तव्यदोष
स्वामीशापें सखिविरहि तो गुंतला एक वर्ष
कंठी अस्तप्रभ दिवस तो रामगिर्याश्रमांत
सीतास्नानें जल शुचि जिथे, वृक्ष छायार्द्र दाट ॥१॥

– कविवर्य बा. भ. बोरकर.

वर्षभराच्या वनिता विरहे दुःसह शाप ठरोनी
वैभववंचित कर्तव्यच्युत कुबेरसेवक कुणी
जनककन्यकास्नानाने जल जिथले पावन असे
वनराई जिथ दाट, आश्रमी, रामगिरीवर वसे ॥१॥

– वसंत पटवर्धन

कुबेरशापें रामगिरीवर यक्ष राहतो कुणी
साहतो सखि विरहा निशिदिनी
अधिकाराने धुंद जाहला मिळे चुकीचे फळ
सारखी जीवातें तळमळ
जिथे नाहली सती जानकी, पावन जल जाहले
पडतां कांतारी पाउले
वर्ष एक कंठणे काळ हा, ते विरही जीवन
तरूंच्या शीतल छायेतुन
आठवीत प्रिय रमणी मुख ते रामगिरीं आश्रमी
नांदतो यक्ष एकला श्रमी ॥१॥

– राजा बढे

टीपा : १) बोरकरांची रचना मंदाक्रान्तात आहे, पटवर्धनांचे वेगळे वृत्त आहे. २) कान्ता शब्दाबद्दल बोरकर 'सखी' वापरतात, तर पटवर्धन 'वनिता' वापरतात. चिं. द्वा. देशमुखांनी 'स्त्री' हा फारच मोघम शब्द वापरला आहे. सखी, वनिता, स्त्री हे सर्व शब्द 'कान्ता'ला समानार्थक आहेत काय ? ३) राजा बढे शब्दाला प्रतिशब्द देण्याऐवजी, कवीच्या कल्पना व भावना, वेगळ्या पद्धतीत व प्रदीर्घ वेगळ्या वृत्तात मांडतात.

* * *

तस्मिन्नद्रौ कतिचिदबलाविप्रयुक्तः स कामी
नीत्वा मासान् कनकवलयभ्रंशरिक्तप्रकोष्ठः ।
आषाढस्य प्रथमदिवसे मेघमाश्लिष्टसानुं
वप्रक्रीडापरिणत गज प्रेक्षणीयं ददर्श ॥२॥

– या श्लोकातील अद्री, प्रकोष्ठ, ददर्श हे संस्कृत शब्द मराठी वाचकांना अगदी अपरिचित व दुर्बोध ठरतील. प्रकोष्ठबद्दल काही कवींनी मनगट, हात, हस्त; अद्रीबद्दल गिरी, अचल, शैल, पर्वत इ. शब्द वापरले. पण त्या सर्वांत कुसुमाग्रजांनी वापरलेला 'पर्वत' अधिक जवळचा व सुबोध ठरेल.

–पण याहीपेक्षा अधिक सोपे, नादमधुर व अर्थगर्भ मराठी भाषांतर राजा बढे यांचे वाटेल. त्यांनी अधिक विस्तृत वृत्त घेतले. मूळ नसूनही मेघाला रक्तधूसर हे विशेषण स्वतःच्या कल्पकतेने दिले आहे. तसेच 'होती मंथर घटका पळे' किंवा 'उडवित माती घेई मस्तकी' हे शब्दसमूह कवी अधिक घालतो. यात काव्यात्मकता जाणवते, पण शब्दांशी निष्ठा राहत नाही.

मराठी भाषांतर

कामी कांतावियुक्त गिरिवरी कंठी काही मास
तेव्हा मनगट रिते तयाचे, सुवर्णवलय गळून
आषाढाच्या प्रथमदिनी तया दिसे मेघ गिरिशिखरा
आलिंगुनिया रम्य, जणो गज तटा धडकता झुकला ॥२॥

– रा. प. सबनीस

कामी काही कंठी विरही मास, वाळली काया
सुवर्णकंकण गळे हातचे, बघे भव्य दृश्या ह्या
आषाढाच्या पहिल्या दिवशी ढग वेधुनिया घेतो
गिरिशिखरा जणु गज मौजेने, धडक्या बांधा दे तो ॥२॥

– ना. ग. गोरे

प्रेमी कांताविरहि अचली घालवी मास काही
गेले खाली सरुनि वलय स्वर्ण हस्ती न राही
आषाढाच्या प्रथमदिनि तो मेघ शैलाग्रि पाहे
दन्ताघाते तटि गज कुणी भव्यसा खेळताहे ॥२॥

– चिं. द्वा. देशमुख

त्या अचलावर कामी जन तो मास घालवी काही
सुवर्णकंकण न ठरे हाती, असा वाळला विरही
आषाढाच्या पहिल्या दिवशी बघे रम्यशा ढगा
तट झुंजीच्या खेळी रमल्या गजसा भिडला नगा ॥२॥

– वसंत पटवर्धन

शैलीं त्या प्रणयि इतुका कांहि मासांत भागे
कीं स्वर्णाचें वलय गळुनी कोपरा थेट लागे
आषाढाच्या प्रथम दिवशीं टेकला अद्रिरेखे
दंताघाती समद गजसा देखणा मेघ देखे ॥२॥

– बा. भ. बोरकर

कृश हातातून गळून पडले सोन्याचे कंकण
कामातुर हो हृदय कामिनी दूर राहिली पण
आषाढाच्या प्रथमदिनीं त्या दिसे पर्वतावरी
नयनरम्य घन, करी कड्यावर गज वा आक्रमण ॥२॥

– कुसुमाग्रज

दिवस मास यापरी कंठितो यक्ष कामविव्हल
प्रियेविण मन होई व्याकुळ
क्षीणतनू जाहली करातिल कांचन कंकण गळे
होती मंथर घटका पळे.
आषाढाच्या पहिल्या दिवशीं शैलशिरीं सुंदर
पाहिला मेघ रक्तधूसर,
उडवित माती घेई मस्तकीं– लीला चेतोहर
झुंजितो कभिन्न नभकुंजर ।"

– राजा बढे

मूळ संस्कृतातील एका श्लोकाच्या भाषांतराचे सात नमुने तौलनिक अभ्यासासाठी घेतले आहेत. सर्वसाधारणत: आशय एकच असला तरी अभिव्यक्तीचे स्वरूप भिन्नभिन्न आहे.

स्थिता तस्मिन् वनचरवधू भुक्तकुंजे मुहूर्तं
तोयोत्सर्गद्रुततरगतिस्तत्परं वर्त्म तीर्ण: ।
रेवा द्रक्ष्यस्युपलविषमे विंध्यपादे विशीर्णा ।
भक्तिच्छेदैरिव विरचितां भूतिमङ्गे गजस्य ।।१९।।

वनचरवधूबद्दल सर्वच कवींनी भिल्लीण हा समर्पक व सुंदर शब्द वापरला. विंध्यपादबद्दल पायथा अधिक सोपा शब्द. राजा बढे भिल्लीण ऐवजी 'शबर नववधू' वापरतात. त्यांचे वृत्तही विस्तारित आहे. नर्मदेच्या पात्रातील 'संगमरवर' ही कल्पना मनोज्ञ, पण मुळात नाही.

– काव्यरचनेतील शब्दप्रभुत्व, नादमयी अनुप्रासमय रचना– उदा. वनवधू विहार, निबीड निकुंज, केलिकूजन जलवृष्टीने जाई जलदा– आल्हादकारक वाटते.

मराठी भाषांतर

कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी केलेले विस्तारित भाषांतर–

भिल्लकामिनी सुखें क्रीडती जेथें तरुकुंजात,
मंद वृष्टि त्या क्षणभरि गिरिवरि करी ठरूनिया शांत ।।४५।।
विंध्याद्रीच्या कठिण कड्यांहुनि पडता मग रेवेला
पुढें देखशिल गजशरीरावरि जेंवि वर्णरचनेला ।।४६।।
क्षण थांबावे कुंजी जेथे तरुण भिल्लिणी रमती
शिंपुनि पाणी हलक्या अंगे शीघ्र चाल तू पुढती

विंध्याद्रीच्या खडक पायथ्यावर फुटली रेवेची
पहा धार की गजदेहावर रंगावलि वेलीची ।।१९।।

– ना. ग. गोरे

लतागृहातून विहार करती जिथे भिल्लिणी सदा
गिरिवरती त्या जरा विसावुन पुढती जा नीरदा
विंध्याचा खडकाळ पायथा जेथ पहा वाहते
गजांग चित्रित रेषांसम ती वेगवती नर्मदा ।।१९।।

– कुसुमाग्रज

जिथे भिल्लिणी रमल्या कुंजी, थांबुनि घटिकाभर
सरी वर्षुनी, द्रुतगति जाता बघशिल सीमेवर
खडकामधुनी विंध्यतळाशी विशीर्ण वाहे रेवा
गजांवरी जणू जाहला नक्षीचा शिडकावा ।।१९।।

– वसंत पटवर्धन

शबर नववधू विहार करिती निबिड निकुंजातुनी
जरासा थांब केलिकूजनीं
जलवृष्टीने होशिल द्रुतगति जाई जलदा पुढे
सोडुनि उंच सखल ते कडे
विंध्याद्रीच्या पायथ्यावरी लोळतसे नर्मदा
संगमरवरातुनि वाहता
दिसे काढली कुंजरतनुवरि सुरंग जलवल्लिका
रेवती चतुर चित्रबालिका ।।१९।।

– राजा बढे

* * *

नीतिशतक (भर्तृहरी) (काव्य– पृथ्वी)

शशी[१] दिवसधूसरो गलितयौवना कामिनी[२]
सरो[३] विगतवारिजं मुखमनक्षरं स्वाकृते : ।।
प्रभुर्धनपरायणः सततदुर्गतः सज्जनो
नृपाङ्गणगतः खलो मनसि सप्त शल्यानि मे ।। १०२ ।।

नीतिशतक (काव्य– शा. वि.)

वामनपंडित : चंद्राला दिवसां प्रकाश नसणें ये कामिनीला जरा
पद्मावीण जले, निरक्षर, मुखी जो नेटका गोजिरा ।।
दात्याला धनलोभ नित्य, असणें, दारिद्र्य विद्वज्जनीं ।।

दुष्टाचा पगडा महीपतिगृहीं हीं सात शल्यें मनीं ॥
(श्लोक १०२ पृष्ठ ७६)

ल. गो. विंझे : व्हावा चंद्र भुरा फिकाच दिवसां स्त्रीचें झडे यौवन
व्हावें पद्मविहीन ते सर; मुखीं सौंदर्य विद्येविण ॥
पैशाचा प्रभुलाच लोभ असणे, थोरां सदा दुःस्थिति
राजाच्या गृहिं दुष्ट; सात मज हीं शल्यें मनीं टोचतीं ॥
(श्लोक १३ पृ. ७६)

शशीहि दिवसां भुरा; तरुणिचें झडे यौवन
तळे कमलहीन, रूपयुत हाय विद्येविण ॥
धनीच धनलुब्ध; नित्य सुजनांस ये दुर्गति
नृपाघरिंच दुष्ट; सात खुपतात शल्यें हृदी ॥ १०२ ॥

– पृथ्वी वृत्त

१) 'चंद्राला दिवसा प्रकाश नसणे' हे वामन पंडितांचे भाषांतर सरस वाटते. 'शशी' हा चंद्राबद्दलचा शब्द फारसा मराठी वापरातला नाही. चंद्र हा संस्कृत शब्द मराठीत तत्सम रूढ झालेला नाही.

२) कामिनी शब्दाचा ध्वन्यर्थ 'स्त्री' आणि 'तरुणी' या शब्दांत व्यक्त होत नाही. म्हणून तोच शब्द वामनपंडित योजतातः

३) 'पद्माविण जले' यात 'सर' हा शब्द आलेला नाही. दुसऱ्या श्लोकात 'सर' शब्द तसाच राहिला तो मराठी वाटत नाही. त्यामानाने तिसरा 'तळे' हा शब्द योग्य जवळचा वाटत नाही.

* * *

वैराग्यशतक– भर्तृहरी (शा. वि.)

आयुर्वर्षशतं नृणां परिमितं, रात्रौ तदर्धंगतं ।
तस्यार्धस्य परस्यचार्धमपरं बालत्ववृद्धत्वयोः ॥
शेषं व्याधिवियोग दुःखसहितं सेवादिभिनीयते ।
जीवे वारितरंङ्बुदबुदसमे सौख्यं कृतः प्राणिनाम् ॥ १३ ॥

मराठी भाषांतर

वामन पंडित : १) आयुष्य वर्षशत, त्यांत निमें निजेलें
(वसंततिलका) त्याही निम्यांतही निमे दिन बाद झाले ॥
वार्धक्य, शैशवपणे; उरले वियोगें
दुःखामयेंचि भरले सुख काय सांगे ?॥ १३ ॥
(पृ. २२९ श्लोक १३)

ल. गो. विझे :
(शार्दूलविक्रीडित)

आधी शंभर वर्ष आयु अवघें, रात्रींत अर्धें सरे
अर्धें त्यांतिल बाल्य वृद्धपण तें; अर्ध्यांत अर्धें उरे ॥
सेवा, रोग, वियोगदुःख, मिळुनि जे शेष ते संपले
पाण्याचा जणु जीव हा बुडबुडा, त्या सौख्य हो
कोठले! ॥१३॥

(पृ. २२९ श्लोक १३)

मूळ शार्दूलविक्रीडित वृत्त विझे कायम ठेवतात तर वामन पंडित कमी अक्षरांचे वसंततिलका निवडतात. शब्दसौष्ठव व मराठीकरण या दोन्ही दृष्टीने विझे सुरस ठरतात. उदा. आयुर्वर्षशतचे भाषांतर वामनपंडित करीत नाहीत.

'निमे' आणि 'निजेले' हे वामनपंडितांचे शब्द कानाला खटकतात. त्यापेक्षा **'रात्रीत अर्धे सरे'** हे विझे यांचे भाषांतर योग्य वाटते.

जगन्नाथपंडित

भामिनीविलास :
(३, १७. सं.)

स्वप्नान्तरेऽपि खलु भामिनि पत्युरन्यं
या दृष्टवत्यसि न कञ्चन साभिलाषम् ।
सा संप्रति प्रचलितासि गुणैर्विहीनं
प्राप्तु कथं कथय हन्त परं पुमांसम् ॥

न पाही स्वप्नींही पतिविण कधीं जी नर दुजा
स्पृहायुक्ते चित्तें जितकमलनालोत्तमभुजा ।
सुशीला तूं ऐशी पर पुरुष जो निर्गुण तया
कशी पाहूं जशी हरिणनयने सत्वरतया ॥

(पद्यरत्नावली)

भामिनीविलास :
(३. ६. सं.)

निर्दूषणा गुणवती रसभावपूर्णा
सालङ्कृतिः श्रवणकोमलवर्णराजिः ।
सा मामकीनकवितेव मनोभिरामा
रामा कदापि हृदयान्मम नापयाति ॥

गुणांनीं जी पूर्णा अणुसम नसे दोषहि जिला
अलंकारीं साजे रस वसतसे जीत पहिला ।
मृदू जीचे वर्ण श्रवणसुख देती परिसतां
वसे ती पद्माक्षी मम हृदयि जेंवी सुकविता ॥

(पद्यरत्नावली)

८ : नाटकाचे भाषांतर

मराठीत परकीय भाषेतील नाटकांची भाषांतरे, अनुवाद, वा रूपांतर करण्याची पद्धत गेली १५० वर्षे चालू आहे. त्यातल्या त्यात मराठीला जननीसमान असणाऱ्या संस्कृतमधील नाटकांची भाषांतरे एकोणिसाव्या शतकात मराठीत पुष्कळच समाधानकारक उतरलेली आहेत. संस्कृत काय किंवा मराठी काय, या नाटकात आढळणारे लोकजीवन भारतीय आहे, हिंदू धर्मीय आहे; भारतीय संस्कृतीचा अतूट वारसा तिच्यात आहे. लोकजीवनाची अनेक वैशिष्ट्ये– उदा. सणवार, खाद्यपदार्थ, शकुन-अपशकुन, चालीरीती, देवदेवता व त्यांच्या उपासना, विवाहादी संस्कार, राजा, प्रधान, सेनापती इत्यादी अधिकारीवर्ग याबाबत एक समानता सर्वत्र आढळते. त्यामुळे संस्कृतातून मराठीत नाटके उतरताना संस्कृतिभेद व चालीरीतींचा भेद फारसा आढळत नाही. पुष्कळशा पात्रांची व गावांची नावे संस्कृत भाषेच्या काळापासून आजतागायत आपल्या परिचयाचीच आहेत. त्यामुळे पात्रे व प्रसंग याबाबत भेद जाणवत नाही. याही शिवाय आणखी एक मुद्दा– संस्कृतमधून तत्सम् व तद्भव पद्धतीने अनेक शब्द मराठीत अनेक शतके आलेले आहेत व काळाच्या ओघात ते रूढही झालेले आहेत. म्हणून संस्कृत नाटकांवरून जी जी नाटके मराठीत उतरली ती ती आपल्याला घटनेच्या दृष्टीने, पात्रांच्या दृष्टीने, स्थळकाळाच्या दृष्टीने जवळची वाटतात. उदा. भट्टनारायणाचे 'वेणी संहारम्' हे नाटक, परशुरामपंत तात्या गोडबोले यांनी मराठीत उतरविले. महाभारताच्या कथेशी सामान्य मराठी वाचक लहानपणापासून परिचित असल्यामुळे ही कथावस्तू (त्यातील पात्रे व प्रसंग) आपणांस परिचित वाटली, जिव्हाळ्याची वाटली. या नाटकातील दुर्योधन व भानुमती, अश्वत्थामा व कर्ण, द्रौपदी व भीम ही पात्रे व त्यांचे स्वभावविशेष जसे पूर्वपरिचित तसेच या नाटकात दाखविलेल्या घटनाही

माहीत असलेल्याच आहेत. म्हणून हे नाटक मूळ नाटकाइतकेच समजुतीस आले व जिव्हाळ्याचे वाटते.

कालिदासाच्या 'शाकुंतल' नाटकाची कथा ही देखील महाभारतातल्या आदिपर्वातील आहे. या कथेवर आधारलेली मुक्तेश्वर, मोरोपंत यांची आख्याने आपणास अतिपरिचित आहेत. ती अल्लड शकुंतला, तो रसिक दुष्यंत राजा, त्या लडिवाळपणे वागणाऱ्या शकुंतलेच्या सख्या, ते धीरोदात्त पण प्रेमळ कण्वमुनी या व्यक्तिरेखा जशा आपल्या प्रीतीस पात्र झालेल्या तशाच पहिल्या अंकातील दुष्यंत व शकुंतला यांची आश्रमातील भेट व त्यातील शृंगार, शकुंतलेची सासरी झालेली पाठवणी व त्यातील कारुण्य, दुष्यंताच्या दरबारातील दुष्यंताने न दाखविलेली ओळख व नंतर झालेली दैवी आकाशवाणी, हे सर्व आपल्यास पूर्वपरिचित आहे.

त्याप्रमाणे भवभूतीच्या उत्तररामचरितातील धीरोदात्त राम व त्याने केलेला सीतेचा त्याग ही कथाही रामायणाच्या वाचकांना नवीन नाही. मग भाषांतर करताना जो फरक जाणवेल तो फक्त संस्कृत भाषेची प्रकृती व मराठी भाषेची प्रकृती यांच्या मधलाच !

संस्कृत भाषेत संधी-समासाने आलेले क्लिष्टत्व हा एक संस्कृत भाषेच्या प्रकृतीचा अविभाज्य भाग आहे. तर त्या मानाने मराठी भाषेचे वळण सरळ व सोपे आहे. त्यामुळे संस्कृत-मराठी हा भाषांतराचा मार्ग सुलभ आणि प्रवाही ठरलेला आहे.

अशा या भाषांतरप्रक्रियेत लक्षात ठेवावयाचे काय, तर मूळ कथावस्तूबरोबरच संस्कृत नाटककाराच्या भाषेतील कवित्व व कवीची भाववृत्ती यांचा समन्वय मराठी भाषांतरकर्त्याला कितपत जमला आहे ? कालिदासासारख्या श्रेष्ठ व प्रतिभासंपन्न नाटककाराच्या काव्यात्मकतेशी भाषांतरकर्ता येथेच थोडाफार कमी पडणार असे आढळते.

परशुरामपंत तात्या गोडबोले यांनी १) उत्तररामचरितम् २) वेणीसंहार ३) शाकुंतल ही नाटके भाषांतरद्वारे मराठीत आणली व सामान्य वाचकांना ती रसाळ व सुबोध वाटली– पण अण्णा तथा शंकर पांडुरंग किर्लोस्करांनी कालिदासाच्या शाकुंतलावरून थोडा फेरफार करून जी मराठी रंगावृत्ती तयार केली ती रंगभूमीवर विशेषच प्रसिद्ध ठरली. स्वतः अण्णा किर्लोस्कर, वाघुलीकर, भाऊराव कोल्हटकर व नंतरच्या काळात बालगंधर्व इत्यादी असामान्य ताकदीच्या गायकनटांनी कालिदासाचे नाट्यकर्तृत्व महाराष्ट्रात घरोघरी पोचविले.

ब) इंग्रजी नाटकांचे भाषांतर–

संस्कृत नाटकांची मराठी भाषेत भाषांतरे करताना विशेष कठीण नव्हते.

परंतु परकीय भाषेतील नाटकांची– प्रामुख्याने इंग्रजी भाषेतील नाटकांची– मराठीत भाषांतरे करताना अनेक प्रश्न उपस्थित होतात.

१) इंग्रजी नाटकांचे शब्दशः भाषांतर करावे हा एक विचारवंताचा प्रश्न आहे. त्यामुळे पाश्चात्त्य देशातील लोकांची विशेषनामे, तेथील भूप्रदेश व गावांची नावे, नाट्य-घटना ज्या देशात घडते त्या देशाचा इतिहास व पूर्व-परंपरा, ज्या देशातील धर्मविचार व त्या अनुषंगाने तेथील लोकजीवनात दृढमूल झालेले रीतीरिवाज, सणवार इत्यादींचे मराठी लोकांना ज्ञान होते व संस्कृतिभेदाचेही ज्ञान होते.

२) परंतु हे करण्यात सामान्य वाचकांना अर्थबोधास ती कलाकृती अवघड वाटते. उदा. हॅम्लेट, किंग क्लॉड्रीयस, राणी गर्ट्रूड, वृद्ध सरदार पोलोनियस इत्यादी नावे भारतीय मनाला दुर्बोध वाटतात; नेहमीची परिचित नाहीत. तसेच डेन्मार्क देश किंवा फ्रान्स देश व तेथील ख्रिश्चन धर्मीय लोकांचे रीतरिवाज उदा. मृतांचे अंत्यसंस्कार, प्रेत पुरणे वगैरे, बायकांचे स्मशानात जाणे, दीर-भावजयीचे लग्न इत्यादी गोष्टी, आपल्या मनाला पटत नाहीत. हा संस्कृतीभेद कोणत्याही परकीय नाटकाच्या भाषांतरप्रसंगी आपणास जाणवतो. नाटकातील नायक, नायिका व इतर व्यक्तिरेखा ह्यांच्याशी आपण चटकन समरस होत नाही ही एक महत्त्वाची अडचण. त्याचबरोबर स्वकीय भाषेवर प्रभुत्व असले तरी परकीय भाषेतील शब्दांचे कोटिक्रम, अलंकारांतील उपमान व उपमेय इत्यादी संदर्भ आणि काही ठिकाणांचा कल्पनाविलास आणि मुख्यत्वे, विशेषतः पाश्चात्य वृत्तात ग्रथित केलेली कविता यांचा अर्थबोध व रसास्वाद अनेकदा मराठी भाषांतरात उतरत नाही व मूळ परकीय भाषेतील लेखकावर अन्याय होतो.

यामुळे काही विचारवंत भाषांतराऐवजी रूपांतर या मार्गाचा स्वीकार–अवलंब– करतात. मूळ कथेचा सांगाडा कायम ठेवावयाचा, तेथील परकीय वातावरण बदलून त्यांच्याशी मिळतेजुळते स्वकीय वातावरण निर्माण करावयाचे व परकीय कलाकृतीमधील पात्रांची नावे, गावे बदलून ती भारतीय जीवनाशी सुसंगत करून घ्यावयाची, मात्र त्या पात्रांचे मूळ मानवी स्वभावधर्म चांगले-वाईट असतील ते कायम ठेवावयाचे व अशाद्वारे परकीय श्रेष्ठ कलाकृतीचा आस्वाद घेण्यास स्वकीयांना प्रवृत्त करावयाचे. पण अर्थातच हा रूपांतराचा मार्ग प्रथमश्रेणीचा नाही. तो दुय्यम व गौण स्वरूपाचा आहे. केवळ आपद्धर्म म्हणूनच त्याचा स्वीकार करावयाचा. अनेक पाश्चात्त्य विचारवंतांना भाषांतराऐवजी रूपांतर करण्याचा हा गौण मार्ग पसंत नाही. पण केवळ एक पर्याय म्हणूनच त्याचा आपण स्वीकार केला आहे असे आपणास शेक्सपिअर वा अन्य नाटककारांच्या ज्या श्रेष्ठ कलाकृती मराठीत आलेल्या आहेत त्यावरून म्हणावे लागेल.

शेक्सपिअरच्या हॅम्लेटवरून आगरकरांचे 'विकारविलसित' व त्यातील

'चंद्रसेन', अनंत विनायक बर्वे यांचा 'हिंमतबहादर', व कानिटकर यांचा 'दानव-खंडातील राजपुत्र' (Prince of Denmark) या कलाकृतीवरून स्पष्ट होईल व त्याची सविस्तर चर्चा पुढील प्रकरणात दिलेली आहे.

६) मेटरलिंक या गेल्या शतकातील कवी-प्रतिभेच्या नाटककाराने लिहिलेले 'मोना व्हॅना' नाटक त्याच दर्जाच्या प्रतिभासंपन्न कवीने– आजचे मराठीतील श्रेष्ठ कवी व ज्येष्ठ नाटककार श्री. वि. वा. शिरवाडकर यांनी 'वैजयंती' या नावाने केलेले आहे. तसेच शेक्सपिअरच्या 'मॅकबेथ' या नाटकाचे रूपांतरही 'मानाजी-राव' या नावाने शि. म. परांजपे यांनी केले आहे, तर कविवर्य शिरवाडकर यांनी 'राजमुकुट' या नावाने केले आहे.

शेक्सपिअरच्या 'ऑथेल्लो' नाटकाचे भाषांतर १८६२ मध्ये महादेवशास्त्री कोल्हटकरांनी व नंतर १८९० मध्ये देवल यांनी 'झुंझारराव' या नावाने रूपांतर केले असले तरी शेक्सपिअरच्या काव्याचे व शब्दकळेचे दर्शन तेथे होत नाही. त्यासाठी शिरवाडकरांनी (१९६२) लिहिलेले 'ऑथेल्लो' हे भाषांतरित नाटक पाहणे इष्ट ठरावे.

शेक्सपिअरच्या 'किंग लिअर' वरून विंदा करंदीकरांनी अनुवाद केलेला आहे– (त्यापूर्वी शंकर मोरो रानडे यांनी 'अतिपीड चरित्र' हा एक अनुवाद केलेला होताच.) आचार्य अत्रे यांनी 'सम्राट सिंह' हे केलेले रूपांतर स्वैर आहे.

काव्य व नाटक यांच्या भाषांतराविषयी चिपळूणकर शेक्सपिअरच्या सिंबेलाईनवरील भाषांतरित तारा नाटकाच्या संदर्भात म्हणतात– "परभाषेतील विचार आपल्या भाषेत उतरून देणे हे काम कठीणच; त्यातून, कवितेचे भाषांतर तर विशेषतः दुर्घट; आणि त्यातही शेक्सपिअर बोवांशी गाठ म्हटले म्हणजे तर भाषांतरकाराने ठिकठिकाणी हातच टेकायला पाहिजेत. या गोष्टीचा अनुभव ज्यांनी प्रस्तुत कवीचा एखादा ग्रंथ परीक्षेकरता वगैरे त्रांगला लक्षपूर्वक वाचला असेल त्यांस विचारावा ! तर अशा ग्रंथकाराच्या कृतीचे मराठीसारख्या अत्यंत विसदृश भाषेत प्रतिबिंब उठवून द्यावयाचे म्हणजे मोठ्या प्रयासाचे काम आहे यात संशय नाही. ते प्रस्तुत ग्रंथकाराने इतपत उठवून दिले आहे यावरून त्याचे परिश्रम व त्याचे चातुर्य ही व्यक्त होतात. छापण्यास पाठवण्यापूर्वी कित्येक मित्रांकडे सदरील पुस्तक पाठवले होते असे प्रस्तावनेच्या शेवटी लिहिले आहे; या गोष्टीचे मर्मही तज्ज्ञ वाचकांच्या लक्षात येईलच. असो; पण या कृतीवर मूळ भाषांतरकर्त्याचे व इतरांचे अनेक परिश्रम झाले असता काही ठिकाणी तीत इंग्रजीची झाक अद्याप राहिली आहे, व कोठे कोठ वाक्यरचनेचाही घोटाळा राहिला आहे. तसेच काही ठिकाणी प्रवेशादी निर्देशांतही नजरचूक झालेली आढळते."

– हा शास्त्रीबुवांचा अभिप्राय थोड्याफार फरकाने शेक्सपिअरच्या इतर

नाटकांची ज्यांनी भाषांतरे वा रूपांतरे केली आहेत, त्यांनाही लागू पडण्यासारखा आहे.

* * *

कु. रजनी ठकार यांच्या " हॅम्लेट व या नाटकाचे तीन अनुवाद " या तौलनिक अभ्यासावर आधारित अप्रकाशित प्रबंधातून घेतलेले उतारे

* * *

शेक्सपिअरच्या मूळ, हॅम्लेट या नाटकातील **संवादात्मक** व **स्वगतपर** उताऱ्यांची भाषांतरदृष्टचा पाहणी करणे उद्‌बोधक ठरेल.

ACT 1

Scene 1 : Elsinore. A platform before the castle.

Francisco at his post; Enter to him Bernardo.

Bernardo : Who's there ?

Francisco : Nay, answer me ; stand and unfold yourself.

Bernardo : Long live the king !

Francisco : Bernardo ?

Bernardo : He.

Francisco : You come most carefully upon your hour.

Bernardo : 'tis now struck twelve; get thee to bed, Francisco.

Francisco : For this relief much thanks; Tis bitter cold; And I am sick at heart.

अंक पहिला

प्रवेश १ ला स्थल :- कुंजपूर किल्ल्यापुढचा **सपाट प्रदेश.**

[ताम्रचूड पहाऱ्यावर असता पिंगलक प्रवेश करितो. [

पिंगलक : कोण तो तिकडे ?

ताम्रचूड : थांब, आधी तूच कोण आहेस ते मला सांग.

पिंगलक : राजाला उदंड आयुष्य असो !

ताम्रचूड : कोण, पिंगलक ?

पिंगलक : हो, मी तो.

ताम्रचूड : तू अगदी घंटचाबरोबर आलास बोवा.

पिंगलक : अरे, आता बाराचा ठोका पडला; तू नीज जा कसा.

ताम्रचूड : येऊन वेळच्या वेळी सोडविलेस, याबद्दल देव तुझे भले करो. कोण थंडीचा कडाका ! मला हीव भरून आले आहे !

१) घड्याळाअभावी काळ दाखविण्याची शेक्सपिअरकालीन पद्धत 'टोला वाजवणे' कायम ठेवण्याच्या उद्देशाने 'घंटचाबरोबर' हा शब्द 'तासाला योग्य वेळी' या अर्थाने सहजतेने भाषांतरात वापरला असून मराठी भाषेचे तत्कालीन वळण लक्षात येते.

२) 'बोवा' हा शब्द अतिरिक्त नसून वा व्यक्तीला उद्देशून वापरलेला नसून तत्कालीन बोली भाषेचे प्रतिबिंब सहजपणे जाणवते.

3) "get thee to bed" याबद्दल 'तू नीज, जा कसा'. हे आगरकरांचे भाषांतर जास्त समर्पक आहे. वीरसेनमधील (कानिटकर) 'डुलकी' हा भाषांतरित शब्द अप्रयोजक आहे.

४) platform before the castle : किल्ल्यापुढचा सपाट प्रदेश–

आगरकर

किल्ल्यासमोरचे पटांगण– बर्वे व कानिटकर

५) unfold चे बर्वे यांचे (हिंमतबहाद्दर) भाषांतर 'परवलीचा शब्द' असे आहे.

Bernardo : Have you had quiet guard ?

Francisco : Not a mouse stirring.

Bernardo : Well, good night.
If you do meet Horatio and Marcellus,
the rivals of my watch, bid them make haste.

Francisco : I think, I hear them. Stand ho ! who is there !
(Enter Horatio and Marcellus)

Horatio : Friends to this ground.

Marcellus : And liegemen to the Dane.

Francisco : Give you good night.

पिंगलक : पहारा करीत असता काही कमी अधिक तुझ्या पाहण्यात आले नाही ना ?

ताम्रचूड : छे, छे, चिटपाखरूदेखील जाग्यावरून[१] हलले नाही.

पिंगलक : ठीक आहे.[२] राम राम. माझ्या पाठीमागून प्रियाल आणि वत्सनाभ यांचा पहारा आहे, यासाठी तुला ते कोठे भेटले तर त्यांना इकडे लवकर धाडून दे.

ताम्रचूड : अरे, ते आलेसे वाटतात.
[प्रियाल आणि वत्सनाभ प्रवेश करितात.]
उभे रहा; उभे रहा; कोण रे ते ?

प्रियाल : देशाचे हितचिंतक.[३]

वत्सनाभ : आणि राजाची रयत.

ताम्रचूड : राम, राम, गड्यांनो राम राम !

१) मुळात Mouse– उंदीर हा शब्द आहे. 'चिटपाखरूदेखील (जाग्यावरून हालले नाही) ह्या भाषांतरातील वाक्प्रचार मराठी भाषेतील वाक्प्रचारांचे स्वतंत्र वैशिष्ट्य दर्शवितो.

२) समर्पक भाषांतर. तत्कालीन जीवनातील हालचालींना मिळताजुळता शब्द आहे. 'शुभ रजनी' असे शब्दशः भाषांतर करता आले असते पण लोक-जीवनाशी समरसता दाखविण्याच्या धोरणाचे अवधान ठेवले आहे.

३) Ground या शब्दावद्दल आगरकरांचा 'देशाचे हितचिंतक' हा देश-वाचक शब्द सयुक्तिक आहे.

४) आगरकरांच्या 'गड्यांनो' या शब्दात स्नेहभाव आहे, सलगी आहे. Good night ही संकल्पना आपली नाही. त्यामुळे शब्दशः भाषांतर अप्रासंगिक ठरेल. बर्वे यांचा 'बंदगी' (हिंमतबहाद्दर) हा शब्द 'म्लेंछ'कालीन वातावरण दर्शवितो. आता पुढील स्वगत बघा–

Hamlet : To be or not to be ; that is the question.
whether 'tis noble in the mind to suffer.
The slings and arrows of outrageous fortune,
or to take arms against a sea of troubles,
And by opposing end them ? To die, to sleep,
No more ; and by a sleep to say we end
the heartache and the thousand natural shocks
that flesh is heir to, 'tis a consummation
Devoulty to be wish'd. To die, to sleep,
To sleep ! perchance to dream ay, there's the rub;
For in that sleep of death what dreams may come,
when we have shuffled off this mortal coil,
Must give us pause, there's the respect
that makes calamity of so long life.
For who would bear the whips and scorns of time,
The oppressor's wrong, the proud man's contumely,
The pangs of despised love, the law's delay,
The insolence of office and the spruns
that patient merit of the unworthy takes,

When he himself might his quietus make
With a bear badkin–? who would fardels bear,
To grunt and sweat under a weary life,
But that the dread of something after death,
The undiscover'd country, from whose bourn
No traveller returns puzzles the will,
And makes us rather bear those ills we have
Than fly to others that we know not of ?
Thus conscience does make cowards of us all;
And thus the native hue of resolution
Is sicklied o'er with the pale cast of thought,
And enterprises of great pith and moment
with this regard their currents turn away,
And lose the name of action. Soft you now !
The fair Ophelia Nymph, in thy–? orisons
be all my sins remember'd.

अंक तिसरा– प्रवेश पहिला

चंद्रसेन : जगायचे की मरायचे येवढाच[१] प्रश्न उरला आहे. कसे ? दैवाच्या दारुण दुर्विलासामुळे होणाऱ्या अनंत यातना मनातल्या मनात सोसाव्यात हे बरे, किंवा जिवावर उदार होऊन त्यांचा समूळ प्रतिकार करण्यास उद्युक्त व्हावे हे बरे ? मरणे– निजणे, ही दोन्ही सारखीच ! यात काय अधिक आहे ? आणि निजणे म्हणजे अंतःकरणाला आणि शरीराला सतत जाचणाऱ्या ज्या अनंत आधि व व्याधी त्यांचा क्षणभर विसर पाडणे. असे होईल तर किती इष्ट गोष्ट होईल ! मरणे– निजणे– निजणे ! पण त्यात स्वप्न पडले तर ? हां[२] येथे पंचाईत आली खरी. कारण या नाशवंत कुडीचा त्याग करून ती महानिद्रा घेऊ लागल्यावर काय काय स्वप्ने पडतील याचा निश्चय करता येत नसल्यामुळे साहस करण्यास धीर होत नाही आणि म्हणूनच आम्ही आपले सगळे आयुष्य दुःखात काढितो; नाही तर निर्दय[३] कालाचे तीव्र कोरडे कोण ओढून घेता ? जुलुमी लोकांचे अन्याय किंवा गर्विष्ठ लोकांचा उद्दामपणा कोण साहता ? प्रेमभंगामुळे मनास होणाऱ्या वेदना, न्याय मिळण्यास लागणारा उशीर, अधिकाऱ्यांचे उद्दाम आचरण आणि बिचाऱ्या सहनशील, गुणवान लोकांना विचारशून्य

अज्ञान लोकांचे जे लत्ताप्रहार घ्यावे लागतात, या सर्वांचा धारेच्या वीत-भर पात्याने शेवट करिता येता, तर ते कोण सोसता ? हा दुर्घट प्रपंचभार डोकीवर घेऊन हे दुःसह्य आयुष्य कण्हत कण्हत कोण कंठिता ? पण उपाय काय ? ज्याच्या सरहद्दीवर पाय टाकलेला कोणीही पांथ परत येऊ शकत नाही, अशा त्या यमलोकांत एकदा प्रवेश केल्यावर पुढे काय होईल या भीतीने आमच्या बुद्धीचा निश्चय ढळतो आणि आम्ही ज्या व्यथा सोशीत असतो त्याच सोसणे बरे, पण ज्या अदृष्ट व अननुभूत आहेत त्यात उडी घालणे नको असे वाटू लागते. याप्रमाणे[३] विचार करण्याने आम्हा सर्वांच्या पदरी भेकडपणा येतो. बुद्धीचा निश्चय झाल्याबरोबर मनास वाटणारा जो उल्हास तो ' करू की नको करू ' असल्या विचारांनी तेव्हाच गलित[५] होतो. आणि मोठमोठ्या साहसाच्या प्रचंड कल्पनांचा ओघ मागे फिरून त्या कधीच सिद्धीस न जाता जेथल्या तेथे लय पावतात, पण हो; अरे, ही रमणीय मल्लिका ! चारुगात्री, तुझ्या स्तवनाने माझ्याही पापांचे क्षालन होवो !

१) उत्कृष्ट भाषांतर : चंद्रसेनाचे स्वगत प्रभावी शब्दात उतरलेले आहे.

That is the question यामधील The शब्दाला असलेले महत्त्व, त्यातील अर्थच्छटा लक्षात घेऊन वापरलेला ' येवढाच ' हा शब्द अतिशय सूचक व समर्पक आहे. तसेच संपूर्ण स्वगतातून चंद्रसेनाची मनोव्यथा स्पष्टपणे व प्रभावीपणे मुळा-इतकीच स्पष्ट झालेली असून चंद्रसेनाची व्यक्तिरेखा हुबेहूब साकार होते.

२) Ay, there's the rub याचे केलेले भाषांतर मराठी भाषेच्या प्रकृती-नुसार केलेले असून अतिशय उत्कृष्ट व समर्पक उतरलेले आहे.

बर्वे (हिंमतबहाद्दर) साधुपणाच्या सोंगाचे स्पष्टीकरण करतात. भस्म चोपडणे, गोमुखीत हात घालणे वगैरे. कानिटकर मुळानुसार भाषांतर करतात.

३) चंद्रसेनाच्या मनातील ' शल्ये ' समर्थपणे उतरली आहेत. ही शल्ये म्हणजे एक प्रकारे जीवनभाष्यच आहे.

४) उत्कृष्ट भाषांतर असून सुभाषितवजा वाक्यरचना जशी मूळ नाटकात आली आहे तशीच भाषांतरात आलेली आहे. मराठी व इंग्रजी भाषेच्या वळणाची प्रकृती बऱ्याच प्रमाणात जवळीक साधणारी आहे.

५) वाक्प्रचार समर्पक.

* * *

OTHELLO, THE MOOR OF VENICE

Act V, Scene II : Cyprus. A bed-chamber in the castle. Desdemona in bed asleep; a light burning. Enter Othello.

Othello : It is the cause; it is the cause, my soul–
Let me not name it to you, you chaste stars !

It is the cause– yet I will not shed her blood;
Nor seas that whiter skin of hers than snow,
And smooth as monumental alabaster [Takes off his
[sword.]
Yet she must die, else she will betray more men.
Put out the light, and then put out the light,
If I quench thee, thou flaming minister,
I can again thy former light restore,
Should I repent me : but once put out thy light,
Thou cunning'st pattern of excelling nature,
I know not where is that Promethean heat
That can thy light relume. When I have plucked the
rose,
I cannot give it vital growth again–
It needs must wither. I'll smell it on the tree
[Kissing her.]
O balmy breath, thou dost almost persuade
Justice to break her sword ! One more, one more
Be thus when thou art dead, and I will Kill thee
And love thee after– one more, and that's the last.
So sweet was never so Fatal. I must weep
But they are cruel tears : This sorrow is heavenly.
It strikes where it doth love– She wakes

शेक्सपिअरचे नाटक ऑथेल्लो याचे १८६२ साली झालेले व १८६७ साली प्रसिद्ध झालेले महादेवशास्त्री कोल्हटकरकृत भाषांतर– 'ऑथेल्लो'

अंक ५ वा– प्रवेश २ रा (पृष्ठ १२३-१२४)
(प्रारंभ) दुसरी आवृत्ती १९६२
(निजण्याची खोली)

(देस्दिमोना बिछान्यावर झोपी गेली आहे. बाजूस दिवा जळतो आहे, अशा समयी ऑथेल्लो तिचा प्राण घ्यावा या हेतूने आत शिरतो आणि आपल्याशीच म्हणतो–)

हे मना, या अघोर कृत्याचे तेच बीज बरे तेच बीज. अहो, पवित्र तारांगणांनो,

ते मी आपणाजवळ या तोंडाने वदू नये; पण बीज तेच. तरी या सुंदरीचा रक्तस्राव करणे आपल्या हातून घडणे नाही. हिची काया तर पहा कशी बर्फासारखी शुभ्र आहे ती, आणि अंगावर तेज पहा कसे लखलखते आहे ते, जशी काय घोटीव संगमरवरी पुतळीच. अशा तुळतुळीत आणि तेजस्वी शरीरावर घाव करण्यास आपला काही हात वाहायचा नाही. (असे म्हणून तलवार आपटतो.) पण हिला जिवंतही ठेवण्याची सोय नाही. कारण तसे केल्यास ही विश्वासाने पुष्कळांचे असे गळे कापील. याकरिता मारली ही पाहिजेच; पण अगोदर दिवा मालवावा आणि मग– हे प्रकाशदायका दीपा, जरी मी तुला मालविले तरी मला जर वाटेल तर पुन्हा तुला पूर्वीप्रमाणे प्रकाशित करता येईल.

(स्त्रीकडे दृष्टी जाऊन) अहाहा ! आपले सर्व कौशल्य व अक्कल खर्चून परमेश्वराने तुझी काय ही अप्रतिम सौंदर्याची मूर्ती निर्माण केली आहे ! या तुझ्या मूर्तीतील अंतर्दीप जर मी समूळ मालविला तर त्यास पुन्हा प्रदीप्त करावयास संजीवनी विद्या मजपाशी कोठे आहे ? हे गुलाबाचे फूल जर मी तोडले तर याला पुन्हा जीव आणावयाची शक्ती माझ्या अंगात नाही; तेव्हा अर्थातच यास कोमेजून गेले पाहिजे. असो, झाडावर आहे तोपर्यंत याचा उपभोग तरी घेऊ या. (असे म्हणून तिचे मोठ्या प्रेमाने चुंबन करितो.) अहाहा ! काय मधुर चुंबन हे !

या माधुर्याच्या योगाने प्रत्यक्ष न्यायदेवतेला देखील आपला खड्ग मोडून टाकण्याची बुद्धी निपजू लागते. (चुंबनाची तृप्ती न होऊन) आणखी एकदा, आणखी एकदा. प्रिये, तू मरून अशीच रहा म्हणजे मी तुजवर अत्यंत प्रीती करीन. पुन्हा आणखी एकदा आणि आता हे शेवटचे. इतके गोड असे प्राण घेणे कधी नव्हते. रडे तर काही आपल्याला आवरत नाही, पण हे अश्रू महादुष्ट आहेत. हे दुःख मोठे अलौकिकच आहे ! अहो, ज्या ठिकाणी प्रीती करावयाची त्याच ठिकाणी घाव घालायचा ! अँ ! ही जागी झाली.

* * *

झुंझारराव

(शेक्सपिअरच्या अँथेल्लो नाटकाची रंगावृत्ती) (Stage-edition)

नवी आवृती मार्च १९७६ वरून.

(मूळ आवृती २ नोव्हे. १८९०)

अंक ५ वा प्रवेश २ रा.

(कमळजा निजली आहे व जवळ एक दिवा जळत आहे.)

झुंझार० : (गंभीर स्वराने) मना, तेच तेच कारण ! परमेश्वरा, या तोंडानं मी त्याचा उच्चार करू नये, पण कारण तेच ! (पुढे येऊन तिच्याकडे पाहून

एकदम तलवार उपसून) छे छे ! या कोमल, गौरवर्ण शरीरावर ही कठोर तरवार चालवून रक्तपात करणं माझ्या हातून होत नाही. (तलवार म्यानात घालतो.) परंतु प्राण हा घेतलाच पाहिजे. नाहीतर ही आणखी कित्येकांचा असाच दगा देऊन घात करील. (आवेशानं तिच्याकडे जातो, पण उशाशी दिवा पाहून थबकतो.) पण अगोदर दिवा मालवावा आणि मग (तिच्याकडे बोट करून) हा दिवा मालवावा. तो दिवा मालविला तर वाटेल तेव्हा पुन्हा लावता येईल; पण लाडके, तुझ्या या अद्वितीय लावण्यमूर्तीतला प्राणदिवा एकदा जरी मी मालविला, तर तो पुन्हा लावता येईल अशी मंत्रशक्ती माझ्या अंगी कुठं आहे ? हे नाजुक गुलाबाचं फूल जर मी एकदा खुडलं तर अर्थात कोमेजूनच गेलं पाहिजे. असो, झाडावर आहे तोपर्यंत तरी आस्वाद घ्यावा. (चुंबन घेऊन) अहाहा ! श्वासाचा काय घमघमाट हा ? या योगानं प्रत्यक्ष न्यायालासुद्धा आपलं शस्त्र मोडून टाकावं अशी वासना होईल. आणखी एकदा– आणखी एकदा (दोनदा चुंबन घेऊन) लाडके, मी तुला मारतो, पण मेल्यावर तू अशीच रहा, म्हणजे मी तुझ्यावर पहिल्यासारखी प्रीती करीन. आणखी एकदा– पण हे मात्र शेवटचं. इतकी मोहक असून अशी घातक वस्तू कधीच झाली नाही ! हे अश्रू वाहू लागले, पण मोठे दुष्ट आहेत; जिच्यावर प्रेम तिला मारायचं अं ! काय अलौकिक दुःख हे. (तिची हालचाल पाहून) जागी झाली वाटतं.

शेक्सपिअरचे नाटक ऑथेल्लो याचे १९६१ साली केलेले वि. वा. शिरवाडकर यांचे भाषांतर ऑथेल्लो.'

अंक ५ वा प्रवेश २ रा

शिलाहार– किल्ल्यातील शयनमहाल.

दमयंती मंचकावर झोपलेली. महेश्वर हातात दिवा घेऊन प्रवेश करतो.

महेश्वर : हे एकच कारण !
माझ्या अंतःकरणा, हे एकच कारण, हे एकच कारण !
हे पवित्र तारकांनो, करणार नाही मी त्यांचा नामोच्चार तुमच्यासमोर कधीही.
पण तेच तेच कारण.
तरी सांडणार नाही मी रक्त; करणार नाही मी जखम,
हिमाहून शुभ्र असलेल्या तिच्या संगमरवरी देहावर.
पण तिनं मरायलाच पाहिजे !

नाही तर करील ती वंचना.
आणखी किती तरी पुरुषांची !
मालवून टाक मालवून टाक, हा दिवा आणि नंतर तोही,
या हातानं कुस्करलेली तुझी ज्योत, हे प्रज्वलित तेजा,
मी करीन पुन्हा प्रज्वलित जर झाला मला पश्चात्ताप,
दुसऱ्या क्षणी.
पण समृद्ध सृष्टीतील द्रोहाची सीमा दर्शविणाऱ्या
हे मनोहर दीपा–
तुझी ज्योत मात्र एकदा विझली की कायमची-कायमची !
स्वर्गातसुद्धा नाही असा दिव्य अग्नी.
जो देईल या दिव्याला पुन्हा हरवलेला प्रकाश !
हे गुलाबाचं पुष्प एकदा खुडलं की खुडलं,
खंडित होईल त्याच्या जीवनाची धारा
जाईल कोमेजून ते कायमचे– आणि जायलाच हवं.
पण–पण ते बहरले आहे झाडावर
तोवर साठवून ठेवीन मी तो सुगंध माझ्या सर्वस्वात !
(तिचे चुंबन घेतो.)
अहाहा !
मधुर शीतल श्वासाची ही संजीवनी
तुटून पडेल साक्षात न्यायाची तलवार
हिच्या स्पर्शानं– एकच– आणि एकच–
अशीच अशीच राहा मेल्यावर सुद्धा !
मी तुला मारीन आणि करीन प्रेम तुझ्यावर
अनंत कालपर्यंत ! एकच– अखेरचं एकच–
किती मधुर ! पण या माधुर्यात भरलं आहे जहर !
आसवं ओघळताहेत माझ्या डोळ्यांतून
पण या आसवांत नाही करुणा
ही आहे स्वर्गीय व्यथा–
जिथे प्रेम आहे तिथेच प्रहार करणारी !
–ती जागी झाली.

Act V Seene II

Othello : Behold, I have a weapon.
A better never did itself sustain
upon a soldier's thigh, I have seen the day
That, with this little arm and this good sword,
I have made my may through more impediments
Than twenty times your stop. but, O Vain Boast !
Who can control his fate ? 'tis not so now.
Be not afraid though you do see me weaponed.
Here is my journey's end, here is my butt,
And very Sea-mark of my utmost sail.
Do you go back dismayed ? It is a lost fear.
Man but a rush against Othello's go ?
And he retires : Where should Othello go ?
Now, how dost thou look now ? O 'ill-starred wench !
Pale as thy smock ! When we shall meet at compt,
This look of thine will hurt my soul from heaven,
And friends will snatch at it. Cold, cold, my girl !
Even like thy chastity.
O cursed, cursed slave ! Whip me, ye devils,
From the possession of this heavenly sight !
Blow me about in winds ! roast me in sulphur !
Wash me in stcep-down gulfs of liquid fire !
O Desdemon ! dead, Desdemon ! dead ! O !

महादेवशास्त्री कोल्हटकर– ॲथेल्लो

अंक ५ वा प्रवेश २ रा.

ॲथेल्लो : हे पहा, माझ्याजवळ दुसरे शस्त्र आहे. यापेक्षा उत्तम शस्त्र शिपायाच्या कमरेला आजपर्यंत कधी लटकले नाही. या लहानशा सुंदर शस्त्राच्या साहाय्याने हल्ली जो तुम्ही अटकाव करीत आहा त्यापेक्षा वीसपट अधिक अटकावांतून निभावून गेलो असा दिवस मला आठवतो आहे. पण ती आता लटकी बढाई कशाला पाहिजे ? देवापुढे कोणाचे चालते आहे ? त्यातले आता काही उरले नाही. तुम्हाला माझ्या हातात शस्त्र जरी

दिसते आहे, तरी त्याची मनात किमपि भीती बाळगू नका. इहलोकीच्या यात्रेची येथेच माझी समाप्ती, एथपर्यंतच तिची मर्यादा. या संसारसागरात यापुढे म्हणून आता माझे तारू जायाचे नाही. भिऊन मागे कशाला हटता ? हे भिणे आता फुकट आहे. या ऑथेल्लोच्या अंगावर आता कोणी चालून मात्र यावे की, ऑथेल्लो सरला पाठीमागे ! पण मागे सरून तरी त्याने जावे कोठे आता ? (स्त्रीकडे पाहून) अगे लीलावती, काय तुझ्यावर प्रेतकळा आली आहे. बिचारीला ग्रहदशेने अगदी घेरून घेतले. जसे हे नेसायाचे वस्त्र आहे तशी तू अगदी पांढरी फटफटीत दिसते आहेस. पापपुण्याची झाडाझडती देण्याच्या स्थळी जेव्हा तुझी माझी गाठ पडेल तेव्हा हेच तुझे विकल स्वरूप माझ्या जीवात्म्याला स्वर्गातून लोटून देईल. आणि मग यमदूत येऊन त्यावर आपले पाश टाकतील. प्रिये, सखे अगदी थंडगार पडलीस ना ? अहाहा ! तुझे पातिव्रत्य जसे शीतल, तशी तू शीतल झाली आहेस. हरहर ! केवढा दुरात्मा पातकी मी आहे ! यमदूतांनो, मी स्वर्गभूमी पाहण्यास योग्य नाही, याकरिता त्या पुण्यभूमीतून चांगले ताडन करून मला बाहेर काढून द्या. मला वायुमंडळात झुगारून द्या, मला गंधकात होरपळून टाका आणि मला मोठ्या प्रचंड कुंडातील प्रदीप्त अग्नीच्या ज्वालेत लोटून द्या. हे देस्दिमोने ! परलोकनिवासिनी देस्दिमोने ! गेलीस मला सोडून तू ! अं, हाय, हाय हाय !

झुंझारराव (गोविंद बल्लाळ देवल)
(शेक्सपिअरच्या ऑथेल्लो नाटकाची रंगावृत्ती)
नवी आवृत्ती मार्च १९७६.
(पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना– २ नोव्हेंबर १८९०)

[(ऑथेल्लो) या नाटकाचे कै. महादेवशास्त्री कोल्हटकर यांनी केलेले एक मराठी भाषांतर प्रसिद्ध झालेले आहे. पण ते केवळ भाषांतर याच दृष्टीने तयार झाले असल्यामुळे त्यावरून रंगभूमीवर प्रयोग करताना पुष्कळ अडचणी येत असत.

नाटक प्रयोगास व त्याचप्रमाणे वाचनासही सर्वांशी उपयोगी पडेल अशी या नाटकाची एखादी रंगावृत्ती (Stage-edition) काढावी असे माझ्या मनात येऊन त्याप्रमाणे मी ही यथामती तयार केली आहे. पूर्वी प्रसिद्ध असलेल्या भाषांतरापेक्षा हीत विशेष गोष्टी ह्याच की निष्कारण शब्दविस्तार बहुतेक कमी केला आहे; इंग्रजी तऱ्हेची वाक्यरचना न करता भाषणांचा झोक काळास व पात्रांस साजेल असा ठेवला आहे; जागजागी पात्रसूचना दिल्या आहेत; व मूळ नाटकातील केवळ नावेच बदलली नसून एकंदर संविधानकही मुळातले सौरस्य बिलकुल कमी होऊ न देता इकडील एका ऐतिहासिक स्थितीशी जितके जुळेल तितके जुळविले आहे.]

गो. व. देवल– झुंझारराव

अंक ५ वा– प्रवेश २ रा

झुंझार : (तलवार सरसावतो व मुधोजीराव दचकून मागे सरकतो.) हे पाहिलंत हत्यार ? याच्या तोडीचे हे एकच. याच हातानं आणि याच हत्यारानं, तुमच्यासारखा पाच-पन्नास जवानांचा गराडा फोडून मी पार गेल्याचं मला आठवतं. पण ती फुशारकी आता कशाला ? नशिबावर कुणाचाही जोर नाही. ती सद्दी निघून गेली– भिऊ नका हत्यार पाहून. आटपली माझ्या जन्माची सफर ! हीच शेवटची मजल– इथं तारू खुंटलं आमचं ! दचकून मागं का सरता ? ही फुकट भीती. जरा माझ्यावर हात उचला की मी मागं हटलोच. पण मागं हटून जायचं कुठं ! (कमळजेचे प्रेत पाहून) लाडके, काय तुझ्यावर प्रेतकळा आली ही ! अगदी निस्तेज झालीस ना ? (हात हलवून) थंडगार पडली ! केवढा अधम चांडाळ मी ! यमदूत येऊन या पुण्यलक्ष्मीपासून मला फरफर ओढून नेऊन माझ्या अंगाच्या चिंध्या उडवतील तर बरं, मला गंधकांत होरपळून काढतील, तर चांगलं ! रसरशीत अग्निकुण्डात झुगारून देतील तर फार उत्तम ! (तिचे मस्तक मांडीवर घेऊन) लाडके, गेलीस ना ! लाडके ! (रडू लागतो.) हाय हाय !

* * *

वि. वा. शिरवाडकर (आंथेल्लो भाषांतर)

अंक ५ वा– प्रवेश २ रा

महेश्वर हे पाहा, माझ्या हातांत आहे शस्त्र
कुणाच्याही कमरेवर विराजलं नसेल इतकं बलशाली.
या बाहूनं, या समशेरीनं, मी तोडला आहे प्रतिबंध
तुमच्यापेक्षा बीसपटीनं बलाढ्य असलेला !
पण आता व्यर्थ आहे ही गर्वोक्ती, मात करता येत नाही दैवावर.
जे होतं ते आता नाही !
पण शस्त्रसिद्ध आहे, पण भिऊ नका,
ही आहे माझ्या प्रवासाची समाप्ती, युद्धाची अखेर,
गलबतांच्या शिडांना गवसलेला शेवटचा किनारा.
कशाला घेता आहांत पवित्रा ?
अकारण आहे ती भीती !

आता कुणीही उगारावं हत्यार या महेश्वराच्या छातीवर,
तो हटेल माघारी.
आता कुठे जाणार आहे तो ?
कशी– कशी दिसते ही दुर्भाग्याची मुद्रा कपाळावर घेऊन पडलेली,
पांढऱ्या रेशमासारखी मलूल ! जेव्हां आपण दोघं
उभे राहू स्वर्गामध्ये परमेश्वराच्या पायाजवळ,
ही ही मुद्रा लोटील मला रौरवाच्या तळाशी
आणि करील भुताखेतांच्या स्वाधीन !
गार गार पडली आहेस बर्फासारखी
पांढरी शुभ्र तुझ्याच पातिव्रत्यासारखी
कपाळ करंटचा– चांडाळा– काय केलंस हे !
यमलोकाच्या रक्षकांनो, फोडून काढा मला आसुडांनी,
आणि ओढून न्या दूर या देवतेपासून
द्या झंझावातावर भिरकावून, भाजून काढा गंधकांत,
द्रवाग्नीच्या खोल खोल घळचांमध्ये
आदळून आपटून बुडून टाका !
दमयंती– दमयंती– माझी दमयंती
मेली– मेली ती

* * *

अभिज्ञान शाकुन्तलम् (कालिदास)

(नाटक)

या सृष्टिः स्त्रष्टुराद्या वहति विधिहुतं या हविर्या च होत्री
ये द्वे कलं विधत्तः श्रुतिविषयगुणा या स्थिता व्याप्त विश्वम् ।
यामाहुः सर्वबीज प्रकृतिरिति यथा प्राणिनः प्राणवन्तः
प्रत्यक्षाभिः प्रपन्नस्तनुभिरवतु वस्ताभिरष्टाभिरीशः ॥ १ ॥
(१–१–३)
अंक १– पृष्ठ १

प्रस्तुत संस्कृत श्लोक हा पद्यरचनेत आहे. त्यामुळे सहजगत्या या रचनेला लालित्य व नादमाधुर्याची जोड लाभलेली आहे. त्यातून कालिदासाच्या सहजसुंदर, अर्थपूर्ण शैलीची कल्पना येते.

अभिज्ञान शाकुन्तल (डॉ. रा. शं. वाळिंबे)

प्रथमावृत्ती १९७०

(नान्दी)

विधात्याची जी पहिली सृष्टी (जल); विधीप्रमाणे अर्पिलेल्या आहुतीचा जी स्वीकार करते (अग्नी); जी आहुती अर्पण करते (यजमान); ज्या दोघी कालतत्त्वाची उत्पत्ती करतात (चंद्र आणि सूर्य); श्रवणेंद्रियाचा विषय असलेला शब्द हा जिचा गुण आहे व जी विश्वाला व्यापून राहिलेली आहे (आकाश); जिला सर्व बीजांचे मूलकारण मानतात (पृथ्वी); जिच्यामुळे जीवांना चैतन्याचा लाभ होतो (वायु); अशा या आठ प्रत्यक्ष मूर्तींनी युक्त असलेला शिव आपले रक्षण करो !

(अंक पहिला पृष्ठ ३)

१८७० १) श्री. परशुराम तात्या गोडबोले.
इतर अनुवादकार २) श्री. कृष्णशास्त्री राजवाडे.
३) श्री. अण्णासाहेब किर्लोस्कर.

प्रा. वाळिंबे यांच्या अनुवादात त्यांनी शब्दशः अर्थ आणण्याचा प्रयत्न केला आहे. पण ही सर्व रचना गद्यात आहे. पद्यरचनेतून निर्माण होणारे नादमाधुर्य व कालिदासाच्या मूळ शैलीच्या लालित्याचा प्रत्यय या गद्य अनुवादात येत नाही. तसेच पद्यात जे कालिदासाने सूचित– ध्वनित केलेले आहे ते सामान्य लोकांच्या समजुतीस सहजपणे यावे म्हणून त्या कल्पना स्पष्ट केल्या आहेत.

संस्कृत (नाटक)

काश्यप :–

यास्यत्यद्य शकुन्तलेति हृदयं संस्पृष्टमुत्कण्ठया
कण्ठः स्तम्भितवाष्पवृत्तिकलुषश्चिन्ताजडं दर्शनम् ।
वैक्लव्यं मम तावदीदृशमिदं स्नेहादरण्यौकसः
पीडयन्ते गृहिणः कथं नु तनयाविश्लेषदुःखैर्नवैः ॥ ६ ॥

अंक ४ पृष्ठ १०० : (४–५–४)

मराठी : अभिज्ञान शाकुन्तल

काश्यप– आज शकुन्तला जाणार या कल्पनेनं माझं हृदय दुःखानं अतिशय व्याकुळ होऊन गेलं आहे; अश्रू आतल्या आत दाबून धरल्यामुळे माझा कंठ दाटून आला आहे. माझ्यासारख्या अरण्यवासी माणसाला ममतेमुळे इतकं विल-

क्षण दुःख होत आहे. मग कधीही न अनुभविलेल्या कन्याविरहाच्या व्यथेमुळे गृहस्थाश्रमी माणसांना किती दुःख होत असेल !

(अंक ४ – पृष्ठ ४७)

काव्याचे जे वैशिष्टय 'कमी शब्दात विपुल अर्थगर्भता आणि नादमाधुर्य' हा भाग जरी या गद्यरचनेत नसला तरी मूळातील आशय, अर्थ न बदलता यथार्थपणे व्यक्त झाला आहे हे उल्लेखनीय आहे. भाषांतरकाराचे दोन्ही भाषेवरील प्रभुत्वच येथे स्पष्ट होते.

संस्कृत (नाटक) अभिज्ञान शाकुन्तल

राजा– अतःपरमपि प्रियमास्ति । यदिह भगवान्प्रियं कर्तुमिच्छति तर्हीदमस्तु ।

(भरतवाक्यम्)

प्रवर्ततां प्रकृतिहिताय पार्थिवः
सरस्वती श्रुतमहतां महीयताम् ।
ममापि च क्षपयतु नीललोहितः
पुनर्भवं परिगतशक्तिरात्मभूः ॥
अंक ७–पृष्ठ २१६ (७–३४–१)

मराठी :

राजा– यापेक्षाही अधिक प्रिय दुसरं काही असू शकेल काय ? तथापि, आपण जर प्रिय करणारच असला तर हे घडून येवो.

(भरतवाक्य)

प्रजेचं हित करण्याकडे राजाची वृत्ती होवो. ज्ञानाच्या योगे थोर असलेल्या लोकांच्या वचनांचा आदर होवो. आणि ज्याचं सामर्थ्य सर्व जग व्यापून राहिलेलं आहे असा स्वयंभू नीललोहित शिव माझ्याही पुनर्जन्माचा लोप करो ! (अंक ७ पृष्ठ १०३)

कालिदासाच्या वाक्सौंदर्याचा, त्याच्या शैलीचा वाचकांना प्रत्यय गद्य रूपांतराने येत नाही. परंतु आशयाचा उचित बोध होतो. प्रा. वाळिंबे यांच्या पांडित्याचा, दोन्ही भाषांवरील प्रभुत्वाचा प्रत्यय येतो. पण वृत्ती कवीची नाही.

उत्तर रामचरितम्–भवभूती

शम्बूक : जयतु जयतु देवः । देव भगवानगस्त्यो मत्तः
श्रुतभवत्संनिधानस्त्वामाह ' परिकल्पितविमानवतरण–
मङ्गला प्रतीक्षते वत्सल । लोपामुद्रा सर्वेच महर्षयः ।
तदेहि संभावयास्मात् । अथ प्रजविना पुष्पकेण
स्वदेशमुपगम्याश्वमेधाय सज्जो भविष्यसि इति ।

राम : यथाज्ञापयाति भगवान् ।

शम्बूक : इतस्तार्हि देवः प्रवर्तयतु पुष्पकम् ।

राम : (पुष्पकं प्रवर्तयत्) भगवति पंचवटि गुरुजनोपरोधात्क्षणं
क्षम्यतामयमतिक्रमो रामस्य ।

शम्बूक : देव पश्य पश्य ।

गद्य उताऱ्याचे भाषांतर गद्यातच केले आहे व तसे करणे सोपे जाते. येथे हे भाषांतर आहे, कारण संस्कृत मराठीतील भेद कमी, साम्य जास्त· यात संस्कृतीसाम्यही आहे. नावे, गावे परिचयाची आहेत.

उत्तररामचरितम्

(प्रा. दि. मो. हातवळणे, सातारा
प्रा. म. मो. केळकर, जळगाव)

शम्बूक– महाराजांचा जय असो ! महाराज, भगवान अगस्त्यऋषींनी आपल्या येथील आगमनाचे वृत्त माझ्या तोंडून ऐकल्यावर आपणास निरोप दिला आहे की, विमानातून उतरताच तुला ओवाळण्याच्या मंगल सोहळ्याची तयारी करून पुत्रवत्सल लोपामुद्रा तुझी वाट पाहत आहे. अन् तसेच इतर ऋषी-मुनीसुद्धा ! तरी इकडे येऊन आम्हास भेट दे. नंतर वेगवान पुष्पक विमानाच्या योगे स्वदेशी (वेळेवर) पोचून अश्वमेधासाठी तयार होशील तू !"

राम– जशी भगवानांची आज्ञा !

शम्बूक– तर मग पुष्पक विमान या दिशेला वळवावे, महाराजांनी.

राम– (पुष्पक चालू करीत) देवी पंचवटी, वडीलधाऱ्या मंडळींच्या आग्रहामुळे रामाचे (प्रस्तुतचे) हे मर्यादोल्लंघन काही काळ क्षमस्व !

शम्बूक– महाराज, पाहा, पाहा !

(पृष्ठ ६३)
परशुरामपंत तात्या गोडबोले



भासकवि विरचितम् चारुदत्तम् ।

शकार–

तिष्ठ तिष्ठ वसन्तसेने तिष्ठ,
किं यासि धावसि प्रश्वावसि प्रस्खलन्ती
साधू प्रसीद व मार्यसे तिष्ठ तावत् ।
कामेन संप्रति हि दह्यते मे शरीर
मंगारमध्यपतितमिव चर्मखण्डम् ॥८॥

मुक्तच्छंद

शकार– थांब ! थांब ! वसंतसेने, थांब ।
का जातेस, धावतेस, अडखळतेस ?
कृपा कर,
तुझी कत्तल करणार नाही;
थांब जराशी,
आग मदनाची जाळीत आहे–
माझं शरीर
जणू वाटतं, या धगधगत्या आगीमध्ये आहे.
चामडचाचा तुकडा

प्रा. ग. स. भावे

मूळ संस्कृत श्लोकाचे मुक्तछंदात केलेले हे भाषांतर ! अक्षरवृत्तापेक्षा धावता मुक्त छंद अधिक योग्य ठरत आहे.



९ : उपसंहार

साहित्यातील कथा, काव्य, कादंबरी, नाटक, विनोद, वैज्ञानिक व वैचारिक निबंध इत्यादी प्रकारांच्या भाषांतरविषयक तत्त्वांची व तपशिलांची येथे सोदाहरण चर्चा झाली. त्याहीपूर्वी भाषांतरविषयक विविध संज्ञा व संकल्पना यांचाही साधार विचार झाला.

एखाद्या लेखकाच्या प्रज्ञेची, प्रतिभेची व भाषाप्रभुत्वाची कसोटी, स्वतंत्र लेखन करण्यापेक्षाही, परभाषेतील लेखनकृतीचे भाषांतर–रूपांतर करण्यात अधिक प्रमाणात आढळून येईल; कारण हे काम अधिक कष्टाचे व कुशलतेचे आहे. यात पराकायाप्रवेशाला जसे महत्त्व आहे तसेच परकीय भाषा, संस्कृती व जीवन कितपत आत्मसात होऊ शकेल यालाही महत्त्व आहे–आणि पुष्कळदा तर मुळाबर-हुकूम आशय व अभिव्यक्ती स्वभाषेत उतरले न जाण्याची शक्यता अधिक आहे. तत्त्वतः शंभर टक्के भाषांतर अशक्य असते हेही विविध साहित्य प्रकारांच्या भाषांतराच्या उदाहरणांतून आपण तपासून घेतले आहे.

या छोटेखानी पुस्तकात भाषांतर, रूपांतर, भावानुवाद इत्यादी शब्द वापरले गेले असले व त्यांच्या संकल्पना व अर्थच्छटा परस्परांहून भिन्न असल्या तरी सर्व सामान्य लोक या तीनही शब्दांबद्दल भाषांतर हा एकच रूढ शब्द वापरत असल्याचे आढळून येते. इंग्रजीतही या तीनही संज्ञांबद्दल 'Translation' हा एकच शब्द प्रामुख्याने वापरला जातो. परंतु या तीन शब्दांचे अर्थदृष्ट्या स्वरूप थोडेफार भिन्न आहे हे जाणकारांनी समजून घेतले पाहिजे. उदाहरणार्थ गीता हा संस्कृतातील एक ग्रंथ बघावा. विनोबा भावे यांनी गीतेतील प्रत्येक श्लोकाबद्दल मराठी श्लोक रचून 'गीताई' द्वारे भाषांतराचा एक प्रामाणिक प्रयत्न केला आहे; पण ज्ञानेश्वरांचा ज्ञानेश्वरी हा ग्रंथ (भावार्थदीपिका) मूळ गीतेचे शब्दशः भाषांतर आहे असे कोणीही म्हणणार नाही. फार तर त्यास भावानुवादाचा स्वैर काव्यात्मक विलास असेच संबोधावे लागेल. अन्यथा गीतेमध्ये सातशे श्लोक असताना मराठीत ज्ञानेश्वरीच्या

रूपाने नऊ हजार ओव्यांचा प्रपंच थाटला जातो, या प्रयत्नास कोणती संज्ञा असावी हा एक वेगळाच प्रश्न समोर येईल.

या संदर्भात आणखी एक वेगळाच मुद्दा विचारात घ्यावा लागेल. एकाच भाषेतील कवितेचा–एखाद्या प्राचीन मराठी काव्याचा– उतारा अथवा प्राचीन गद्य वाङ्मयाचा उतारा अर्थ लावण्यासाठी दिला जातो. उदाहरणार्थ ज्ञानेश्वरांच्या ओव्या वा तुकारामाचे अभंग, किंवा वामनपंडित व मोरोपंत यांचे संस्कृतप्रचुर मराठी श्लोक, अथवा मराठी बखरीतील एखादा गद्य उतारा समोर ठेवून त्याचा गद्यानुवाद–सरळ सुबोध आजच्या मराठी भाषेत लिहिण्यासाठी दिला जातो. या प्रकारास काय नाव द्यावे ? इंग्रजीत या प्रकारास ' Modern Prose Rendering' ही संज्ञा आहे. (मराठीत गद्यानुवाद हा शब्द उचित ठरेल.) प्राचीन मराठी भाषेचे हे अर्वाचीन मराठीत 'भाषांतर' असे म्हणणे धाष्टर्याचे ठरेल; कारण खऱ्या अर्थी ते भाषांतर नव्हे. मराठी भाषाच दोहींकडे आहे. फक्त कालिक वा प्रादेशिक भेद असणार. त्यामुळे भाषांतर–रूपांतर–अनुवाद इत्यादी संज्ञा लागू पडणार नाहीत.

भाषांतर हे शास्त्र की कला ?–असे शीर्षक या पुस्तकास दिलेले आहे. ' शास्त्र ' ही संज्ञा उच्चारताच एक परंपरागत संकल्पना मनात उभी राहते. शास्त्र म्हणजे बुद्धिगोचर, प्रयोगशील व जे स्थलकालातील वैज्ञानिक सत्य असते ते ! हे वस्तुनिष्ठ हवे. स्थलकालव्यक्तीनुसार त्यातील आशय वा सत्य बदलणारे नसते.

(Scienece is Systematized knowledge in general– Knowledge gained by experimentation and Systematic study. It is gained objectively and not Subjectively.)

उदाहरणार्थ न्यूटनने प्रतिपादलेला गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत ! पदार्थविज्ञान-शास्त्रातील या सिद्धांतानुसार कोणतीही वर फेकलेली व असलेली वस्तू पृथ्वीच्या आकर्षणामुळे खाली खेचली जाते. हा सिद्धांत वा हे वस्तुनिष्ठ सत्य जगाच्या पाठीवर कोठेही व केव्हाही अबाधितच राहील. (universal truth) असे हे शास्त्र अपरिवर्तनीयच राहील. कोणताही गणितगत विषय ' शास्त्र '–संज्ञेस पात्र ठरेल.

भाषांतर करणे हे वस्तुनिष्ठेपेक्षा व्यक्तिनिष्ठेकडे अधिक झुकणारे आहे, म्हणून ते ' शास्त्र ' मानण्यापेक्षा 'कला' मानणेच सयुक्तिक ठरेल. भाषांतरकर्त्याची भाषा, त्याची संस्कृती, त्याचे शिक्षण, त्याच्यावर कळत न कळत होणारा भावनांचा प्रभाव लक्षात घेता भाषांतर ' कले'कडेच मानणे अटळ ठरेल. थिएडोर सेव्हरी याने (Theoder Savory) आपल्या पुस्तकाला ' Art of Translation ' हे नाव दिले आहे ते यामुळे मार्मिक वाटते. फार काय रूबेन बॉवर याने ' In Translation ' या ग्रंथात भाषांतराला कलाच म्हणून गौरविले आहे. एखाद्या परकीय साहित्य–कलाकृतीचे मराठीत भाषांतर करताना ते शब्दशः करून, वाचकाचे समाधान

होणार नाही. इंग्रजी वाक्यरचनेपेक्षा मराठी वाक्यरचना प्रकृतीने वेगळी आहे. इंग्रजीत–'कर्ता–क्रियापद कर्म' ही रचना आहे तर मराठीत कर्ता–कर्म–क्रियापद ही रचना असते. पण ही ढोबळ व्यवस्था झाली. प्रत्येक भाषेचे काही खास वळण असते, त्यामागे काही खास प्रतिमा वा प्रतीके असतात. उदाहरणार्थ पुढील वाक्य तपासा.

"If I believe in your words, I hope you wont let me down" या वाक्याचे जर कोणी "जर मी तुझ्या शब्दांवर विश्वास ठेवला तर मला वाटते तू मला धोका देणार नाहीस." असे भाषांतर होऊ शकेल, पण जर कोणी "जर मी तुझ्यावर अवलंबून राहिलो तर मला वाटते तू माझा केसाने गळा कापणार नाहीस" असे लिहिले तर ते काहींना अधिक मार्मिक वाटेल. म्हणजे कला या शब्दाने व्यक्तिगत आवड–निवड व्यक्त करण्यास अवसर मिळू शकतो. एकाद्या शास्त्रीय ग्रंथाचे मराठीत आशयनिष्ठ–वास्तव–भाषांतर करणे व लेखकाची अलिप्तता प्रत्ययास येणे यात भाषांतर हे शास्त्र ठरेल. पण जेव्हा काव्य–कथा–लघुनिबंध यांचे भाषांतर करणे असेल तेव्हा लेखकाची भावनिक व सांस्कृतिक निष्ठा व्यक्त होताना त्या अभिव्यक्तीत त्याच्या भावभावनांचे रंग मिसळले जातील व ते भाषांतर कलात्मक पातळीवर उभे राहील.

आजकाल साहित्याच्या अभ्यासाचे जे विविध मार्ग उपलब्ध आहेत, त्यात 'तौलनिक साहित्याभ्यास' (Study of Comparative Literature) ही शाखा फार महत्त्वाची मानली जाते. या शाखेच्या सर्वांगीण अभ्यासाची सोय भारतीय विद्यापीठांतून फार मोठ्या प्रमाणात आढळत नाही. जाधवपूर विद्यापीठात मात्र या विषयाला प्राधान्य दिलेले आहे. मुंबई व महाराष्ट्रातील विद्यापीठांचे लक्ष आता इकडे वळलेले आहे. हा अभ्यास वाढविण्याचा उद्देश असेल तर भाषांतर विषयाला एक नवे इष्ट वळण लागेल. साहित्याचे आकलन व आस्वाद या दोन्ही गोष्टी समृद्ध करणारी दृष्टी भाषांतर-प्रक्रियेने साध्य होणारी आहे. यामुळे भाषांतर केवळ उपयुक्तच नव्हे, तर ते अत्यावश्यकही ठरत आहे.

या पुस्तकाचा आवाका फार मोठा नाही. त्यामुळे तौलनिक साहित्याभ्यास व तौलनिक भाषाशास्त्र यांच्यासह भाषाशास्त्रीय मानसशास्त्र यांचाही खास अभ्यास (Linguistic Psychology) उद्या विद्यापीठीय स्तरांवर खास स्वतंत्र ज्ञानशाखांतून होणे (Specialized Branches of study) अगत्याचे ठरणारे आहे. आजचे मराठी साहित्य आत्मतुष्टतेच्या भोवऱ्यात सापडलेले आहे. या भोवऱ्यातून ते बाहेर काढावयाचे असेल तर 'भाषांतर ही शास्त्र की कला ?' ही चर्चा करण्यापेक्षा तिचा उपयोग करणे व मराठी साहित्य हे संपन्न, समृद्ध व सुंदर करण्याचा प्रयत्न करणे हेच आजचे एक प्रमुख आव्हान ठरेल !

* * *

परिशिष्ट क्रमांक–१

' भाषांतरविषयक काही संस्कृत सूत्रे '

(हरिहर सूत्राणि)

(प्रा. हरिहरशास्त्री उर्सेकर यांच्या
" Essays on Indology "मधून)

१) बहुजन सुखबोधाय ।

सर्वसामान्य मनुष्याला मूळ आशयाचे सुलभ आकलन व्हावे हे उद्दिष्ट असावे.

२) शब्दे अर्थे आशयेच नातिचरामि संहिताम् ।

मूळ उताऱ्याचे भाषांतर करताना शब्द, अर्थ व संहिता यांचे उल्लंघन न करण्याचे व्रतपालन मी (भाषांतरकार) करीन.

३) यथार्थं भाषांतरम् ।

भाषांतर हे मूळास धरून (शब्द व अर्थ दृष्ट्या) राहील.

४) न केवलं शब्दप्रामाण्यम् ।

भाषांतर करताना केवळ शब्द हे आधारभूत नसावेत.

५) वर्जनीयं बीजगणितनिष्ठ भाषांतरम् ।

गणितगत पद्धतीचे (वस्तुनिष्ठ वा कृत्रिम) भाषांतर नसावे.

६) शब्दार्थः न तु शब्दान्वयः ।

मूळ शब्दांच्या रचनांचा क्रम नसावा– शब्दार्थ महत्त्वाचा.

७) संयोगात् शब्दयोजना ।

मूळ संदर्भ लक्षात घेऊनच पर्यायी शब्द निवडावा.

८) अव्यवहार्यं अनर्थकरम् च एकशब्दत्वम्

मूळ शब्दाला प्रतिशब्द देताना तो अव्यवहारी, अनर्थकारक नसावा.

९) नेकोपि शब्दः वर्जनीयः नैकोपि उपेक्षणीयः ।

मुळातील कोणताही शब्द वर्ज्य वा उपेक्षणीय मानू नका.

१०) नैकोपि शब्दः अन्तःस्थापनीयः ।

एकही बाह्य शब्द मुळात घालू नका.

११) शब्दोहि विविधार्थोल्लासत्यक्षमः ।


एक शब्दही विविध अर्थच्छटा व्यक्त करतो याचे भान ठेवावे.

१२) प्रभवति शब्दकुलम्, न शब्दविशेषः ।

संबंधित शब्दांच्या अनुषंगाने प्रतिशब्दाची निवड करावी.

१३) परिचित शब्दाय अग्रक्रमः ।

सामान्य मनुष्याला जो शब्द परिचित आहे तोच निवडावा.



१४) नवशब्द निर्माणे न प्रतिषेधः ।
एखदा नवा शब्द वापरण्यास विरोध नाही.
१५) विज्ञानतत्त्व विहिताहि शब्दसिद्धिः ।
शास्त्रीय पद्धतीवर नवशब्दनिर्माण करण्यास हरकत नाही.
१६) प्रामाण्यबुद्धिः कोशेषु ।
शब्दकोशातील शब्द स्वीकारला जावा.
१७) किन्तु कोशात् रूढिर्बलीयसी ।
परंतु शब्दकोशातील शब्दापेक्षा काही प्रसंगी रूढ शब्दही स्वीकारावेत.
१८) प्रभवति व्याकरणम् ।
शब्दाचे व्याकरणही महत्त्वाचे समजावे.
१९) विरामचिन्हानि हि विचारणीयानिः ।
भाषांतर करताना विरामचिन्हांना विचारात घ्यावे.

* * *

परिशिष्ट क्रमांक–२

आधारभूत व संदर्भ ग्रंथ

1) Reuben A Brower — ' On Translation 1959
2) Theodore Savory — ' The Art of Translation ' 1957, 1968
3) Hennry Gifford — Comparativc Literature
4) Andre Lefevere — Translating Poetry 1975
4) सी. रेबीन Ed : J. S. Holmes — The Nature of Translation 1970
5) ए. एच. स्मिथ — Aspects of Translation 1958
6) लॉर्ड वुडहाउस्ली — Translation

१) विष्णुशास्त्री चिपळूणकर — निबंधमाला
२) गोपाळ गणेश आगरकर — ' विकारविलसित' प्रस्तावना
३) हरी नारायण आपटे — ' विकार विलसिता'वरील समीक्षा (निबंधचंद्रिकेतील लेखावरून)
४) शिवराम सीताराम वागळे
५) खंडेराव भिकाजी बेलसरे
६) महेश्वर अनंत करंदीकर — 'रूपकम् ' शेक्सपिअर खंड
७) प्रा. वसंत बापट — तौलनिक साहित्याभ्यास
८) सं–भास्कर लक्ष्मण भोळे — संशोधनाची क्षितिजे

मराठी भवन ग्रंथालय ३२०३ ग्रंथ क्र. १५२३२ दिनांक २१३।८७


REFBK-0025238